१०२ टन घेतले होते. यानंतर मांडकी येथील प्रा. साळुंके यांनी एकरी १०६ टन ऊसाचे उत्पादन घेतले आहे. प्रा. साळुंके यांनी त्यांच्या गट क्रमांक ०६ मधील दोन एकर क्षेत्रात जवळपास ६२ दिवस बकरी बसवली होती. यानंतर,उभी-आडवी नांगरी केली. यानंतर नऊ ट्रॉली मळी, पाच ट्रॉली शेणखत टाकून, साडेचार फूट सरी काढली. यामध्ये को- ८६०३२ ऊसाच्या रोपाची लागवड दोन फुट अंतरावर केली होती. यानंतर, एन.पी.के. खते वापरली. तीन वेळेस ड्रिचींग, तीन वेळेस फवारणी केली. तसेच दोन वेळेस गायीचे गोमूत्र गाळून ठिंबक सिंचनच्या माध्यमातून उसाला सोडले होते. किमान १५ दिवसांनी पाण्याबरोबर ठिंबक सिंचनच्या माध्यमातून खते सोडली. पाटपाण्याचा वापर अतिशय कमी प्रमाणात केला होता. दरम्यान, उसाचे दोन वेळेस पाचट काढून ते पाचट सरी मध्येच टाकल्याने जमीनीची ओल टिकून राहीली होती. जमीन वाळूमिश्रीत असल्याने निचरा होणारी जमीन असल्याने आणि योग्य वेळी पाणी दिल्याने उसाची वाढ योग्य प्रमाणात होऊन एकरी १०६ टन उत्पादन मिळवण्यात यशस्वी झाल्याचे प्रा. मानसिंग साळुंके यांनी सांगितले. दरम्यान, एकरी १०६ टन ऊस उत्पादन काढल्याबद्दल, मांडकी पाणीपुरवठा संस्थेच्या वतीने प्रा. साळुंके यांचा सत्कार करण्यात आला.

मागील आठवड्यात प्रा. साळुंके यांच्या शिवारातील उसाची तोड गाळपासाठी करण्यात आली. त्यामध्ये प्रा. साळुंके यांनी ऊस उत्पादन वाढीचा केलेला विक्रम ऊस विकास विभागाने सर्वांच्या समोर आणला आहे. तो इतर ऊस उत्पादकांसाठी दिशादर्शक ठरणारा आहे.

– नंदकुमार विघाते, कृषी सहायक

### ऊस काढला होता धुवून

मागील वर्षी मांडकी- वाल्हे या रस्त्याचे काम सुरू होते. प्रा.साळुंके यांचे उसाचे क्षेत्र हे याच रस्त्यालगत असल्याने शेतातील ऊस पिकांवर मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या कामामुळे धूळ बसली होती. यामुळे या उसाची वाढ खुंटली असल्याचे साळुंके कुटुंबीयांच्या लक्षात आले. यानंतर एसटीपी पंप व २०० फूट पाइप्या साहाने,पाण्याच्या फवा-याने साळुंके कुटुंबीयांनी ऊस पुर्णपणे धुवून काढला होता. यानंतर उसाची खुंटलेली वाढ पुन्हा जोमाने झाली, अशी माहिती प्रा. साळुंके यांनी दिली.

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## Senate accuses SPPU officials of delays, mismanagement and unresolved issues

Ardhra.Nair@timesofindia.com

**Pune**: At the senate meeting of Savitribai Phule Pune University (SPPU) on Saturday, members accused the university officials of tarnishing the institution's reputation through systematic management.

Issues ranging from missing minutes of management council meetings and delays in Aspire fellowships to unresolved infrastructure problems in sub-centres and inadequate follow-through on suggestions from senate took centre stage.

The meeting began with protests by senate members demanding that the officials immediately upload the minutes of management council meeting. "Why should they be hidden? This is a state university, and the minutes must be accessible on the website," said Sachin Gorde, a senate member. Vice-chancellor Suresh Gosavi assured the protesters that the minutes would be uploaded, prompting the demonstrators to join the meeting. During the proceedings, Harsh Gaikwad called for strict enforcement of fee transparency, demanding that all affiliated colleges display course fees and detailed breakups online. Gosavi assured the members that the directive would be implemented.

File photo



Savitribai Phule Pune University

Pending completion of the Nashik sub-centre also drew sharp criticism. Senate member SS Kale pointed out that despite nearing completion of construction, the centre lacks basic infrastructure like access road and a water pipeline.

A broader concern raised by several members was the administration's practice of merely "noting" objections and suggestions during senate meetings without acting upon them. "We need clarity on whether our inputs are implemented or not. Even if no action is taken, the reasons must be communicated to the senate," said Harsh Jagzap. Financial accountability also came under the spotlight, with Senate member Vinayak Ambekar highlighting delays in presenting the final balance sheet for the 2023-24 financial year, which should be submitted within six months since March 30, 2024. Ambekar also noted that the re-appropriation of funds report was not tabled for Senate approval.

Senate members complained that rules regarding acting charges were not transparent and also complained about vacant positions in the university. Gosavi attributed the recruitment freeze to a directive from the Governor halting hiring processes across all state universities and refused to comment further.

Questions were also raised about the utility and effectiveness of fibre optic cables laid across the university campus. Responding to the queries, Gosavi announced that a committee would be formed to evaluate the project.

Concerns over duplicate certificates also sparked outrage in the senate meeting. Members cited the case of a student who applied for a duplicate certificate in 2019 but was yet to receive it, severely impacting her professional advancement. "The university owes her an apology," said Gorde. Gosavi apologised on behalf of the institution, assuring the senate that the matter would be resolved within 15 days.

The Times of India 1.12.2024

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## दोन अधिसभा झाल्या तरीही परिषदेचे ठराव संकेतस्थळावर नाहीत

### सभागृहाबाहेर ठिय्या आंदोलन

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सर्व ठराव आणि निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे. मात्र दोन अधिसभा झाल्या तरीही अद्याप याची अंमलबजावणी न झाल्याने अधिसभा सदस्यांनी शनिवारी विद्यापीठाच्या सभागृहाबाहेर ठिय्या आंदोलन केले. त्यामुळे अधिसभेच्या सुरवातीलाच वातावरण तापले. दरम्यान, विद्यापीठ प्रशासनाने सदस्यांशी चर्चा केली आणि व्यवस्थापन परिषदेचे ठराव तत्काळ संकेतस्थळावर टाकण्याचे मान्य केले. त्यानंतर अधिसभा सुरू करण्यात आली.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि अन्य मान्यवरांनी अधिसभा सदस्यांशी चर्चा केली. हे विद्यापीठ सार्वजनिक असून, तेथील निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक असतानाही प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे अधिसभा सदस्यांनी त्यावरून प्रशासनाला धारेवर धरले. विद्यार्थीकेंद्रित असलेल्या विद्यापीठाचे सर्व ठराव संकेतस्थळावर प्रसिद्ध कधी करणार, असा प्रश्न उपस्थित करत सदस्यांनी सभा सुरू होण्यापूर्वी गदारोळ केला. सदस्य डॉ. हर्ष गायकवाड यांनी याबाबतचा प्रश्नही उपस्थित केला आहे. व्यवस्थापन परिषद ही विद्यापीठाचे निर्णय घेणारी महत्त्वाचे अधिकार मंडळ आहे. या परिषदेचे सर्व ठराव विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याबाबतचा ठराव यापूर्वीच्या अधिसभेत मंजूर करण्यात आला आहे. मात्र, आजपर्यंत असे ठराव संकेतस्थळावर प्रसिद्ध झाले नाहीत, याकडे गायकवाड यांनी लक्ष वेधले आहेत. त्यावर, व्यवस्थापन परिषदेचे ठराव संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे ठराव विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तत्काळ उपलब्ध करून देण्यात येतील, असे विद्यापीठ प्रशासनाने संगितले

Kesari 1.12.2024

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
01 Dec City 2024_013
01 Dec 2024

## विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे ठराव आता संकेतस्थळावर...

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सर्व ठराव आणि निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे. मात्र, दोन अधिसभा झाल्या तरीही अद्याप याची अंमलबजावणी झाली नसल्याने अधिसभा सदस्यांनी शनिवारी विद्यापीठाच्या सभागृहाबाहेर ठिय्या आंदोलन केले. सदस्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर अखेर विद्यापीठ प्रशासनाने व्यवस्थापन परिषदेचे ठराव तत्काळ संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार असल्याचे सांगितले.

पुणे विद्यापीठ सार्वजनिक असून तेथील निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक असतानाही प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. विद्यार्थीकेंद्रित असलेल्या विद्यापीठाचे सर्व ठराव संकेतस्थळावर प्रसिद्ध




कधी करणार, असा प्रश्न उपस्थित करीत सदस्यांनी सभा सुरू होण्यापूर्वी गदारोळ केला. सदस्य डॉ. हर्ष गायकवाड यांनी याबाबतचा प्रश्नही उपस्थित केला आहे. आजपर्यंत असे ठराव संकेतस्थळावर प्रसिद्ध झाले नाहीत. या सर्व पार्श्वभूमीवर व्यवस्थापन परिषदेचे ठराव संकेतस्थळावर तत्काळ उपलब्ध करून देण्यात येतील, असे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

### लेखा परीक्षण अहवालावरुन प्रशासन तोंडघशी

विद्यापीठाचा २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे, संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखा परीक्षण व अनुपालन अहवाल विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी अधिसभेत मांडला. या अहवालातील त्रुटींवर भाष्य करता सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सदस्य विनायक आंबेकर यांनी हा अहवाल चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आला आहे. त्यात, दुरूस्ती करावी. तसेच, विद्यापीठाने निधीच्या पुनर्विनियोजनाबाबत अधिसभेसमोर मांडणे अपेक्षित होते, ते नियमाप्रमाणे करण्यात आलेले नाही, असा मुद्दा मांडला. दरम्यान अन्य सदस्यांनी विद्यापीठातील आर्थिक अनियमिततेबाबत प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, सुधारणा करून हा अहवाल मांडण्यात येणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

# विद्यापीठाच्या अधिसभेत खडाजंगी

## अधिसभा सदस्यांकडून प्रशासन धारेवर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आर्थिक लेखापरीक्षण अहवाल, कुलसचिव निवड, विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वेळेत न मिळणे अशा विविध मुद्द्यांवरून अधिसभेत व्यवस्थापन परिषद, अधिसभा सदस्य यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. त्यामुळे अधिसभेतील वातावरण चांगलेच तापले.

विद्यापीठाची अधिसभा शनिवारी सुरू झाली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे या वेळी उपस्थित होते. व्यवस्थापन परिषदेकडून मांडण्यात आलेल्या लेखापरीक्षण अहवालावरून अधिसभेतील वातावरण चांगलेच तापले. अधिसभा सदस्यांनी लेखापरीक्षण अहवालावर आक्षेप नोंदवत त्यातील चुका निदर्शनास आणून दिल्या. तसेच ३० सप्टेंबरपूर्वी अहवाल अधिसभेपुढे मांडणे बंधनकारक असल्याने आता अहवाल सादर करणे बेकायदा असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यानंतर अन्य अधिसभा सदस्यांनीही आक्रमक होत अहवालाला मंजुरी न देण्याची भूमिका घेतली. त्यामुळे अहवालाची मंजुरी आणि त्यावरील चर्चा रविवारी करण्यात येणार आहे.

**कुलसचिव, अधिष्ठाता निवडीवर प्रश्नचिन्ह**

पूर्णवेळ कुलसचिव, पूर्णवेळ अधिष्ठाता निवड का केली जात नाही याबाबतही अधिसभा सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. कुलसचिव नियुक्ती प्रक्रियेमध्ये झालेल्या गैरप्रकारामुळे विद्यापीठाची बदनामी झाल्याची अधिसभा सदस्यांकडून टीकाही करण्यात आली. विद्यापीठाच्या अनेक विभागांमध्ये प्रभारी कार्यभार पद्धतीने कामकाज चालवण्यात येत आहे. हा प्रभारी कार्यभार तातडीने संपवण्याची मागणीही करण्यात आली.

**प्रमाणपत्रे वेळेत मिळत नाहीत**

विद्यार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्र मिळत नसल्यावरून सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. पाच वर्षे होऊनही विद्यार्थ्यांना दुबार गुणपत्रक मिळत नसल्याचे सदस्यांनी उदाहरणासह विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत या प्रकारांना जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. याबाबत कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दिलगिरी व्यक्त करत येत्या १५ दिवसांत गुणपत्रक देण्याचे आश्वासन दिले.

**ठिय्या आंदोलन**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सर्व ठराव आणि निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी न झाल्याने अधिसभा सदस्यांनी ठिय्या आंदोलन केले. विद्यापीठ प्रशासनाने सदस्यांशी चर्चा करून व्यवस्थापन परिषदेचे ठराव तत्काळ संकेतस्थळावर टाकण्याचे मान्य केल्यानंतर अधिसभा सुरू झाली.

Loksatta 1.12.2024

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
01 Dec City 2024_011
01 Dec 2024

# पाच वर्षे झाली, तरी डुप्लिकेट मार्कलिस्टही मिळेना

## पुणे विद्यापीठ अधिसभेत प्रश्नांचा भडिमार : कुलगुरू डॉ. गोसावी निरुत्तर

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३० -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत विद्यार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्र मिळत नसल्यावरुन सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनावर धारेवर धरले. तब्बल पाच वर्षे झाली, तरी विद्यार्थ्यांना डुप्लिकेट मार्कलिस्ट विद्यार्थ्यांना मिळाली नसल्याची माहिती उदाहरणासह सदस्यांनी अधिसभेत विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. या सर्व प्रकरणी संबंधित विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी सदस्यांनी केली. पाच-पाच वर्षे प्रमाणपत्र मिळत नाही, ही गंभीर बाब आहे. याबाबत दिलगिरी व्यक्त करीत १५ दिवसांत मार्कलिस्ट दिले जाणार असल्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दिले.

विद्यापीठाची अधिसभेची बैठक शनिवारी सुरू झाली. यात प्रश्नोत्तरामध्ये अधिसभा सदस्य गणपत नांगरे यांनी दुबार गुपत्रक विद्यार्थ्यांना किती दिवसांत दिले जाते, असा प्रश्न उपस्थित केला. त्यास व्यवस्थापन सदस्य सागर वैद्य यांनी हे गुणपत्रक जास्तीत जास्त १५ दिवसांत दिले जातात, असे सांगितले. त्याच दरम्यान नांगरे यांनी एका विद्यार्थिनीनी डुप्लिकेट मार्कलिस्टसाठी अर्ज करून पाच वर्षे झाले, अजूनही मार्कलिस्ट मिळालेले नाही, याकडे सर्वांचे लक्ष वेधले. त्यानंतर अन्य सदस्यांनी वेळेत कोणतेच प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना मिळत नसल्याची तक्रारी मांडल्या. वेळेत प्रमाणपत्र न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सदस्यांनी केली.



**प्रभारींचा कालावधी अनिश्चित...**

डॉ. सुनील लोखंडे यांनी विद्यापीठात किती अधिकारी प्रभारी म्हणून व केव्हापासून काम करीत आहेत, असा प्रश्न उपस्थित केला. त्यास प्राचार्य देविदास वायदंडे यांनी विद्यापीठात ११ पदे ही प्रभारी अधिकारी असल्याचे नमूद केले. मात्र कुणाकडे किती काळ प्रभारी पद असायला हवे, याविषयी नियमावलीचा मुद्दा मांडला. त्यास विद्यापीठाकडून काहीच उत्तर मिळाले नाही. पूर्णवेळ प्राध्यापक भरती झाल्यानंतर प्रभारी अधिकाराचा कार्यभार संपुष्टात येईल, असे सांगून आश्वस्त केले.

**कुलगुरूंकडून दिलगिरी**

विद्यार्थ्यास पाच वर्षांनंतर प्रमाणपत्र मिळत नाही, यावरुन विद्यापीठाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यास अधिसभा संपेपूर्वी डुप्लिकेट मार्कलिस्ट द्यावी, अशी मागणी सचिन गोर्डे-पाटील यांनी केली. कुलगुरूंना सर्व अधिकार असतानाही मार्कलिस्ट देण्यास अडचण काय, असा प्रश्नही त्यांनी मांडला. सदस्यांची आक्रमक भूमिका लक्षात घेता याबद्दल कुलगुरू डॉ. गोसावी यांनी दिलगिरी व्यक्त केली.

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

# कुलसचिव नेमणुकीवरून विद्यापीठ प्रशासन धारेवर

### अधिसभा सदस्यांकडून प्रश्नांचा भडिमार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदासाठी मुलाखत घेण्याआधीच संभाव्य व्यक्तीचे नाव बाहेर आले, ही नियुक्ती करताना विद्यापीठ कायद्यानुसार झाली किंवा कसे, निवड करताना अधिसभा सदस्यांना चर्चेला पाचारण करण्यात आले होते का, पूर्ण वेळ प्राध्यापकांची रखडलेली भरती, रिक्त असलेली अधिष्ठाता, कुलसचिव यांची पदे, 'एनआयआरएफ' रँकिंगमध्ये झालेली घसरण, मराठी भाषा विषयाकडे होणारे दुर्लक्ष, उपकेंद्राचे रखडलेले उद्घाटन, संशोधनाला मिळत नसलेला निधी अशा विविध विषयांवरून अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. कुलसचिवपदासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यात आली. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर अधिक बोलता येणार नसल्याचे सांगून कुलगुरूंनी वेळ मारून नेली.

> **"कुलसचिवपदासाठी नियमानुसार जाहिरात दिली होती. नियमांच्या चौकटीत राहून सर्व प्रक्रिया पार पाडली. यानंतर जे काही झाले ते सर्वांसमोर आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने फार बोलता येणार नाही. राजभवनाकडून काही सूचना आल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.**
> – डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाची अधिसभा मुख्य सभागृहात शनिवारी (३० नोव्हेंबर) पार पडली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य या वेळी उपस्थित होते. अधिसभेच्या सुरुवातीला कुलगुरू डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाचा अहवाल सादर केला. यानंतर मांडण्यात आलेल्या स्थगन प्रस्तावावर चर्चा करताना अधिसभा सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले.

दादाभाऊ शिनलकर म्हणाले, 'कुलसचिवपदाची नेमणूक पारदर्शक पद्धतीने व्हायला हवी. मुलाखत घेण्याअगोदरच उमेदवाराचे नाव बाहेर आलेच कसे? याची चौकशी झाली पाहिजे.'

सचिन गोरडे म्हणाले, 'कुलसचिवपदाच्या निवडीत गैरप्रकार झाले. अधिष्ठातापदावर प्रभारी नेमण्यात आले. कुलसचिवपदाच्या निवडप्रक्रियेत घडलेल्या प्रकारावरून विद्यापीठाची नाचक्की झाली. पूर्ण वेळ अधिष्ठातापदाचा विषय गेल्या अधिसभेतदेखील मांडला होता. त्या वेळी सभागृहाला आश्वस्त करून वेळ मारून नेण्यात आली.'

प्रसेनजित फडणवीस म्हणाले, '३९६ दिवसांपासून विद्यापीठाला पूर्ण वेळ कुलसचिव नाहीत. अधिसभा सदस्यांना चर्चेसाठी बोलावले जात नाही. पूर्ण वेळ कुलसचिव नसल्याचा परिणाम विद्यापीठाच्या कामकाजावर होत आहे. विद्यापीठाला कित्येक महिन्यांपासून पूर्ण वेळ क्रीडा संचालक नाहीत, याची दखल विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी.'

विद्यापीठात दर्जेदार संशोधन होत नाही, पेटंटसंदर्भात अपेक्षित सहकार्य केले जात नाही, महाविद्यालयांना संशोधनासाठी दिले जाणारे अनुदान मिळत नाही, विद्यापीठाने ठरविलेल्या दरापेक्षा तिप्पट दराने खरेदी केली जाते, असे सांगून यावर तोडगा काढण्याची मागणी अधिसभा सदस्यांनी केली.

'अधिसभा सदस्यांच्या प्रस्तावांची दखल विद्यापीठ प्रशासनाकडून घेतली जात नाही. ठरावांना मंजुरी मिळाली की नाही याबाबत स्पष्टता नसते. अधिसभेला प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. प्रशासनासकडून केवळ ठरावांची नोंद घेतली आहे, असे उत्तर दिले जात असून, याचा अर्थ काय समजायचा,' असा संतप्त सवाल अधिसभा सदस्यांनी या वेळी उपस्थित केला. यानंतर उत्तर देताना प्र-कुलगुरू डॉ. काळकर म्हणाले, 'कोणत्याही सदस्याचा प्रस्ताव नाकारला जात नाही. प्रत्येक अधिसभेच्या इतिवृत्तानूसार सकारात्मक पद्धतीने निर्णय घेतले जातात.'

### अधिसभा सुरू होण्यापूर्वी ठिय्या आंदोलन

व्यवस्थापन परिषदेचे सर्व ठराव आणि निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे. मात्र, अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याने अधिसभा सदस्यांनी सभागृहाबाहेर ठिय्या आंदोलन केले. विद्यापीठ प्रशासनाने सदस्यांशी चर्चा करून व्यवस्थापन परिषदेचे ठराव तत्काळ संकेतस्थळावर टाकण्याचे मान्य केले. त्यानंतर अधिसभा सुरू करण्यात आली.

Maharashtra Times 1.12.2024

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

01 Dec City 2024_005
01 Dec 2024

# कुलसचिव निवडीवरुन अधिसभेत गदारोळ

### अधिसभा सदस्यांनी काढले विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे वाभाडे

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात गेल्या दीड वर्षांच्या कार्यकाळात कुलसचिव आणि अधिष्ठातांची पदे भरली गेली नाहीत, मुलाखत घेण्याअगोदरच नव्या कुलसचिवांचे नाव बाहेर येतेच कसे? ज्यांची निवड झाली त्यांचेच चारित्र्यहनन झाले. त्यामुळे नियुक्ती करताना विद्यापीठ कायद्यातील तरतुदींचे पालन झाले का? विद्यापीठ प्रशासनाने मनमानी पद्धतीने कुलसचिव निवडीबाबत निर्णय घेतला, असा आरोप करीत अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे वाभाडे काढले.



विद्यापीठाची अधिसभा मुख्य सभागृहात शनिवारी झाली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, व्यवस्थापन परिषद व अधिसभेचे सदस्य उपस्थित होते. प्रारंभी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाचा अहवाल सादर केला. यानंतर पहिला स्थगन प्रस्ताव अधिसभा सदस्य सचिन गोरडे यांनी मांडला. या प्रस्तावावर चर्चा करताना अधिसभा सदस्यांनी आक्रमक पवित्रा घेत प्रशासनाला धारेवर धरले.

कुलसचिव पदाच्या निवडीत गैरप्रकार झाले. अधिष्ठाता पदावर प्रभारी नेमण्यात आले. मध्यंतरी कुलसचिव पदाच्या निवडप्रक्रियेत घडलेल्या प्रकारावरून विद्यापीठाची नाचक्की झाली. ज्यांची निवड झाली त्यांचेच चारित्र्यहनन सारखा दुर्दैवी प्रकार घडला. पुर्णवेळ अधिष्ठाता पदाचा विषय मागील अधिसभेत देखील मांडला होता. त्यावेळी सभागृहाला आश्वस्त करून वेळ मारून नेण्यात आली, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

कुलसचिव पदाची नेमणूक पारदर्शक पद्धतीने व्हायला हवी. मुलाखत घेण्याअगोदरच उमेदवाराचे नाव बाहेर आलेच कसे? याची चौकशी झाली पाहिजे, असे दादाभाऊ शिनलकर म्हणाले. प्रसेनजित फडणवीस म्हणाले, ३९६ दिवसांपासून विद्यापीठाला पुर्णवेळ कुलसचिव नाहीत. अधिसभा सदस्यांना चर्चेसाठी बोलावले जात नाही. पुर्णवेळ कुलसचिव नसल्याचा परिणाम विद्यापीठाच्या कामकाजावर होत आहे. विद्यापीठाला कित्येक महिन्यांपासून पुर्णवेळ क्रीडा संचालक नाहीत. याची दखल विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी.

सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना डॉ. गोसावी म्हणाले, कुलसचिव पदासाठी नियमानूसार जाहिरात दिली होती. नियमांच्या चौकटीत राहून सर्व प्रक्रिया पार पाडली. यानंतर जे काही झाले ते सर्वांसमोर आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने फार बोलता येणार नाही. राजभवनकडून काही सूचना आल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

### अधिसभेला गांभिर्याने घ्या

अधिसभा सदस्यांच्या प्रस्तावांची दखल विद्यापीठ प्रशासनाकडून घेतली जात नाही. अधिसभेचे ठरावांना मंजुरी मिळाली की नाही याबाबत स्पष्टता नसते. अधिसभेला प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. प्रशासनासकडून केवळ ठरावांची नोंद घेतली आहेए असे उत्तर दिले जात असून याचा अर्थ काय समजायचा? असा संतप्त सवाल अधिसभा सदस्यांनी प्रशासनाला विचारला.या विषयावर सभागृहात गदारोळ पाहावयास मिळाला.

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# अधिसभेत खडाजंगी!

### विविध विषयांवरून सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला विचारला जाब

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पूर्णवेळ प्राध्यापकांची रखडलेली भरती, रिक्त असलेली अधिष्ठाता व कुलसचिव यांची पदे, एनआयआरएफ रँकिंगमध्ये झालेली घसरण, मराठी भाषा विषयाकडे होणारे दुर्लक्ष, उपकेंद्राचे रखडलेले उद्घाटन, संशोधनाला मिळत नसलेला निधी, पेटंट मिळवण्यातील अडचणी अशा एक ना अनेक विषयांवरून अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे अक्षरश: वाभाडे काढले. त्यामुळे विद्यापीठ प्रशासन आणि अधिसभा सदस्यांमध्ये चांगलीच खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाली.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा शनिवारी पार पडली. यामध्ये विविध विषयांचे पडसाद उमटताना पाहायला मिळाले. विद्यापीठ प्रशासनाने मनमानी पध्दतीने कुलसचिव निवडीबाबत निर्णय घेतले. विद्यापीठाशी ज्यांचा काहीही संबंध नाही, अशा व्यक्तींच्या तक्रारीवरून कुलसचिव पदासाठी निश्चित केलेल्या व्यक्तीची विनाकारण बदनामी करण्यात आली. या सर्व घटनेचा अधिसभा सदस्यांनी सभागृहात जाहीर निषेध व्यक्त केला. केवळ कुलसचिव नाही, तर पूर्णवेळ अधिष्ठाता पद का भरले जात नाही असा प्रश्न अधिसभा सदस्यांनी उपस्थित केला. पूर्णवेळ कुलसचिव नियुक्ती प्रक्रियेमध्ये झालेल्या गैरप्रकारामुळे विद्यापीठाची बदनामी झाली, असा स्थगन प्रस्ताव सचिन गोर्डे पाटील यांनी मांडला. त्यावर विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये जोरदार चर्चा झाली. व्यवस्थापन परिषद सदस्यांनी बाकी कामे केली नसती तरी चालले असते, त्यांनी पूर्णवेळ पदे का नियुक्त केली नाहीत, अशी खंतही गोर्डे पाटील यांनी व्यक्त केली.

अधिसभा सदस्य डॉ. विनायक आंबेकर यांनी कुलसचिव नियुक्तीवरून निर्माण झालेल्या वादावर बोचरी टिप्पणी केली. दादाभाऊ शिनलकर म्हणाले, ज्या व्यक्तीची निवड कुलसचिव पदासाठी विद्यापीठाने केली होती, त्याच व्यक्तीची कुलसचिव म्हणून नियुक्ती करावी, अन्यथा या निवड प्रक्रियेत असणाऱ्या सदस्यांना यापुढे कोणतेही काम देऊ नये. यावेळी प्रसेनजीत फडणवीस यांनीही विद्यापीठाने चौकशी समितीच्या नावाखाली विद्यापीठांबाहेरील व्यक्तींना जेवणावळी घातल्या याबद्दल नाराजी व्यक्त केली. सभागृहात झालेल्या वादळी चर्चेनंतर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, कुलसचिव नियुक्ती प्रकरणी सदस्यांनी भावना व्यक्त केल्या. त्या प्रशासनाने शांतपणे एकूण घेतल्या. परंतु हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असून विद्यापीठाने याची सर्व माहिती राजभवन कार्यालयाकडे पाठविली असल्याचे स्पष्ट करत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

वित्त विभागाचा कारभार चव्हाट्यावर... माय ३ वर

### ठराव संकेतस्थळावर प्रसिद्ध न केल्यावरून गदारोळ

व्यवस्थापन परिषदेचे सर्व ठराव आणि निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे. परंतु दोन अधिसभा झाल्या तरीही अद्याप याची अंमलबजावणी न झाल्याने अधिसभा सदस्यांनी सभागृहाबाहेर ठिय्या आंदोलन केले. त्यामुळे अधिसभेच्या सुरुवातीलाच वातावरण तापले. दरम्यान, विद्यापीठ प्रशासनाने सदस्यांशी चर्चा केली आणि व्यवस्थापन परिषदेचे ठराव तत्काळ संकेतस्थळावर टाकण्याचे मान्य केले. त्यानंतर अधिसभा सुरू करण्यात आली. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र - कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि अन्य मान्यवरांनी अधिसभा सदस्यांशी चर्चा केली. हे विद्यापीठ सार्वजनिक असून, तेथील निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक असतानाही प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे अधिसभा सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

### काही प्रमुख प्रश्नांवर सदस्यांकडून प्रशासनाची कानउघाडणी

विद्यापीठात दर्जेदार संशोधन होत नाही. त्याचबरोबर पेटंटसंदर्भात अपेक्षित सहकार्य केले जात नाही. महाविद्यालयांना संशोधनासाठी दिले जाणारे अनुदान मिळत नाही. विद्यापीठाने ठरवलेल्या दरापेक्षा तिप्पट दराने खरेदी केली जाते. यातून विद्यार्थ्यांच्या पैशांची व्हेंडरवर उधळण केली जात आहे. तर विद्यापीठात तब्बल १८ कोटींची फायबर ऑप्टीकची खरेदी केली गेली आहे. या सर्व प्रमुख प्रश्नांवर तोडगा काढण्याची मागणी करत अधिसभा सदस्य आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

My Pune Edition
Dec 01, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# वित्त विभागाचा कारभार चव्हाट्यावर

## डॉ. विनायक आंबेकरांनी विद्यापीठ प्रशासनाला फोडला घाम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वित्त विभागातील अधिकाऱ्यांनी अत्यंत बेजबाबदारपणे नियमांचे उल्लंघन करून लेखापरीक्षण अहवाल तयार केला आहे. लेखापरीक्षण अहवालात ज्या गोष्टी नमु करण्यात आल्या आहेत. त्यातून अधिसभा सदस्यांची दिशाभूल होत आहे. तसेच वित्त विभाग कोणतेही शिस्त पाळत नसल्याचा ठपका ठेवत लेखापरीक्षण अहवाल कायद्यानुसार बेकायदेशीर असल्याचा घणाघात करत अधिसभा सदस्य डॉ. विनायक आंबेकरांनी विद्यापीठ प्रशासनाला शनिवारी चांगलाच घाम फोडल्याचे पाहायला मिळाले.

व्यवस्थापन परीषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी २०२३-२४ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेसमोर सादर केला. यामध्ये विद्यापीठाकडे चारशे त्र्याहत्तर कोटी, पंचवीस लाख, आठ हजार, एकशे सहासष्ठ रुपये जमा झाले, तर चारशे बाहत्तर कोटी, अठ्ठ्याण्णव लाख, अठ्ठ्याऐंशी हजार, एकशे त्रेचाळीस रुपये खर्च झाले. तर सव्वीस लाख, वीस हजार, तेवीस रुपये अधिक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

डॉ. आंबेकर म्हणाले, अधिसभा सदस्यांकडे फक्त दोन अधिकार राहिले आहेत. एक अर्थसंकल्प आणि दुसरा लेखापरीक्षित खाती त्यामुळे याबाबतीत अधिसभा सदस्यांनी गांभीर्याने पाहिले पाहिजे. विद्यापीठाच्या वित्त विभागाचे अधिकारी अत्यंत बेजबाबदार आहेत. त्यांनी ३१ मार्च २०२४ ला लेखापरीक्षण करून तो अहवाल ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी अधिसभेसमोर ठेवणे कायद्याने बंधनकारक होते. त्यामुळे अधिसभेसमोर ठेवण्यात आलेला हा अहवाल कायद्यानेच बेकायदेशीर असल्याचा ठपका ठेवत अधिसभा या चुकीच्या अहवालाचे समर्थन करणार का, असा सवाल अधिसभा सदस्यांना उपस्थित केला. त्याचबरोबर विद्यापीठाने सादर केलेला अहवाल आणि त्यातील नमूद अकाऊंटस नियमाला धरून नसल्याचेदेखील त्यांनी सांगितले. त्याचबरोबर ट्रस्ट फंडाला जनरल फंडात कापून विद्यापीठाने तिसरी चूक केली आहे. त्यामुळे विद्यापीठाचे अकाऊंटस नियमबाह्य आहेत. वित्त विभागाचे अधिकारी छातीठोकपणे मर्कैंटाईल सिस्टिमचा वित्त विभागात वापर करत असल्याचे सांगत असले तरी ते खोटे असल्याचेदेखील डॉ. आंबेकर यांनी विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी तुम्ही वित्त व लेखा समितीचे सदस्य आहात. तुमच्या सल्ल्यानुसारच अहवाल बनविण्यात आला असल्याचे सांगितल्यानंतर डॉ. आंबेकर अधिक आक्रमक झाले. तुम्ही चुकीच्या अहवालासाठी आमचा ढाल म्हणून वापर करत आहात. त्यामुळे संबंधित पदाचा मी तत्काळ राजीनामा देत असल्याचे त्यांनी अधिसभेतच जाहीर करून टाकले. त्यांच्या या आक्रमक पावित्र्याने विद्यापीठ प्रशासनाची चांगलीच दमछाक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे वित्त व लेखा अहवालातील त्रुटी मंजूर झाल्याशिवाय अहवालाला मंजुरी दिली जाणार नसल्याचा आक्रमक पवित्रा अधिसभा सदस्यांनी घेऊन अहवालाची मंजुरी वगळून अन्य विषय पुढे नेण्याचे आवाहन विद्यापीठाला केले. अधिसभा सदस्यांची आक्रमक भूमिका पाहून अहवालाची मंजुरी आणि त्यावरील चर्चा रविवारी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु यामुळे वित्त व लेखा विभागाचा कारभार अत्यंत बेजबाबदारपणे होत असून, संबंधित विभागाची लक्तरेच अधिसभा सदस्यांनी अधिसभेत काढल्याचे दिसून आले.

### आज प्रश्नोत्तरे आणि लेखापरीक्षण अहवालासाठी अधिसभा

विद्यापीठाची अधिसभा शनिवारीच संपविण्याचा विचार विद्यापीठ प्रशासनाचा होता. परंतु लेखापरीक्षण अहवालात असेलल्या अक्षम्य चुका आणि अधिसभा सदस्यांचे विविध प्रस्ताव तसेच प्रश्नोत्तरे पूर्ण करण्यासाठी आज रविवारी (दि.१ डिसेंबर)देखील अधिसभा घेण्यात येणार असल्याची माहिती अधिसभा सदस्यांनी दिली आहे.



My Pune Edition
Dec 01, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

# कुलसचिव निवडीवरून अधिसभेत वादळी चर्चा

## सदस्यांनी प्रशासनाला धरले धारेवर

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंना मागील दीड वर्षाच्या कार्यकाळात कुलसचिव आणि अधिष्ठातांची पदे भरता आलेली नाहीत. मुलाखत घेण्याअगोदरच नव्या कुलसचिवांचे नाव बाहेर येतेच कसे? ज्यांची निवड झाली त्यांची बदनामी करण्यात आली. त्यामुळे नियुक्ती करताना विद्यापीठ कायद्यातील तरतुदींचे पालन झाले का? निवड करताना अधिसभा सदस्यांना चर्चेला बोलावले का? अशा प्रश्नांची सरबत्ती करत अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे वाभाडे काढले.

विद्यापीठाची अधिसभा मुख्य सभागृहात शनिवारी पार पडली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते. अधिसभेच्या सुरूवातीला कुलगुरू डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाचा अहवाल सादर करण्यात आला. यानंतर पहिला स्थगन प्रस्ताव अधिसभा सदस्य सचिन गोरडे यांनी मांडला. या प्रस्तावावर चर्चा करताना अधिसभा सदस्यांनी आक्रमक पवित्रा घेत विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले.

गोरडे म्हणाले, कुलसचिव पदाच्या निवडीत गैरप्रकार झाले. अधिष्ठाता पदावर प्रभारी नेमण्यात आले. मध्यंतरी कुलसचिव पदाच्या निवडप्रक्रियेत घडलेल्या प्रकारावरून



विद्यापीठाची नाचक्की झाली. ज्यांची निवड झाली त्यांचेच चारित्र्यहनन सारखा दुर्दैवी प्रकार घडला. पैसे देऊन चुकीची माहिती प्रसारित करण्यात आली. पूर्णवेळ अधिष्ठाता पदाचा विषय मागील अधिसभेत देखील मांडला होता. त्यावेळी सभागृहाला आश्वस्त करून वेळ मारून नेण्यात आली.

दादाभाऊ शिनलकर म्हणाले, कुलसचिव पदाची नेमणूक पारदर्शक पद्धतीने व्हायला हवी. मुलाखत घेण्याअगोदरच उमेदवाराचे नाव बाहेर आलेच कसे? याची चौकशी झाली पाहिजे. प्रसेनजित फडणवीस म्हणाले, ३९६ दिवसांपासून विद्यापीठाला पूर्णवेळ कुलसचिव नाहीत. अधिसभा सदस्यांना चर्चेसाठी बोलावले जात नाही. पूर्णवेळ कुलसचिव नसल्याचा परिणाम विद्यापीठाच्या कामकाजावर होत आहे. विद्यापीठाला कित्येक महिन्यांपासून पूर्णवेळ क्रीडा संचालक नाहीत. याची दखल विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी.

सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना डॉ. गोसावी म्हणाले, कुलसचिव पदासाठी नियमानुसार जाहिरात दिली होती. नियमांच्या चौकटीत राहून सर्व प्रक्रिया पार पाडली. यानंतर जे काही झाले ते सर्वांसमोर आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने फार बोलता येणार नाही. राजभवनकडून काही सूचना आल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

अधिसभा सदस्यांच्या प्रस्तावांची दखल विद्यापीठ प्रशासनाकडून घेतली जात नाही. अधिसभेचे ठरावांना मंजुरी मिळाली की नाही याबाबत स्पष्टता नसते. अधिसभेला प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. प्रशासनासकडून केवळ ठरावांची नोंद घेतली आहे असे उत्तर दिले जात असून याचा अर्थ काय समजायचा? असा संतप्त सवाल अधिसभा सदस्यांनी प्रशासनाला विचारला. तसेच प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने सभागृहात मोठा गदारोळ पाहायला मिळाला. यानंतर उत्तर देताना डॉ. काळकर म्हणाले, कोणत्याही सदस्याचा प्रस्ताव नाकारला जात नाही. प्रत्येक अधिसभेच्या इतिवृत्तानुसार सकारात्मक पद्धतीने निर्णय घेतले जातात.

Kesari 1.12.2024

# 'एनईपी'च्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र दुसरा

### ई-समर्थ, स्वयम् आदींबाबत मात्र सुधारणा आवश्यक



(चित्र : एआय)

- सिडनहॅम कॉलेजमध्ये याबाबत दोन दिवसीय कार्यशाळेत मंथन
- राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची उपस्थिती
- तमिळनाडू अव्वल असल्याची माहिती

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणा'च्या (एनईपी) अंमलबजावणीचा आढावा घेण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून, मुंबईतील सिडनहॅम कॉलेजमध्ये याबाबत दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली. राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंसह उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव, राज्यपाल तथा कुलपतींचे प्रधान सचिव आणि दिल्लीतील काही अधिकारी या वेळी उपस्थित होते. एनईपी अंमलबजावणीत विविध १४ मुद्द्यांमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर असून, काही क्षेत्रांमध्ये सुधारणेस वाव असल्याचे या वेळी स्पष्ट झाले.

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने राज्यांच्या शिक्षण विभागांच्या सचिवांसह विविध अधिकाऱ्यांची बैठक १२ आणि १३ नोव्हेंबर रोजी दिल्लीत घेतली. या बैठकीनंतर आता दिल्लीतील अधिकारी विविध राज्यांमध्ये जाऊन प्रत्येक राज्याच्या कामगिरीचा आढावा घेत आहेत. या प्रक्रियेत राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या सिडनहॅम कॉलेजमध्ये २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी कार्यशाळा घेतली.

राष्ट्रीय शिक्षण धोरण यशस्वी होण्यासाठी १४ मुद्दे महत्त्वाचे आहेत. या १४ मुद्द्यांमध्ये राज्यातील विविध विद्यापीठांची आणि राज्याची कामगिरी कशी आहे, याचा आढावा या कार्यशाळेत घेण्यात आला. अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स आणि ई-समर्थ या दोन प्रणालींचा कार्यभार सांभाळणारे दिल्लीतील पथक या कार्यशाळेसाठी आले होते. त्यांच्या निरीक्षणानुसार, तमिळनाडू राज्य सर्वच मुद्द्यांवर यशस्वी कामगिरी करत आहे. त्या खालोखाल महाराष्ट्र सर्व पातळीवर उत्तम कार्य करत आहे, अशी माहिती राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी दिली.

राज्यातील विविध विद्यापीठांना काही आघाड्यांवर कामगिरीमध्ये सुधारणा करण्याची गरज असल्याचेही रस्तोगी यांनी स्पष्ट केले. यात अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्समध्ये विद्यार्थ्यांचे क्रेडिट अपलोड करणे, ई-समर्थमधील सर्व मॉड्युलचा वापर करणे, अपार-आयडी तयार करणे यांचा समावेश आहे. सुधारणेसाठी काय करता येईल, याबाबतही या वेळी विचारमंथन झाल्याचे रस्तोगी म्हणाले.

या कार्यशाळेसाठी राज्यातील सर्व अकृषी, खासगी, स्वायत्त आणि अभिमत विद्यापीठांचे कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक उपस्थित होते. राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. मोहितकर आदी अधिकारीही उपस्थित होते. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली सिडनहॅम कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास धुरे यांनी या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले.

Maharashtra Times 1.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

TODAY पुणे, रविवार, १ डिसेंबर २०२४ सकाळ 3

# अन्य योजनांसाठी पैसे; विद्यार्थ्यांकडे मात्र दुर्लक्ष

## फेलोशिपबाबत बार्टी, सारथी, महाज्योतीच्या संशोधक विद्यार्थ्यांची संतप्त भावना

**पुणे, ता. ३० :** "मुख्यमंत्री लाडकी बहीण सारख्या योजनांसाठी सरकारकडे पैसे आहेत; मात्र संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्यासाठी पैसे नाहीत," असा नाराजीचा सूर विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. तसेच फेलोशिप प्रक्रियेमध्ये होत असलेल्या प्रशासकीय दिरंगाईवरून विद्यार्थ्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.




विधानसभा निवडणुका तोंडावर असताना राज्य सरकारने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था' (बार्टी), 'छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था' (सारथी), आणि 'महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था'च्या (महाज्योती) संशोधक विद्यार्थ्यांना सरसकट १०० टक्के फेलोशिप मंजूर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

मात्र आतापर्यंत एक रुपया देखील या विद्यार्थ्यांना मिळालेला नाही. यामुळे सारथी १६१, बार्टी ८६१, तर महाज्योतीचे ८६९ अशा दोन हजार ६९१ विद्यार्थ्यांच्या संशोधनाचे काम प्रलंबित आहे.

याचे वार्तांकन दैनिक 'सकाळ'मध्ये करण्यात आले होते. या वृत्ताला प्रतिसाद देत विद्यार्थ्यांनी आपले मत नोंदवत तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांच्याशी फोन, मेसेज आणि व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

" बार्टी, सारथी, आणि महाज्योतीच्या संशोधक विद्यार्थ्यांच्या फेलोशिप संदर्भात 'सकाळ'ने केलेली 'घोषणा झाल्या आणि मंजुरीला मिळेना गती' ही बातमी वाचली. सकाळने अतिशय महत्त्वाच्या प्रश्नावर आवाज उठविण्याचे काम केले आहे. सरकारने मोठमोठ्या घोषणा केलेली आहेत परंतु प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी कधी होणार हा एक मोठा प्रश्न आहे! संशोधक विद्यार्थ्यांनी दोन ते अडीच वर्षे मोर्चे, आंदोलन, तीन वर्षे वाढून मोठ्या संघर्षाने फेलोशिप प्राप्त केली आहे. परंतु सरकार १०० टक्के फेलोशिपची घोषणा होऊन देखील अद्यापही विद्यार्थ्यांच्या खात्यावर एक रुपया देखील पडलेला नाही. जर विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळत नाही तर ते उत्तम दर्जाचे संशोधन कसा पद्धतीने करू शकतील? 'सकाळ'च्या माध्यमातून आम्ही सरकारला विनंती करत आहोत की त्यांनी तत्काळ स्वरूपात तिन्ही संस्थेच्या संशोधक विद्यार्थ्यांच्या खात्यावर फेलोशिपची रक्कम वर्ग करावी.
**- राहुल ससाणे,** आझाद विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

राज्य सरकारद्वारे संशोधनासाठी विविध संस्थांतर्फे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती या वेळेवर न मिळाल्यामुळे होणाऱ्या उत्कृष्ट संशोधनावर याचा विपरीत परिणाम पडतो. इतर सर्व स्वार्थी योजनांसाठी सरकार पैसे पुरवते मात्र विद्यार्थी फेलोशिप पासून वंचित राहतात ही बाब गंभीर आहे.
**- प्रा. डॉ. धनाजी थोरे,** उपप्राचार्य

मागील अडीच वर्षे झाले संशोधन कमी मात्र फेलोशिपसाठी आंदोलन जास्त करावी लागली. तेव्हा शासनाद्वारे न्याय मिळाला. मात्र, अद्याप एकही रुपया आमच्या खात्यात जमा झालेला नाही. संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक साह्याची गरज लागणार आहे. सरकारने निधी संस्थेकडे वर्ग केला तरच संस्थेद्वारे आम्हाला फेलोशिप मिळेल. त्यामुळे यासंदर्भात शासनाने जातीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.
**- संशोधक विद्यार्थी,** सारथी

महाराष्ट्रातील तीनही संस्थांमधील विद्यार्थ्यांना फेलोशिप घोषित होऊन बराच वेळ गेला आहे. अजूनही अनेक अटी आणि नियम संस्था व विद्यापीठे लावून विद्यार्थ्यांना फेलोशिपच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण न करता विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळण्यासाठी शासनस्तरावरून प्रयत्न झाले पाहिजेत.
**- वैभव जानकर,**
संशोधक विद्यार्थी

फेलोशिप विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सरकारकडून जाणीवपूर्वक दिरंगाई करण्यात येत आहे. तसेच सारथी, बार्टी आणि महाज्योती या संस्थांतर्फे संशोधक विद्यार्थ्यांना त्यांची उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे. अनेक विद्यार्थी आंदोलनामध्ये सामील होते. त्यामुळे ते विद्यार्थ्यांची उपस्थित राहू शकले नाही. त्यामुळे ही अट शिथिल करावी आणि दोन वर्षांची उपस्थिती ग्राह्य धरावी.
**- संशोधक विद्यार्थी**

संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के फेलोशिप मिळावी यासाठी मी व पल्लवी गायकवाड यांनी बार्टी कार्यालयासमोर तब्बल १२ दिवस आमरण उपोषण केले होते. २०२१च्या संशोधक विद्यार्थ्यांना जवळजवळ तीन वर्षे पूर्ण होत आहेत. तरी देखील त्यांच्या खात्यावर एक रुपयाही जमा झालेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधन कार्यात असंख्य अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचे कारण सरकारचा बेजबाबदारपणा आणि बार्टी कार्यालयातील कर्मचाऱ्यांची उदासीनता. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी आपले पूर्ण कागदपत्रे कार्यालयात सादर केले आहेत, अशा विद्यार्थ्यांच्या खात्यावर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत फेलोशिपची रक्कम जमा झाली नाही, तर पुन्हा एकदा बार्टी कार्यालयासमोर तत्काळ आंदोलन छेडण्यात येईल.
**- हर्षवर्धन दवणे,** संशोधक विद्यार्थी संघर्ष कृती समिती

Sakal 1.12.2024

## News Paper Clippings During December 2024

## Section: Education

लोकसत्ता

# पुणे पुस्तक महोत्सवातर्फे ११ डिसेंबरला वाचन तास

## 'शांतता, पुणेकर वाचत आहेत' उपक्रमाचे आयोजन

**लोकसत्ता प्रतिनिधी**




**पुणे :** राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे (नॅशनल बुक ट्रस्ट) १४ ते २२ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'तर्फे ११ डिसेंबर रोजी वाचन तास उपक्रम राबविण्यात येणार आहे. वाचन चळवळीला बळ मिळावे आणि वाचनासंदर्भातील सजगता वाढावी, या हेतूने 'शांतता पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम बुधवारी दुपारी बारा ते एक या वेळात होणार आहे.

फर्ग्युसन महाविद्यालायाच्या परिसरात आयोजित करण्यात आलेल्या पुणे पुस्तक महोत्सवातील या उपक्रमाला गेल्या वर्षी प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. यामध्ये हजारो पुणेकरांनी सहभाग घेऊन वाचन चळवळीला पाठबळ दिले होते. यावर्षीही हजारोंच्या संख्येने पुणेकर यामध्ये सहभागी होतील या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत. शहरातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सगळ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे. पुणे शहरातील सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा आणि अन्य शैक्षणिक संस्था या सर्वांना यामध्ये सामावून घेण्यात येणार आहे. तसेच पुणे शहरातील सर्व रुग्णालये, सार्वजनिक गणेश मंडळे, ग्रंथालये, सर्व शासकीय कार्यालये, खासगी आणि सरकारी आस्थापने तसेच पुणे शहरातील सर्व मोठे चौक, कलाकार कट्टा, पर्वती, शनिवार वाडा, सारसबाग यांसह सर्व ऐतिहासिक स्थळांवर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी रविवारी दिली. संजय चाकणे आणि आनंद काटीकर या वेळी उपस्थित होते.

या उपक्रमातील सहभागाचे छायाचित्र पाठविण्यासाठी तसेच कुठे आणि कोणते पुस्तक वाचले याची माहिती पाठविण्यासाठी https:// pbf24. in/ register ही लिंक आणि क्यूआर कोड विकसित करण्यात आला आहे. यावर माहिती पाठविणाऱ्यांना 'शांतता पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तरी या भव्य उपक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन पांडे यांनी या वेळी केले.

02/12/2024 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता

# विद्यापीठाच्या आर्थिक शिस्तीवर सवाल

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालावरून प्रशासनाला धारेवर धरल्यानंतर रविवारी या अहवालाला मंजुरी देण्यात आली. वित्त विभागाने चुका मान्य करून दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले. मात्र, विद्यापीठ प्रशासनाच्या आर्थिक शिस्तीवर अधिसभा सदस्यांनी सवाल उपस्थित केला.

विद्यापीठाच्या अधिसभेचा रविवारी समारोप झाला. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे या वेळी उपस्थित होते. विद्यापीठाच्या लेखापरीक्षण अहवालावर शनिवारी अधिसभा सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, या प्रश्नांना प्रशासनाकडून समाधानकारक उत्तरे देण्यात न आल्याने अहवाल मंजूर करण्यास सदस्यांनी नकार दिला. त्यामुळे अहवालावर चर्चा करून मंजुरीसाठी रविवारीही अधिसभा झाली. या संदर्भात झालेल्या चर्चेत वित्त विभागाकडून निधीच्या पुनर्विनियोजनाचे तपशील सादर करून काही चुका मान्य करून त्यात सुधारणा करण्याचे सांगण्यात आले. त्यानंतर लेखापरीक्षण अहवालाच्या मंजुरीचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

आर्थिक शिस्तीकडे विद्यापीठ किती लक्ष देते, हे लेखापरीक्षण अहवालातून स्पष्ट झाले आहे. गेल्या तीन अधिसभा बैठकांमध्ये आर्थिक शिस्तीकडे होत असलेल्या दुर्लक्षाची बाब निदर्शनास आणून देण्यात आली होती.

02/12/2024 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City _2 Dec 2024_005
02 Dec 2024

# अखेर विद्यापीठाचा ऑडिट रिपोर्ट मान्य

## सावित्रीबाई फुले विद्यापीठ प्रशासनाकडून चुका झाल्याची कबुली

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल म्हणजेच ऑडिट रिपोर्टवरून अधिसभेच्या पहिल्या दिवशी सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनास धारेवर धरले होते आणि हा अहवाल अमान्य केला. अधिसभेच्या दुसऱ्या दिवशी दुरुस्तीसह हा अहवाल मांडण्यात आला. अहवालात झालेल्या काही चुका वित्त विभागाने मान्य केल्या आणि पुढील अधिसभेत सुधारणा करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर सदस्यांनी या अहलावास मान्यता दिल्याने विद्यापीठ प्रशासनाने अखेर सुटकेचा निःश्वास सोडला.

विद्यापीठाच्या लेखा परीक्षणाचा अहवालावरून सदस्य विनायक आंबेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर प्रशासनाकडून काहीच अपेक्षित उत्तरे मिळत नसल्याने अहवाल स्थगित करण्यात आला होता. एका विशिष्ट कामासाठी निधीची तरतूद केली असताना, तो निधी अन्य बाबीकडे वर्ग केला. त्याचे सर्व तपशील सादर करा, अशी मागणी त्यांनी केली. जी रक्कम देणगीद्वारे प्राप्त झाली आहे, त्याची नोंद त्याच घटकासाठी होणे आवश्यक आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्याबाबत अधिसभेत चर्चा झाली. वित्त विभागाने निधीच्या पुनर्विनियोजनाचे सर्व तपशील सादर करून काही चुका मान्य केल्यानंतर प्रस्ताव मान्य करण्यात आला.

दरम्यान, विद्यापीठ आर्थिक शिस्तीकडे किती लक्ष देते, ही बाब लेखा परीक्षण अहवालावरून दिसून येते. मात्र, गेल्या तीन अधिसभेच्या बैठकीत आर्थिक शिस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब सदस्यांनी निदर्शनास आणून दिली. त्यानंतरही वित्त विभागाने सकारात्मक पाऊल उचलले नाही, यावरून सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतली. विद्यापीठाचा अर्थसंकल्प निर्माण करताना, सादर करताना आणि अंमलबजावणी करण्यात सुधारणा होणे आवश्यक आहे, असेही सदस्यांनी सभागृहात सांगितले.

यंदा पहिल्यादांच विद्यापीठाच्या ऑडिट रिपोर्टवरून विद्यापीठ प्रशासन हतबल झाले होते. या अहवालास विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानंतरच राज्यपाल व विधिमंडळाकडे मंजुरीसाठी पाठवले जाते. त्यामुळ हा अहवाल मान्य करून घेणे विद्यापीठापुढे आव्हान होते. अखेर विद्यापीठ प्रशासन व सदस्यांनी एकत्रितपणे मार्ग काढत हा अहवाल मान्य केला.

### सदस्यांनी घेतलेले आक्षेप

- विकासकामांचा निधी अन्यत्र वळविणे
- देणगीच्या रक्कमा सर्वसाधारण निधीत दाखविणे
- ताळेबंदातील खर्चाबाबतचा तपशील सादर न करणे
- विद्यार्थी कल्याण निधीचा विनियोगाबाबत अस्पष्टता

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# प्रश्नोत्तरे, प्रस्तावांनी सांगता!

## अधिसभा सदस्यांच्या प्रश्नांवर मार्ग काढण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे आश्वासन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

लेखापरीक्षण अहवालात असलेल्या मोठ्या प्रमाणातील चुका, अधिसभा सदस्यांचे विविध प्रस्ताव तसेच प्रश्नोत्तरे पूर्ण करण्यासाठी रविवारी (दि. १ डिसेंबर) अधिसभा घेण्यात आली. या वेळी अधिसभा सदस्यांचे प्रस्ताव आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांवर सकारात्मक पद्धतीने मार्ग काढण्याचे आश्वासन विद्यापीठ प्रशासनाने दिल्यानंतर दुपारनंतर अधिसभेची सांगता झाल्याचे पाहायला मिळाले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा दोन दिवस २९ आणि ३० नोव्हेंबरला पार पडली. पूर्णवेळ प्राध्यापकांची रखडलेली भरती, रिक्त असलेली अधिष्ठाता व कुलसचिव यांची पदे, एनआयआरएफ रँकिंगमध्ये झालेली घसरण, मराठी भाषा विषयाकडे होणारे दुर्लक्ष, उपकेंद्राचे रखडलेले उद्घाटन, संशोधनाला मिळत नसलेला निधी, पेटंट मिळवण्यातील अडचणी, लेखापरीक्षण अहवालातील त्रुटी, परीक्षा विभागातील गोंधळ, विद्यापीठातील प्रभारीराज आदी प्रमुख मुद्द्यांवरून अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. यातून अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे अक्षरशः वाभाडे काढले. त्यामुळे विद्यापीठ प्रशासन आणि अधिसभा सदस्यांमध्ये दोन दिवस चांगलीच खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले.

२०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या विद्यापीठाच्या लेखापरीक्षण अहवालावरून अधिसभेच्या पहिल्या दिवशी सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनास चांगलेच धारेवर धरले होते आणि हा अहवाल अमान्य केला. अधिसभेच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात दुरुस्तीसह हा अहवाल मांडण्यात आला. अहवालात झालेल्या काही चुका वित्त विभागाने मान्य केल्या. पुढील अधिसभेत सुधारणा करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर सदस्यांनी या अहवालास मान्यता दिल्याने विद्यापीठ प्रशासनाने अखेर सुटकेचा नि:श्वास सोडला.

### विद्यापीठ प्रशासनाला चांगली तयारी करावी लागणार

रविवारी अधिसभा सदस्यांनी विविध प्रस्ताव सादर केले. या प्रस्तावांवर साधक-बाधक चर्चा होऊन प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. तसेच, काही अधिसभा सदस्यांनी प्रश्न उपस्थित करून विद्यापीठ प्रशासनाला जाब विचारला. प्रस्ताव आणि प्रश्नोत्तरे झाल्यानंतर अधिसभेचा समारोप करण्यात आला. येत्या दोन ते तीन महिन्यांमध्ये पुन्हा विद्यापीठात अधिसभा घेण्यात येणार आहे. अधिसभा सदस्यांनी आत्ता झालेल्या अधिसभेत घेतलेल्या आक्रमक भूमिकेवरून येत्या अधिसभेसाठी विद्यापीठ प्रशासनाला चांगली तयारी करावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



विद्यापीठाच्या लेखापरीक्षणाचा अहवालावरून अधिसभा सदस्य डॉ. विनायक आंबेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विद्यापीठ प्रशासनाकडून काहीच अपेक्षित उत्तरे मिळत नव्हती. त्यामुळे हा अहवाल शनिवारी स्थगित करण्यात आला होता. एका विशिष्ट कामासाठी निधीची तरतूद केली असताना त्यातील निधी अन्य बाबींकडे वर्गीकरण करण्यात आले. त्याचे सर्व तपशील सादर करा, अशी आग्रहाची मागणी त्यांनी केली. तसेच, जी रक्कम देणगीद्वारे प्राप्त झाली, त्याची नोंद त्याच घटकासाठी होणे आवश्यक आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. या सर्व मागण्यांवर रविवारी अधिसभेत चर्चा झाली. वित्त विभागाने निधीच्या पुन:विनियोजनाचे सर्व तपशील सादर केले तसेच काही चुका मान्य केल्या. त्यानंतर हा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

दरम्यान, विद्यापीठ आर्थिक शिस्तीकडे किती लक्ष देते, ही बाब लेखापरीक्षणाच्या अहवालावरून दिसून येत आसते. परंतु, गेल्या तीन अधिसभांच्या बैठकीत आर्थिक शिस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब अधिसभा सदस्यांनी निदर्शनास आणून दिली. तरीदेखील वित्त विभागाकडून अपेक्षित पाऊल उचलले गेले नाही, यावरून सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतली. तसेच, विद्यापीठाचा अर्थसंकल्प निर्माण करताना, सादर करताना आणि त्याची अंमलबजावणी करण्यात सुधारणा होणे आवश्यक आहे, असेही सदस्यांनी सभागृहात सांगितले.

Pune Edition
Dec 02, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# 'शांतता पुणेकर वाचत आहेत' उपक्रम

### वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ११ रोजी आयोजन

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे येत्या ११ डिसेंबरला दुपारी १२ ते १ या वेळेत 'शांतता पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. न्यासातर्फे येत्या १४ ते २२ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या पुणे पुस्तक महोत्सवाची सुरुवात या कार्यक्रमाने होणार आहे.

वाचन चळवळीला बळ मिळावे आणि वाचनासंदर्भातील सजगता वाढावी, या हेतूने राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे फर्ग्युसन महाविद्यालायाच्या परिसरात पुणे पुस्तक महोत्सव आयोजित केला आहे. याही वर्षी महोत्सवामध्ये अनेक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी डॉ. संजय चाकणे आणि आनंद काटीकर उपस्थित होते.




**"वाचन उपक्रमात सहभागी होण्यासाठी कोणते पुस्तक वाचायचे, याची कोणतीही अट नाही. नागरिकांनी त्यांना आवडेल त्या लेखकाचे, विषयाचे पुस्तक निवडावे. जिथे आहात तिथे पुस्तकाचे वाचन करा आणि पुस्तकाबरोबरच छायाचित्रही पाठवा.**

**- राजेश पांडे,** संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

पांडे म्हणाले, 'सामूहिक पुस्तक वाचन उपक्रमाचे यंदा दुसरे वर्ष असून, गेल्या वर्षी वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. लहानांसह ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटातील पुणेकरांनी सहभाग घेऊन या चळवळीला पाठबळ दिले होते. या वर्षीदेखील हजारोंच्या संख्येने पुणेकर यामध्ये सहभागी होतील या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. शहरातील सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा आणि अन्य शैक्षणिक संस्थाबरोबर बोलणी सुरू आहे. रुग्णालये, सार्वजनिक गणेश मंडळे, ग्रंथालये, प्रशासकीय कार्यालयांनाही आवाहन केले आहे,' असे पांडे यांनी सांगितले.

पुणे शहरातील सर्व मोठे चौक, कलाकार कट्टा, पर्वती, शनिवारवाडा, सारसबाग यांसह सर्व ऐतिहासिक स्थळांवर उपक्रम राबविण्यात येणार आहे. उपक्रमातील सहभागाचे छायाचित्र पाठविण्यासाठी; तसेच कुठे आणि कोणते पुस्तक वाचले याची माहिती पाठविण्यासाठी https://pbf24.in/register ही लिंक आणि क्यूआर कोड विकसित करण्यात आला आहे. यावर माहिती पाठविणाऱ्यांना 'शांतता पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे पांडे यांनी सांगितले.

Maharashtra Times 2.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*



२०२४ सकाळ २

# आर्थिक लेख्यांसह अहवालांना मान्यता

## अधिसभा सदस्यांच्या मागण्यांनुसार त्रुटींमध्ये दुरुस्तीची प्रशासनाची ग्वाही

**पुणे, ता. १ : विकासकामांचा निधी अन्यत्र वळविणे, विद्यापीठाला मिळणाऱ्या देणग्यांच्या रकमा सर्वसाधारण निधीत दाखविणे, ताळेबंदातील खर्चाबाबतचा सविस्तर तपशील सादर न करणे, विद्यार्थी कल्याण निधीचा विनियोगाबाबत अस्पष्टता अशा त्रुटींमध्ये दुरुस्ती करण्याच्या मागण्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी केल्या. यासह आवश्यक दुरुस्त्या करण्याबाबत सूचना करीत सदस्यांनी विद्यापीठाच्या २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे, संविधानिक लेखा परिक्षकांचा लेखा परीक्षण आणि अनुपालन अहवालास रविवारी अखेर मंजुरी दिली.**

विद्यापीठाच्या पूर्वनियोजनाप्रमाणे अधिसभा शनिवारी एकच दिवस होती. लेखापरीक्षण अहवालावरून काल सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले आणि हा अहवाल अमान्य केला. यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सदस्यांनी रविवारी अधिसभा सुरू ठेवण्याची आग्रही मागणी केली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी ही मागणी मान्य केली. त्यानुसार आज अहवालावर विस्तृत चर्चा करण्यात आली. अहवालातील काही चुका मान्य करीत वित्त विभागाने दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर सदस्यांनी अहवालास मान्यता दिल्याने विद्यापीठ प्रशासनाने अखेर सुटकेचा निःश्वास सोडला.

विद्यार्थी कल्याण निधीसह अन्य कल्याण निधीचा सविस्तर आढावा विद्यापीठाने सादर करावा, अशी मागणी अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी केली. त्यावर हा तपशील पुढील महिन्याभरात जाहीर करण्याचे आश्वासन डॉ. गोसावी यांनी दिले.

या वेळी आंबेकर यांनी विद्यापीठाने सादर केलेल्या ताळेबंदातील तांत्रिक चुका काढत, त्यात दुरुस्ती करण्यास आणि ताळेबंद वाणिज्य विभागाकडून तयार करून घेण्याची सूचना केली आणि तसे विद्यापीठ प्रशासनाने मान्य केले.

दरम्यान, विकास कामांचा निधी केवळ दिला जातो, परंतु तो वापरला जाईल आणि तो विकास खऱ्या अर्थाने डोळ्यांना दिसायला हवा, असेही सदस्यांनी सुचविले. प्रभारी पदांचा कालावधी ठरविण्यात यावा आणि एकाचीच जास्त काळासाठी नियुक्ती न करता बदल करण्यात यावेत अशी विनंती सदस्यांनी केली. ती विद्यापीठाने मान्य केली.

**अधिसभेत अनुमोदन मिळालेले काही प्रस्ताव**

- प्रत्येक विद्याशाखेत व्यवसायाभिमुख कमी कालावधीचे अभ्यासक्रम सुरू करणे
- विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय (सांस्कृतिक) पुरस्कार' सुरू करणे
- बॅरिस्टर मु. रा. जयकर यांच्या साहित्याचे स्वतंत्र दालन त्यांच्या नावाने असलेल्या ग्रंथालयात सुरू करणे

Sakal 2.12.2024

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

City | Pune Times Mirror | Monday, December 2, 2024 | 5

# UGC allows flexibility in duration of course

### Degree will be considered as equivalent to one of standard period for further study

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror




Higher education institutions in the country will now allow undergraduate students to reduce or increase the duration of their degree courses. For this, permission has been given to these institutions to implement accelerated degree programmes (ADPs) and extended degree programmes (EDPs) in a meeting held this week, informed University Grants Commission (UGC) Chairman M Jagadesh Kumar.

Every student will be able to choose a course according to their intellectual and skill capabilities. Students can choose to shorten or lengthen the duration of their course based on their learning ability. The degree certificate will mention which form of education the student has taken, ADP or EDP. Additionally, Kumar clarified that this degree will be considered equivalent to a standard duration degree for further education or employment.

The draft in this regard will be made public soon for stakeholders' feedback. Students can choose to shorten or lengthen the duration of their course based on their learning ability.

Sanjay Patil, a professor at a renowned university, said, "I welcome the UGC's decision to increase or decrease the semester. Lakhs of students who had to stop their studies due to personal, family, and administrative reasons will get relief. Lakhs of students' mark sheets, transfer certificates, and degree certificates are stuck in colleges and universities. But the path has been cleared for students who had to complete their studies partially."

Priya Sonawane, a student who had left her studies, said, "I welcome the UGC's decision. My studies were interrupted due to marriage. But now I have the opportunity to complete my degree. Lakhs of students who had to leave their studies due to marriage, job, or personal reasons, will get a chance again."

What is the plan?

Under the ADP, students will be allowed to complete their degree in a shorter period of three or four years by earning additional credits each semester. In addition, under the EDP, students have the option of extending the duration of the course by earning fewer credits each semester. In either the ADP or EDP, students will earn the same total credits as in a standard-length programme.

REAL RICH
Invest in Real Estate on time to stay ahead.
Find out how!
#RealRichInsights
REAL RICH
COMING SOON IN MARATHI!
Available on amazon and at leading bookstores
thee_realrich RealRich The Real Rich Show

Pune Mirror 2.12.2024

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 3 Dec 2024_005
03 Dec 2024

# 'त्या' महाविद्यालयावर कारवाई होणार का?

## पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मराठी विषय घेण्यास अटकाव

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २ -** मराठी भाषेच्या संवर्धनासाठी स्थापन करण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना मराठी विषय घेऊ दिले जात नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबत विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीनंतर विद्यापीठ प्रशासनने चौकशी समिती स्थापन केली होती. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून, संबंधित अहवाल अधिष्ठाता मंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे या महाविद्यालयांवर कारवाई करण्याचे धाडस विद्यापीठ करणार का, हेच आता पाहावे लागणार आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. असे असताना विद्यापीठ संलग्न असलेल्या शिक्रापूर येथील कस्तुरी शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात मराठी भाषेचा अहवेलना केली जात असल्याचे विद्यार्थ्यांची तक्रार आहे, तसेच याबाबत एका विद्यार्थ्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसिद्ध झाला आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित महाविद्यालयावर कारवाई करावी, असा स्थगन प्रस्ताव अधिसभा सदस्य दादाभाऊ शिनलकर यांनी अधिसभेसमोर सादर केला होता. त्यावर आधिसभेत सदस्यांनी मनोगत व्यक्त केले. पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना पूर्ण वेळ प्राचार्य नाहीत, तसेच पूर्णवेळ प्राध्यापकही नाहीत, अशा अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. अशा महाविद्यालयांची संलग्नता रद्द करावी, अशी मागणी दादाभाऊ शिनलकर यांनी केली. या चर्चेत हर्ष गायकवाड यांनीही सहभाग घेतला.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांची तक्रार प्राप्त झाली होती. त्याची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने समिती नेमली होती. समितीचा अहवाल विद्यापीठाकडे प्राप्त झाला असून, तो अधिष्ठाता मंडळासमोर ठेवून त्यावर चर्चा केली जाईल, तसेच विद्यापीठ कायद्यानुसार आवश्यक कार्यवाही केली जाईल.
> – कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी

दरम्यान, संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मराठी विषय घेऊ न देणे, ही गंभीर बाब आहे. या महाविद्यालयाची संलग्नता रद्द करून कारवाई करावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा युवासेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी दिला आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# प्राध्यापक भरती पुन्हा लांबणीवर

## राज्यपाल कार्यालयाच्या विद्यापीठांना सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील अकृषी विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या जागा अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. राज्य सरकारच्या मान्यतेमुळे या रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, प्राध्यापक भरतीची प्रक्रिया थांबवण्याच्या सूचना राज्यपाल कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता प्राध्यापक भरती पुन्हा लांबणीवर पडणार असल्याचे चित्र आहे.

राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या २६०० जागा मंजूर आहेत. त्यांपैकी १२०० जागा रिक्त आहेत. प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवण्यासाठी राज्यभरातील पात्रताधारकांनी अनेक वर्षे संघर्ष केला आहे. अनेकदा आंदोलने, उपोषणे केली आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठांतील रिक्त असलेल्या ६४९ जागांवर भरती प्रक्रिया राबवण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यानंतर विद्यापीठांनी बिंदूनामावली, आरक्षण अशी सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून भरतीसाठीच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या. काही विद्यापीठांमध्ये अर्ज प्रक्रिया पूर्ण होऊन पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्याचे नियोजन आहे.

### शैक्षणिक कामकाजावर परिणाम

गेल्या काही वर्षांत न झालेली भरतीप्रक्रिया, निवृत्ती किंवा अन्य कारणांमुळे रिक्त झालेली पदे यामुळे विद्यापीठांमधील विभागांमध्ये प्राध्यापकांची फारच कमी झाली आहे. त्याचा परिणाम शैक्षणिक




कामकाजावर होत आहे. विद्यापीठांना कंत्राटी प्राध्यापक नियुक्त करून शैक्षणिक कामकाज करावे लागत आहे. प्राध्यापक भरतीला मिळालेली मंजुरी राज्यभरातील हजारो पात्रताधारकांसह विद्यापीठांसाठीही दिलासादायक ठरली होती. मात्र, राज्यपाल कार्यालयाने पुढील आदेशापर्यंत प्राध्यापक भरती न करण्याच्या सूचना दिल्याने विद्यापीठांना ही प्रक्रिया थांबवावी लागणार आहे. राज्यपाल कार्यालयाच्या पत्रामुळे भरती प्रक्रियेच्या भविष्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

> बऱ्याच वर्षांपासून राज्यभरातील हजारो पात्रताधारक प्राध्यापक भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. विद्यापीठांची प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरु झाल्याने पात्रताधारकांसाठी एक आशा निर्माण झाली होती. मात्र, आता ही प्रक्रिया अचानक थांबवली जाणे पात्रताधारकांसाठी अडवणीचे ठरणार आहे. भरती प्रक्रिया पुन्हा सुरु होणार का, त्यात काही बदल केले जाणार का, असे अनेक नवे प्रश्न आता निर्माण होत आहेत.
> -सुरेश देवढे-पाटील,
> नेट-सेट-पीएच.डी.धारक संघर्ष समिती

03/12/2024 | Mumbai(Pune) | Page : 2
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# दिव्यांग उमेदवारांची अडवणूक

## प्राध्यापकपदाची पात्रता पूर्ण करूनही महाविद्यालयांकडून नोकऱ्या नाहीच

मटा विशेष

हर्ष दुधे
harsh.dudhe@timesofindia.com

**पुणे :** प्राध्यापकपदाची शैक्षणिक पात्रता पूर्ण करूनही अंध आणि अल्पदृष्टी प्रवर्गातील उमेदवारांना राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांकडून नोकरीसाठी डावलण्यात येत आहे. त्यामुळे या प्रवर्गासाठीच्या सुमारे ९९ टक्के जागा रिक्त आहेत.

खडतर परिस्थितीत उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने संबंधित उमेदवार खचले असून, नैराश्याच्या गर्तेत आहेत. या उमेदवारांच्या प्रश्नाबाबत राज्य सरकार आणि प्रशासनाला जाग येईल का, असा सवाल उमेदवारांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

दिव्यांग आरक्षणामध्ये अंध आणि अल्पदृष्टी प्रवर्ग 'अ' मध्ये प्राध्यकांच्या जागा भरण्याची तरतूद आहे. मात्र, या आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने दिव्यांग कल्याण आयुक्तालय आणि राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ठोस पावले उचलली नाहीत. त्यामुळेच राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये अंध आणि अल्पदृष्टी प्रवर्ग 'अ' मधील पात्र उमेदवारांना नोकरीच्या संधींपासून दूर ठेवण्याचे प्रकार सुरू आहेत. अंध आणि अल्पदृष्टी प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होत असल्याचे दिसून येत असले, तरी सरकारी विभागांकडून कागदी घोडे नाचविण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत.

राज्य सरकारने प्राध्यापक भरतीचा निर्णय घेतल्यानंतर, अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालयांकडून जाहिराती प्रसिद्ध करण्यात येत आहेत. मात्र, या जाहिरातींमध्ये अंध आणि अल्पदृष्टी प्रवर्गातील उमेवारांच्या जागांची माहिती देण्यात येत नसल्याचे चित्र आहे. मुंबई आणि संगमनेर येथील महाविद्यालयांनी या प्रवर्गातील जागा दाखवल्या. पात्र उमेदवार मुलाखतीसाठी गेले असता, त्यांच्याऐवजी इतर दिव्यांग उमेदवारांना पैसे भरून नोकरी देण्यात येत असल्याचे किंवा जागा जाणीवपूर्वक रिक्त ठेवण्यात येत असल्याचे दिसून आले.

**"राज्य सरकारच्या उदासीन धोरणामुळे आमच्यापैकी काही जण तासिका तत्त्वाचे बळी ठरले आहेत. एका तासाचे वेतन घेऊन या लोकांना सहा तास वेठबिगाराप्रमाणे काम करावे लागते. महाविद्यालयाचे प्रशासन, प्राचार्य, उपप्राचार्य, विभाग प्रमुख उमेदवारांना खूप त्रास देतात. शारीरिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या या बांधवांना मानसिकदृष्ट्या ही दुर्बल बनवण्याचा प्रयत्नही केला जातो. 'तुम्ही पर्मनंट नाहीत. तुम्हाला येण्या जाण्याच्या वेळेमध्ये सवलत मिळणार नाही. वेळेवर आला नाहीत, तर कामावरून काढून टाकले जाईल', अशी धमकी दिली जाते. प्रशासनाच्या या धोरणामुळे अंध व अल्पदृष्टी उमेदवारांचे विवाहही होत नाहीत.**

– एक तासिका तत्त्वावरील प्राध्यापक

### पात्रता असूनही उपासमारीची वेळ



अंध आणि अल्पदृष्टी असलेल्या मुलांनी उच्च शिक्षण पूर्ण करून, सहायक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणारी पात्रता आणि पीएचडी पूर्ण केल्या आहेत. या पात्रता पूर्ण करताना त्यांन अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. असे असूही राज्य सरकारचा उच्च शिक्षण विभाग आणि दिव्यांग कल्याण आयुक्त यांच्या नाकर्तेपणामुळे आरक्षित सहायक प्राध्यापकांच्या जागा मागील ७५ वर्षांत कधीही भरल्या गेल्या नाहीत. त्यामुळेच अंध व अल्पदृष्टी उमेदवारांचा १०० टक्के अनुशेष आणि १०० टक्के रिक्त जागा महाराष्ट्रामध्ये आहेत, अशी माहिती तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकाने दिली.

### सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष

मुंबई उच्च न्यायालयाने सन २००७मध्ये दिव्यांगांच्या जागा भरल्याशिवाय कोणत्याही जागा भरू नयेत, असा स्पष्ट आदेश दिला. त्यानंतर २०१३ मध्येही 'नॅशनल फेडरेशन फॉर ब्लाइंड'ने दाखल केलेल्या याचिकेवरील निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने दिव्यांगांच्या रिक्त जागा व अनुशेष भरण्याचा आदेश दिला. त्यानंतर २०१४मध्येही विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला पाठवलेल्या पत्रात अपंग उमेदवारांसाठी आरक्षण ठेवण्याचे स्पष्ट केले आहे.

Maharashtra Times 3.12.2024

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रभात
City 3 Dec 2024_013
03 Dec 2024

# विद्यापीठाकडून ठोस आश्वासन; विद्यार्थ्यांचे उपोषण मागे

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वेळेत पदवी पूर्ण करू न शकलेले विद्यार्थी उपोषणाला बसले होते. एखादा अभ्यासक्रम ठराविक वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती आहे. मात्र, काही कारणास्तव विद्यार्थ्यांना शिक्षणात खंड घ्यावा लागला. अंतिम वर्षात शिकत असताना विद्यापीठाने त्यांचे पीआरएन (परमनंट रजिस्ट्रेशन नंबर) ब्लॉक केले. त्यामुळे या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज करता येत नव्हते. त्यावर उपोषणास बसलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून ठोस आश्वासन दिल्याने विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेतले.

विद्यापीठाच्या अधिसभेपूर्वी मुख्य इमारतीच्या समोर विद्यार्थ्यांनी उपोषणाचे शस्त्र उगारले होते. विद्यार्थ्यांनी आमचे पीएनआर अनब्लॉक करण्याची आग्रहाची मागणी केली. परंतु, आता अधिसभा होणार आहे. त्यात हा विषय येऊ नये, त्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी रात्री उशिरा विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांना कुलसचिवांचे लेखी पत्र दिले. तुमची मागणी कायद्याच्या चौकटीत सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.

त्यापूर्वी आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर विद्यापीठात असलेल्या विद्यार्थ्यांचे मागण्यांचा विचार करावा. त्यांना परीक्षेला बसण्याची संधी द्यावी, अशी मागणी केली होती. याप्रकरणी विद्यापीठ प्रशासाने संबंधित विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा रोहित पवार यांनी व्यक्त केली.

## News Paper Clippings During December 2024

## Section: Education

City | Pune Times Mirror Tuesday, December 3, 2024 | 3

# Uproar in SPPU senate meeting over appointment of registrar

### Members demand clarification from administration over adjournment motion, question remuneration to retired sports director

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

The Savitribai Phule Pune University has been functioning without a full-time registrar for over three years. Still, the administration is not serious about appointing a suitable person to the post, claimed senate members. Although the university conducted a recruitment process, the Senate members argue that it lacked transparency and failed to follow proper procedures.

Several months ago, a heated dispute broke out between Senate members and student organisations over the selection process for the crucial post. The repercussions of that dispute were felt in the senate meeting held on November 30, where members accused the university administration of making arbitrary decisions regarding the registrar's appointment.

Earlier, the person who was selected for the important position faced severe backlash. Consequently, he filed a defamation suit in the court against people who questioned him. Interestingly, he claimed that those who raised fingers at him were not connected with the university. During the meeting, the senate members expressed protest in the House over this incident.

Currently, Jyoti Bhakre, a faculty member at SPPU, is serving as the in-charge registrar.



FILE PHOTO

The senate meeting, chaired by Vice-Chancellor Dr Suresh Gosavi, witnessed a heated discussion over the appointment of the registrar. Many members expressed their outrage raising several concerns, including the vacant dean position.

Sachin Gorde Patil moved an adjournment motion, stating that the university has been unfairly defamed due to irregularities in the appointment process. He highlighted that the recruitment for both the full-time registrar and dean positions has been stalled. Protests, demonstrations, and legal actions have started in the varsity over the registrar's appointment.

Gorde Patil further alleged that a website had been paid Rs. 20,000 to publish biased news and expressed regret that the management council had not appointed full-time officials, questioning why they failed to address these key positions. He also accused the university of neglecting to fill vacant faculty positions.

Senate member Vinayak Ambekar sharply criticised the controversy surrounding the registrar's appointment, while Harsh Gaikwad demanded that a character certificate be made mandatory and obtained for all types of appointments.

Dadabhau Shinalkar, a senate member, demanded, "The person whom the university had selected for the post should be appointed as the registrar, otherwise the members who are in the selection process should not be given any further work."

Meanwhile, Prasenjit Fadnavis also expressed his displeasure over the university hosting people from outside the university in the name of an inquiry committee. "How did the name of the person selected as the registrar leak without being announced by the university and why was he defamed?" he questioned.

After a heated discussion in the senate, Dr. Suresh Gosavi said, "Members have expressed their concerns regarding the appointment of the registrar. The administration has noted their concerns. However, this matter is currently under judicial review, and the university has sent all relevant information to the Raj Bhavan office."

Meanwhile, the post of a full-time sports director at SPPU is also lying vacant. Gorde Patil questioned how the university could continue providing allowances to former sports director Deepak Mane even after his retirement, raising concerns about the university's handling of such appointments.

Pune Mirror 4.12.2024

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### उद्या विद्यापीठाचा १२५वा पदवी प्रदान सोहळा

#### ९३ हजार २१९ विद्यार्थ्यांना होणार वितरण

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करत असून, या अमृतमहोत्सवी वर्षात विद्यापीठाचा १२५ वा पदवी प्रदान समारंभ उद्या (दि. ५ डिसेंबर) आयोजित करण्यात आला आहे. निती आयोगाचे सदस्य आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलपती विजयकुमार सारस्वत यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या इरावती कर्वे सभागृहात पदवी प्रदान समारंभ पार पडणार आहे. विद्यापीठातर्फे ९३ हजार २१९ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण केले जाणार आहे.

विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभास निती आयोगाचे सदस्य आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलपती विजयकुमार सारस्वत यांच्यासह राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे उपस्थित राहणार आहेत.

या वेळी विविध विद्या शाखांमधील १७ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाचे वितरण केले जाणार आहे. यामध्ये विद्यापीठाच्या कमवा व शिका योजनेंतर्गत श्रीमती नीलिमाताई पवार सुवर्णपदक हे २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संगमनेर कॉलेजच्या दीपाली माने या विद्यार्थिनीला दिले जाणार आहे. तसेच पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या श्रावणी रोडे हिला, तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मुंबई विद्यापीठाच्या श्रेया कुलकर्णी या विद्यार्थिनीला दिले जाणार आहे. पदवी प्रदान समारंभानंतर सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठविले जाणार आहे.

विद्यापीठातर्फे ७३ हजार ११३ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र, १९ हजार ८४१ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र, ९३ विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र, ६१ विद्यार्थ्यांना पीजी डिप्लोमा डिग्री, तर १६५ विद्यार्थ्यांना पीएचडी प्रमाणपत्र दिले जाणार आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. पत्रकार परिषदेस कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे आदी उपस्थित होते.

My Pune Edition
Dec 04, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### बीएड अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार

#### नवीन बदलांची अधिसूचना लवकरच जारी केली जाणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून बॅचलर ऑफ एज्युकेशन म्हणजेच बीएडचे स्वरूप आणि अभ्यासक्रम बदलणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत प्रस्तावित बदलामध्ये दहा वर्षांनंतर बीएड अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार आहे. बीएड महाविद्यालयांसाठी २०२५ पासून नवीन बदलांची अधिसूचना लवकरच जारी केली जाणार आहे. यामध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे.



राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेचे (एनसीटीई) अध्यक्ष प्रा. पंकज अरोरा यांनी ही माहिती दिली. अरोरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिक्षक पात्रता चाचणीच्या नियम पान ८ वर ▶

**...या विद्यार्थ्यांनाच मिळेल बीएडला प्रवेश**

- एका वर्षात बीएड : चार वर्षांचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना यामध्ये प्रवेश घेता येईल.
- दोन वर्षांत बीएड : तीन वर्षांच्या पदवीधर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळेल.

**...या अभ्यासक्रमांचा होणार विस्तार**

बीए-बीएड, बीएस्सी-बीएड आणि बीकॉम-बीएडची पहिली बॅच २०२३ मध्ये सुरू झाली आहे. २०२५ पासून त्यात शारीरिक शिक्षण, कला शिक्षण, योग शिक्षण आणि संस्कृत शिक्षण, हे चार नवीन स्पेशलायझेशन अभ्यासक्रम जोडले जातील. बारावीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यात प्रवेश घेता येणार आहे.

Pune Edition
Dec 04, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### बीएड अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार

आणि निकषांमध्ये देखील बदल केले जाणार आहेत. हे बदल २०२७ मध्ये चार वर्षांच्या एकात्मिक पदवी उमेदवारांच्या बॅचच्या आधी केले जातील. शैक्षणिक धोरणांतर्गत पायाभूत, पूर्वतयारी, मध्यम आणि माध्यमिक स्तर, या चार भागांनुसार शिक्षक तयार केले जातील. पदवीपूर्व अभ्यासक्रमातील बदलांमुळे विविध बीएड कार्यक्रम पुन्हा सुरू केले जाणार असल्याचे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 04, 2024 Page No. 08
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
04 Dec City 2024_013
04 Dec 2024
www.dainikprabhat.com

# २०२६-२७ पासून बी.एड. पुन्हा वर्षभराचे

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३** - बॅचलर ऑफ एज्युकेशन म्हणजेच बी.एड.चे स्वरूप आणि अभ्यासक्रम २०२६-२७ पासून बदलणार आहे. हा अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत हा बदल होत आहे.

शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) च्या नियम आणि निकषांमध्येही बदल केले जाणार आहेत. हे बदल २०२७ मध्ये चार वर्षांच्या एकात्मिक पदवी उमेदवारांच्या बॅचच्या आधी केले जातील. शैक्षणिक धोरणांतर्गत,



पायाभूत, पूर्वतयारी, मध्यम आणि माध्यमिक स्तर या चार भागांनुसार शिक्षक तयार केले जातील. पदवीपूर्व अभ्यासक्रमातील बदलांमुळे विविध बीएड कार्यक्रम पुन्हा सुरू केले जात आहेत. बीएड महाविद्यालयांसाठी नवीन बदलांची अधिसूचना लवकरच जारी केली जाणार आहे. यामध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे.

चार वर्षांचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना एका वर्षात बी.एड.साठी प्रवेश घेता येईल. तीन वर्षांच्या पदवीधर विद्यार्थ्यांना दोन वर्षांतील बी.एड. साठी प्रवेश मिळेल. पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळणार आहे. पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळेल. चार वर्षांचे एकात्मिक बी.एड. आणि दोन वर्षांचे बी.एड. शिकणारे विद्यार्थी एम.एड. च्या पदवीसाठी प्रवेश घेऊ शकतील.

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठाचा ५ डिसेंबर रोजी १२५वा पदवी प्रदान समारंभ

## डॉ. विजय कुमार सारस्वत यांची उपस्थिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२५वा पदवी प्रदान समारंभ ५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. नीती आयोगाचे सदस्य डॉ. विजय कुमार सारस्वत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३, एप्रिल-मे २०२४मध्ये विविध विद्याशाखांतील पदवी, पदव्युत्तर स्तरावरील ९३ हजार २१९ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे वितरित केली जाणार आहेत.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत दिली. प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर या वेळी उपस्थित होते. एकूण ९३ हजार २१९ विद्यार्थ्यांमध्ये पदवी अभ्यासक्रमाचे ७३ हजार १३, पदव्युत्तर पदवीचे १९ हजार ८४१, पदविका पदवी अभ्यासक्रमाचे ९३, पदव्युत्तर पदविकाचे ६१, पीएच.डी.चे १६५ विद्यार्थी आहेत.

गोसावी म्हणाले, की विद्यापीठात नव्याने उभारण्यात आलेल्या इरावती कर्वे सामाजिक शास्त्र संकुलात पदवीप्रदान होईल. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित राहण्याची शक्यता आहे. एकूण १७ विद्यार्थ्यांना २८ सुवर्णपदके वितरित करण्यात येणार आहेत. त्यात १० विद्यार्थिनी आणि ७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. डी. जे. मालपाणी वाणिज्य आणि बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यलयातील दीपाली माने या विद्यार्थीनीला श्रीमती नीलिमाताई पवार सुवर्णपदक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील श्रावणी रोटे आदींना पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत.

### विद्यापीठात 'ग्लोबल एज्युकेशन फेअर'

**विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची माहिती होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात येत्या शनिवारी (७ डिसेंबर) ग्लोबल एज्युकेशन फेअर आयोजन करण्यात आले आहे. या फेअरमध्ये जगभरातील ४० नामांकित परदेशी विद्यापीठे सहभागी होणार आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, कॅनडा अशा देशांतील विद्यापीठांची प्रवेश प्रक्रिया, पात्रता परीक्षांबाबतची माहिती विद्यार्थी, पालकांना दिली जाणार आहे.**

04/12/2024 | Pune | Page : 16
Source : https://epaper.loksatta.com

---

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# अचूक पदवी प्रमाणपत्रांसाठी विद्यापीठाकडून विशेष सुविधा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाचा वार्षिक पदवी प्रदान (दीक्षान्त) समारंभ मंगळवार, ७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता फोर्ट संकुलातील सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रथम सत्र २०२४ म्हणजेच उन्हाळी सत्रामध्ये विद्यापीठाने घेतलेल्या विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर मराठीतील (देवनागरी) नाव अचूक यावे आणि या नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी विद्यापीठामार्फत पदवी प्रमाणपत्रांचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जात आहे. पदवी प्रमाणपत्रावरील मराठीतील नावात काही दुरुस्ती असल्यास अशा सर्व दुरुस्त्या करण्यासाठी व पडताळणीसाठी विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्राचा तपशील विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर ७ ते १७ डिसेंबर दरम्यान सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपलब्ध करण्यात येणार आहे. 'सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांनी दिलेल्या मुदतीत संकेतस्थळास भेट देऊन पदवी प्रमाणपत्रावरील मराठीतील (देवनागरी) नावाचा तपशील अचूक असल्याची खात्री करावी. तसेच आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात', असे आवाहन मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी केले आहे.

04/12/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

### New draft UGC rules moot flexibility; UG, PG students can pick any discipline

Manash.Gohain
@timesofindia.com

**New Delhi:** Students from any stream in Class 12 can now pursue an UG programme of their choice, and UG students can join any PG discipline, provided they clear a national- or university-level entrance exam, such as CUET, according to a draft of new UGC regulations aiming to bring sweeping reforms in India's higher education.

UGC also proposes to offer biannual admissions, flexibility in minimum credit requirements to obtain a degree, and interdisciplinary learning opportunities through an option of pursuing two programmes simultaneously.

The regulations released on Thursday for feedback and suggestions, will be applicable to central, state, private and deemed universities. These aim at dismantling the traditional disciplinary rigidities by allowing students to choose programmes outside their prior streams, provided they meet entrance exam requirements.

▶'Flexibility...' P 15

**INTERIM CERTS**

- Students' **professional experiences can translate into academic credits**
- Institutes may conduct **biannual admissions:** during July-Aug and Jan-Feb
- Students can transition between academic levels with interim certificates
- Applicable to **central, state, pvt, deemed univs**

### State decides to offer one-year BEd degree in tune with NEP from 2026

Times News Network

**Pune:** The state directorate of higher education has decided to offer just one format of BEd degree for a one-year duration from 2026-27 academic year. It will be in alignment with National Education Policy, 2020.

Students completing a four-year undergraduate or a postgraduate programme will be eligible for admission. The course is now offered in multiple durations ranging from two to four years, and department officials said the change will restructure teacher training programmes based on NEP guidelines. Specialisations in physical, art, yoga and Sanskrit education will be offered by colleges from 2025.

Director of higher and technical education Shailendra Deolankar said, "A notification about the new changes for BEd colleges will be issued in 2025. Students who complete a four-year degree programme will be eligible for admission."

National Council for Teacher Education president Pankaj Arora recently said changes will also be made to the Teacher Eligibility Test rules. "These changes will be implemented before the batch for the four-year integrated degree in 2027. A notification will soon be issued," he said.

Under NEP, teachers will undergo training based on foundational, preparatory, middle, and secondary levels.

### Changes can spur flexibility, adaptability, says UGC chief

▶ Continued from Page 1

Irrespective of the disciplines taken by a student in level 4/class 12 schooling, a student is eligible for admission in any discipline of UG programme, if the student qualifies the national level or the university level entrance examination in the discipline of UG programme," the regulations state.

UGC chairperson M Jagadesh Kumar said, "The draft regulations 2024 aim at transforming higher education by promoting flexibility, inclusivity, and adaptability. By removing rigid disciplinary boundaries, students can now explore diverse learning opportunities, ensuring India's education system evolves to global standards."

The latest framework also encourages mobility between vocational and general education, and recognition of prior learning — whereby students' professional experiences can translate into academic credits. Under these regulations, higher education institutions are authorised to conduct admissions twice a year — during July/Aug, and Jan/Feb.



By removing rigid disciplinary boundaries, students can explore diverse learning opportunities, said M Jagadesh Kumar

The draft further introduces options for multiple entry and exit points, allowing students to transition between academic levels with interim certifications such as diplomas or degrees, depending on their earned credits. Minimum of 50% of total credits must be earned in the student's chosen core subject to obtain a degree, while the remaining can be accumulated through multidisciplinary or skill-based courses.

The reforms also redefine attendance norms, allowing HEIs to tailor minimum requirements based on the programme structure, in alignment with the National Education Policy (NEP) 2020. The focus on continuous formative assessment and flexibility in curriculum content reflects a commitment to fostering holistic and multidisciplinary education, the UGC said.

The regulations also have provisions for three or four-year duration for UG degrees, along with optional extensions under the extended degree programme or acceleration through the accelerated degree programme.

For PG, a two-year programme is standard, though graduates from four-year UG courses may qualify for a one-year master's programme. The UGC has also acknowledged learning acquired through non-formal channels, introducing the recognition of prior learning provision.

The regulations advocate for integration of skilling, internships and apprenticeships into UG and PG curricula. The credit-based structure aims at seamless transitions and interdisciplinary exploration, with academic bank of credits serving as central repository for credit storage and transfer across institutions.

The Times of India 6.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

TIMES NATION

THE TIMES OF INDIA, NAGPUR
FRIDAY, DECEMBER 6, 2024

# UGC: Students can explore e-learning

▸Continued from P 1

According to the draft regulations, "Irrespective of the disciplines taken by a student in level 4/class 12 schooling, a student is eligible for admission in any discipline of Under Graduate programme, if the student qualifies the national level or university level entrance examination in the discipline of UG programme."

UGC chairperson M Jagadesh Kumar said, "The draft UGC regulations, 2024, aim at transforming higher education by promoting flexibility, inclusivity, and adaptability. By removing rigid disciplinary boundaries, students can now explore diverse learning opportunities, ensuring India's education system evolves to global standards."

**The latest framework also encourages mobility between vocational and general education, and recognition of prior learning – whereby students' professional experiences can translate into academic credits**

The latest framework also encourages mobility between vocational and general education, and recognition of prior learning — whereby students' professional experiences can translate into academic credits. Under these regulations, higher education institutions (HEIs) are authorised to conduct admissions twice a year — during July/Aug, and Jan/Feb.

The draft further introduces options for multiple entry and exit points, allowing students to transition between academic levels with interim certifications such as diplomas or degrees, depending on their earned credits. Minimum of 50% of total credits must be earned in the student's chossen core subject to obtain a degree, while the remaining can be accumulated through multidisciplinary or skill-based courses.

The reforms also redefine attendance norms, allowing HEIs to tailor minimum requirements based on the programme structure, in alignment with the National Education Policy (NEP) 2020. The focus on continuous formative assessment and flexibility in curriculum content reflects a commitment to fostering holistic and multidisciplinary education, the UGC said.

The regulations also have provisions for three or four year duration for UG degrees, with optional extensions under the extended degree programme or acceleration via the accelerated degree programme.

For a Post Graduation, a two-year programme is the standard requirement, though graduates from four-year UG courses may also qualify for a one-year master's programme.

The UGC has also acknowledged that learning acquired through non-formal channels, introducing the recognition of prior learning provisions.

The regulations advocate for the integration of skilling, internships, and apprenticeships into the UG and PG curricula. The credit-based structure aims at seamless transitions and interdisciplinary exploration, with the academic bank of credits serving as a centralised repository for credit storage and transfer across multiple institutions, as the student desires.

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# 'रासेयो'चे विशेष शिबिर राबवा

## संलग्न महाविद्यालयांना विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत (रासेयो) प्रत्येक रासेयो महाविद्यालय दत्तक गाव योजना राबविते आणि याअंतर्गत ७ दिवसीय विशेष शिबिर घेतले जाते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षात युथ फॉर माय भारत आणि युथ फॉर डिजिटल लिटरसी या विषयावर आधारित विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, असे निर्देश संलग्न महाविद्यालयांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दिले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिलेल्या निर्देशानुसार, महाविद्यालयांनी माय भारत पोर्टलवर नोंदणी करून बॅनर, टी-शर्ट, कार्यक्रमपत्रिकेवर संबंधित थीमचा उल्लेख करावा. विशेषतः महाविद्यालय आयोजित विशेष शिबिरास, राष्ट्र, राज्य व विद्यापीठस्तरावरील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा, विभाग समन्वयक अनपेक्षितपणे भेट देणार आहेत. त्यामुळे ग्रामीण शिबिरांचे नियोजन सकारात्मक व परिणामकारक करावे. महाविद्यालयाने एक गाव दत्तक घेऊन दत्तक गावांच्या विकासकामांबाबत आढावा घेऊन विद्यापीठाने ठरवून दिलेले उपक्रम आयोजित करायचे आहेत. महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजना एककांनी या वर्षीचा विषयनिहाय विद्यार्थी सहभाग, विशेष शिबिराचे आयोजन अत्यंत नेटके, सर्वव्यापी आणि अधिक परिणामकारक करणे अधिक महत्त्वाचे मानले आहे. यावर्षी प्रत्येक रासेयो एककाने हे ७ दिवसीय विशेष शिबिर ३१ जानेवारी २०२५ पर्यंत आयोजित करणे आवश्यक आहे. विशेष शिबिरासाठीचे प्रत्येक रासेयो एककाकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. हे प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात येत असून, दि. १० डिसेंबर २०२४ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना एककांनी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

नियोजन बैठकीमध्ये उपस्थित राहणाऱ्या आणि दिलेल्या कालावधीमध्ये प्रस्ताव सादर करणाऱ्या महाविद्यालयांनाच विशेष शिबिराचा प्रथम हप्ता देण्यात येणार आहे. महाविद्यालयांमार्फत शिबिर प्रस्ताव प्राप्त होणे गरजेचे असून, महाविद्यालयांनी विशेष शिबिराचे आयोजन करू नये तसेच प्रथम हप्ता देता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### राहण्या-खाण्याची सोय, हा दत्तक गावनिवडीचा निकष नको

दत्तक गावाची निवड करताना शिबिरार्थी एकत्र किंवा टप्प्याटप्प्यात काम करतील आणि निवासस्थानी राहतील अशी व्यवस्था गावातील पदाधिकाऱ्यांशी बोलून त्याची शहानिशा करावी. केवळ राहण्या-खाण्याची सोय, हाच एखाद्या गावच्या निवडीचा निकष अजिबात असू नये, असेही अधोरेखित करण्यात आले. त्याऐवजी पुढील तीन ते पाच वर्षांमध्ये त्या गावात विविधांगी विकास व संरचनात्मक काम करणे शक्य व्हावे आणि अशा उपलब्धी व नैसर्गिक गरजा ज्या गावांमध्ये निदर्शनास येतील त्याच गावांची संयोजक महाविद्यालयांनी निवड करावी, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
Dec 06, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# उद्या विद्यापीठात ग्लोबल एज्युकेशन फेअर

फेअरमध्ये जगभरातील ४० नामांकित परदेशी विद्यापीठे होणार सहभागी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची माहिती व्हावी, त्याचप्रमाणे प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात येत्या शनिवारी ७ डिसेंबरला ग्लोबल एज्युकेशन फेअरचे आयोजन करण्यात आले आहे. या फेअरमध्ये जगभरातील ४० नामांकित परदेशी विद्यापीठे सहभागी होणार असून, विद्यापीठांचे प्रतिनिधी विद्यार्थी पालकांना विनामूल्य मार्गदर्शन करणार आहेत.

पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी माहिती दिली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, आंतरराष्ट्रीय केंद्राचे प्रमुख डॉ. विजय खरे, परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे आदी उपस्थित होते.

### इच्छुकांनी नोंदणी करावी

या ग्लोबल एज्युकेशन फेअरमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांना करिअरबाबत मोफत मार्गदर्शन मिळणार आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठांच्या प्रतिनिधींचे मार्गदर्शनपर सत्र होणार आहे. अभ्यासकांना विविध क्षेत्रांमधील संशोधनाच्या संधीची माहिती उपलब्ध होणार आहे. फेअरमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी केवळ नोंदणी करायची आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या परिसरात फेअर होणार आहे, अशी माहिती डॉ. विजय खरे यांनी दिली.

### आयएलटीएस, टोफेल, जीआरई शिष्यवृत्ती

परदेशी विद्यापीठांमध्ये शिकण्यासाठी आयएलटीएस, टोफेल, जीआरई अशा परीक्षांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागते. या परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर पैसे खर्च होतात. मात्र, या परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना सुविधा व्हावी, या उद्देशाने विद्यापीठाकडून शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे या परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी विद्यापीठांमध्येच सत्रांचे आणि शैक्षणिक वर्गांचे आयोजन करण्यात येईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. त्यालाच अनुसरून आंतरराष्ट्रीय केंद्राच्या सहकार्याने ग्लोबल एज्युकेशन फेअरचे आयोजन करण्यात आले आहे. या फेअरचा मुख्य उद्देश हा विद्यार्थी-पालकांना अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, कॅनडा अशा १३ पेक्षा अधिक परदेशी विद्यापीठांची प्रवेश प्रक्रिया माहिती व्हावी, पात्रता परीक्षांबाबत मार्गदर्शन मिळावे, प्रवेश प्रक्रिया सुलभ व्हावी, असा आहे, असे डॉ. गोसावी यांनी सांगितले.

My Pune Edition
Dec 06, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नव्याने उपाययोजना

### उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नव्याने उपाययोजना राबविण्यासंदर्भात एक धोरण तयार करण्यात आले आहे. त्यानुसार शाळा व्यवस्थापनाने शाळास्तरावर तातडीने संबंधित उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक शरद गोसावी यांनी दिले आहेत.

गोसावी यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत धोरण निश्चित करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश साधना एस. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे नुकतीच एक बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये समितीने मान्यताप्राप्त शाळांनी तातडीने उपाययोजना करावयाच्या मुद्द्याबाबत चर्चा झाली. समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने शालेय व्यवस्थापनाने शाळास्तरावर विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने करावयाच्या कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

विद्यार्थ्यांसाठी आवश्यक उपाययोजनांमध्ये सर्व शाळांमध्ये प्रसाधनगृहही स्वच्छ व वापरण्यायोग्य असावीत, सहा वर्षांखालील मुलांची काळजी घेण्यासाठी महिला कर्मचारीच असावेत. प्रसाधनगृहामध्ये अलार्म अथवा बझरची व्यवस्था असावी. शाळा, शालेय परिसर येथे सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी. कार्यान्वित सीसीटीव्ही यंत्रणेचे कमीत कमी एका महिन्याचे बॅकअप करणे आवश्यक आहे. शालेय विद्यार्थी वाहतुकीदरम्यान महिला कर्मचारी असणे आवश्यक आहे. शाळेत तक्रार निवारण समिती कार्यान्वित असावी. त्यांच्या नियमित बैठका होणे आवश्यक आहे. प्रत्येकशाळेत तक्रारपेटी आवश्यक असून, ती आठवड्यातून किमान दोन वेळा पालक शिक्षक समितीचे अध्यक्ष व सखी सावित्री समितीचे अध्यक्ष यांच्या समक्ष उघडली गेली पाहिजे व प्राप्त तक्रारीवर सत्वर कार्यवाही होणे आवश्यक आहे. शाळा सुटल्यावर शाळा व शालेय परिसरात एकही विद्यार्थी थांबणार नाही, याची खात्री करण्याबाबत शिक्षकाची ड्युटी लावावी. प्रत्येक शाळेत उपलब्ध शिक्षकांमधून एका शिक्षकाची विद्यार्थ्यांना अडचणीच्या प्रसंगी समुपदेशन करण्यासाठी समुपदेशकाची नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात यावी. समुदेशक शिक्षक यांनी नियमितपणे सर्व विद्यार्थ्यांशी संपर्क साधावा. समुपदेशक बालकांचे समुपदेशन करून बालकांचे मानसिक स्वास्थ व संतुलन राखण्याबाबत कार्यवाही होईल असे पाहावे. संबंधित समुपदेशक शिक्षकांस महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने यथावकाश आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात येईल. शाळांमध्ये बालसंरक्षण समिती स्थापन करण्यात यावी. विद्यार्थी संरक्षणाच्या दृष्टीने शाळेच्या दर्शनी भागात सूचना फलकावर मुलांना समजण्यासाठी चित्राद्वारे सूचना देण्यात याव्यात. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळेत नियमानुसार सखी सावित्री समिती गठित करून कार्यान्वित करावी व बालकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने या समितीमार्फत विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. तसेच, याबाबतचा आढावा प्रत्येक त्रैमासिक बैठकीमध्ये घेण्यात यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
Dec 07, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

# तीन वर्षांची पदवी आता अडीच वर्षांत मिळविता येणार

**पुणे** : नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल केले जात आहेत. विद्यापीठ अनुदान मंडळाने (यूजीसी) त्यासाठी नव्या नियमावलीचा मसुदा चर्चेसाठी प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांची पदवी आता अडीच वर्षांत मिळविता येणार आहे. तर चार वर्षांची ऑनर्स पदवी तीन वर्षांत प्राप्त करता येणार आहे. तर महाविद्यालयाला वर्षातून दोनदा प्रवेश घेण्याची तरतूदही त्यात समाविष्ट करण्यात आली आहे.

युजीसीकडून प्रसिद्ध केलेल्या मसुद्यानुसार 'एक्सलरेटेड डिग्री प्रोग्राम' अंतर्गत तीन वर्षांची सहा

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

सत्रांची पदवी पाच सत्रांमध्ये, तर चार वर्षांची आठ सत्रांची पदवी सहा किंवा सात सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना पूर्ण करता येईल. त्यामुळे तीन वर्षांची पदवी अडीच वर्षांमध्ये, तर चार वर्षांची पदवी तीन किंवा साडेतीन वर्षांमध्ये मिळविण्याचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर खुला झाला असेल. मात्र, विद्यार्थ्यांना त्या पदवीसाठी आवश्यक असलेला अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल.

विद्यार्थ्यांना कमी करण्यात आलेल्या कालावधीतच पदवीसाठी आवश्यक क्रेडिटही प्राप्त करावे लागतील. तर 'एक्स्टेंडेड डिग्री प्रोग्राम' अंतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीचा कालावधी वाढविता येईल. त्यामुळे तीन किंवा चार वर्षांची पदवी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त एक वर्षाचा किंवा दोन सत्रांचा कालावधी मिळू शकणार आहे. त्याशिवाय उच्च शिक्षण संस्थांमध्ये वर्षातून दोन वेळा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार जुलै किंवा ऑगस्ट मध्ये, तसेच जानेवारी किंवा फेब्रुवारीमध्ये विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेता येणार आहे.

विद्यार्थ्यांना एखाद्या विद्याशाखेची पदवी मिळविण्यासाठी पदवी अभ्यासक्रमाला त्या विद्याशाखेतील ५० टक्के अभ्यासक्रम घ्यावे लागणार आहेत. यानुसार विद्यार्थ्यांना त्या विद्याशाखेचे ५० टक्के क्रेडिट मिळवावे लागतील, त्याच्या जोडीला विद्यार्थी उर्वरित ५० टक्के क्रेडिट हे कौशल्यविकास अभ्यासक्रम अप्रेंटिसशिप आणि अन्य विद्याशाखांतील विषय घेऊन मिळवू शकतील.

Kesari 7.12.2024

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

नवभारत
www.navbharatlive.com

# कॉलेजों में साल में 2 बार दाखिले

## UG ने स्नातक की पढ़ाई के लिए जारी की नई गाइडलाइंस




■ दिल्ली, नवभारत न्यूज नेटवर्क. यूनिवर्सिटी ग्रांट कमीशन ( यूजीसी ) ने 5 दिसंबर को यूजी की पढ़ाई के लिए नई गाइडलाइंस का ड्राफ्ट जारी कर दिया है. इसके मुताबिक, छात्र डिग्री कोर्स के लिए साल में दो बार एडमिशन ले सकेंगे. डिग्री की पढ़ाई कम या ज्यादा समय में भी पूरी की जा सकेगी. हायर एजुकेशन इंस्टीट्यूट्स, डिग्री छात्र को 3 से 4 साल का डिग्री कोर्स, 2 साल या 5 साल में पूरा करने का विकल्प दे सकते हैं. केंद्र सरकार में शिक्षा राज्य मंत्री सुकांत मजूमदार ने राज्य सभा में एक सवाल के जवाब में यह जानकारी दी है. उन्होंने यूनिवर्सिटीज के नाम नहीं बताए. साथ ही उन्होंने कहा, 'साल में दो बार छात्र को एडमिशन देने की पॉलिसी लागू करने के लिए जरूरी है कि शिक्षण संस्थान सावधानी से इसका प्लान बनाएं.'

### डिग्री के बीच ब्रेक भी ले सकते हैं छात्र

आईआईटी मद्रास के डायरेक्टर वी कामाकोटी ने डिग्री का समय घटाने या बढ़ाने की पॉलिसी का सुझाव दिया था. उनका कहना था कि हायर एजुकेशन का प्रोसेस ज्यादा से ज्यादा फ्लेक्सिबल होना चाहिए ताकि ज्यादा युवा शिक्षित हो सकें. इसी फ्लेक्सिबिलिटी की जरूरत को मद्देनजर रखते हुए, यूजीसी, राष्ट्रीय शिक्षा नीति-2020 के तहत छात्र के लिए डिग्री के बीच में ब्रेक लेने का ऑप्शन भी ला चुका है. अगर कोई स्टूडेंट चाहे तो वह कोर्स से ब्रेक ले सकता है और बाद में वापस आकर इसे पूरा कर सकता है. इसे लेकर यूजीसी चेयरमैन ने कहा था कि हमारा काम छात्र को क्रिटिकल थिंकर बनाना है.

Pune Edition
Dec 07, 2024 Page No. 2
Powered by: navbharatlive.com

# Three-year degree in two and a half years, college admission every 6 mths

## University Grants Commission releases draft of new regulations in line with New Education Policy

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

According to the New Education Policy (NEP 2020), radical changes are being made in the education system. The University Grants Commission (UGC) has released a draft of new regulations for discussion, and students of degree courses will now be able to obtain a three-year degree in two and a half years. While a four-year honours degree can be obtained in three years. A provision has also been included in it to take admissions to colleges twice a year.

According to the draft released, under the Accelerated Degree Programme (ADP), students can complete a three-year, six-semester degree in five semesters, while a four-year, eight-semester degree in six or seven semesters.

Therefore, the option of obtaining a three-year degree in two and a half years, and a four-year degree in three or three and a half years has been opened for students. However, students will have to complete the coursework required for that degree.

Also, the required credits for the degree will have to be obtained within the reduced period.

Whereas, under the Extended Degree Programme (EDP), students can extend the duration of their degree. Therefore, students will be able to get an additional one year or two semesters to obtain a three or four-year degree.



### Fifty percent in skill courses, apprenticeships

To get a degree in a faculty, students will have to take 50 percent of the courses in that faculty for the degree course. Accordingly, students will have to earn 50 percent of the credits of that faculty. Along with this, students will be able to earn the remaining 50 percent of the credits by taking skill courses, apprenticeships, and subjects from other faculties.

Students will be admitted to higher education institutions twice a year. Accordingly, students will be admitted to colleges in July or August, and in January or February.

Along the lines of Western countries, this new option will also be available to Indian students, and students will not have to wait a whole year to get admission to a course.

In the coming time, the path of admission to educational institutions will be opened in two sessions. Meanwhile, students will be able to be admitted to a postgraduate degree course of a faculty other than the faculty in which they have completed their degree course.

The draft also states that students will have to pass the national level or university level entrance examination for the postgraduate degree course of the concerned faculty only. According to the new rules, students will be able to take admission in two degree or postgraduate degree courses simultaneously.

### CRITERIA FOR ADP

Only 10 percent of the students admitted to the course can be given the option of accelerated degree. There will be no requirement for the number of students for the extended degree.

A committee appointed by the institutions will select the students for the accelerated degrees programme (ADP) based on their merit in the first and second sessions. In this, the student's ability to earn credits in a short period will be tested.

**According to the draft, students can complete a 3-year, six-semester degree in five semesters, while a 4-year, eight-semester degree in six or seven semesters**

Pune Mirror 7.12.2024

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

# 'वाचनसंस्कृती'ला बळ देण्यासाठी पुढे या

## विद्यार्थी, प्राध्यापकांनी पुस्तक महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे, ता. ७ :** राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्यावतीने होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'ची जय्यत तयारी सुरू असतानाच, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल यांच्या सहभागाने यंदाचा हा महोत्सव अधिक भव्य होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांनी महोत्सवात सहभागी होत वाचनसंस्कृतीला बळ देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले.

महोत्सवानिमित्त डॉ. देवळाणकर यांनी पुणे विद्यापीठ, उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या अखत्यारीत असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य आणि कर्मचाऱ्यांना महोत्सवात सहभागी होण्याबाबत सूचना केल्या आहेत. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी पुस्तक महोत्सवाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने, महाविद्यालयात आणि वर्गांमध्ये माहिती द्यावी. महाविद्यालयाच्या सूचना फलकांवर महोत्सवाची माहिती आणि विविध उपक्रमांना प्रसिद्धी द्यायची आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील खासगी विद्यापीठांनाही महोत्सवात आपला सहभाग नोंदवता येणार आहे, असे आवाहन डॉ. देवळाणकर यांनी केले.

### १४ ते २२ डिसेंबरदरम्यान महोत्सव

**पुणे पुस्तक महोत्सव १४ ते २२ डिसेंबर दरम्यान फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणावर होणार आहे. महोत्सवाला पुणे, नगर, नाशिक यांसह राज्यातील विविध ठिकाणचे वाचनप्रेमी भेट देणार आहेत. त्या अनुषंगाने आकर्षक मंडप आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मोठ्या व्यासपीठाच्या उभारणीचे काम वेगाने सुरू आहे.**

### विद्यार्थ्यांसाठी भरपूर संधी

**महोत्सवात 'शांतता... पुणेकर वाचत आहे', ज्ञानसरिता ग्रंथ दिंडी, ग्रंथपालांचे संमेलन असे उपक्रम सुरुवातीच्या टप्प्यात होणार आहेत. यात विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, कर्मचाऱ्यांना सहभागी होता येणार आहे, तसेच संमेलनात शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, कवी, लेखक, चित्रकार, पत्रकार, उद्योजक यांना भेटण्याची संधी मिळणार आहे, असे महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.**

Sakal 8.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# विश्वविक्रमासाठी विद्यार्थी, शिक्षकांचा पुढाकार

## 'सकाळ'चा उपक्रम; सर्वांत मोठा पुस्तकांच्या छायाचित्रांचा ऑनलाइन अल्बम उपक्रम

**पुणे, ता. ७ : लहान मुलांच्या सहभागातून वाचनसंस्कृती अधिक वृद्धिंगत होण्यासाठी आणि मुलांमध्ये वाचनाची गोडी लागण्यासाठी शहरातील शाळांनी 'सर्वांत मोठा पुस्तकांच्या छायाचित्रांचा ऑनलाइन अल्बम' हा विश्वविक्रम नोंदविण्यासाठी उत्स्फूर्तपणे पुढाकार घेतला आहे. पुणे पुस्तक महोत्सवांतर्गत 'सकाळ'च्या वतीने हा विश्वविक्रम करण्यात येत आहे. यात आता शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालकही मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत.**

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे पुण्यात 'पुणे पुस्तक महोत्सव' १४ ते २२ डिसेंबर दरम्यान होत आहे. महोत्सवाचे औचित्य साधून पुणे पुस्तक महोत्सव, सकाळ माध्यम समूह, राष्ट्रीय पुस्तक न्यास आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने 'सर्वांत मोठा पुस्तकांच्या छायाचित्रांचा ऑनलाइन अल्बम' या विश्वविक्रमाची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये करण्यात येणार आहे. यात सहभागी होण्यासाठी शहरातील शाळांनी पुढाकार घेतला आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी, म्हणून शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्या अंतर्गत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र काढून संबंधित क्यूआर कोडवर ती अपलोड करण्याच्या सूचना शाळांकडून दिल्या जात आहेत. काही शाळांनी हे अभियान प्रत्यक्ष शाळेत राबविले.

### सहभागासाठी हे करा

- सोबत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि तुमची माहिती भरून तुमच्याकडील पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र संबंधित लिंकवर अपलोड करा
- एकावेळी एका छायाचित्रात केवळ एका पुस्तकाचेच मुखपृष्ठ दिसेल, असे छायाचित्र तुमच्या मोबाईलच्या साहाय्याने काढून पाठवावे
- छायाचित्रात पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि चारही बाजूंनी सोडलेल्या थोड्याशा जागेव्यतिरिक्त अन्य काहीही नसावे
- एकावेळी फक्त एका पुस्तकाचे छायाचित्र काढून पाठविणे, असे एक व्यक्ती एकामागून एक असे कितीही पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे छायाचित्र काढून वेगवेगळे पाठवू शकतो
- अनेक पुस्तके असतील, तर एकत्रित मुखपृष्ठांचे छायाचित्र पाठवू नये. प्रत्येक पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे वेगवेगळे छायाचित्र पाठवावे
- मुखपृष्ठाचे छायाचित्र काढताना पुस्तकाचे नाव व्यवस्थित दिसेल, असे छायाचित्र काढावे

"पुणे पुस्तक महोत्सव आणि 'सकाळ'तर्फे जगातील सर्वांत मोठा पुस्तकांच्या छायाचित्राचा ऑनलाइन अल्बम तयार करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये शालेय मुले, महाविद्यालयीन तरुण, शिक्षक, साहित्यिक, लेखक, वाचक सहभागी होत आहेत. अतिशय स्तुत्य असा उपक्रम 'सकाळ'ने हाती घेतला आहे. या निमित्ताने किमान प्रत्येक शाळेत, महाविद्यालयात, कुटुंबात वाचनाची गोडी निर्माण होऊन वाचनसंस्कृती नक्कीच वाढण्यास मदत होईल. चला तर मग, आपणच पुढाकार घेऊन आपल्या घरातील, शाळेतील म्हणजे ग्रंथालयातील जेवढी पुस्तके असतील, तेवढ्या पुस्तकांच्या मुखपृष्ठाचा फोटो काढून दिलेल्या क्यूआर कोडमध्ये अपलोड करा आणि पुन्हा एकदा नव्याने पुस्तक आणि त्याचे लेखक यांची ओळख करून घेऊ या, त्यावर कुटुंबातील सदस्यांसोबत चर्चा करू या.

**-संजय सोमवंशी,**
मुख्याध्यापक, सुंदरबाई मराठे विद्यालय, खराडी



खराडी : सुंदरबाई मराठे विद्यालयात विद्यार्थ्यांनी शाळेतच आपल्या आवडत्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र काढून ते संबंधित लिंकवर अपलोड करत विश्वविक्रमात सहभाग नोंदविला.

Sakal 8.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

सामना

# संस्कृती समजून घेणे हाच शिक्षणाचा मूलस्त्रोत

**– डॉ. शां. ब. मुजुमदार**

पुणे,दि. ७ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात 'इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन डायलॉग'ला प्राधान्य देण्यात आले असून, विद्यार्थी, शिक्षक, स्कॉलर, विचारवंत यांना परदेशात पाठवणे तसेच परदेशी शैक्षणिक संस्थांशी करार करणे हा शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचाच एक भाग आहे. त्यातच शिक्षणासाठी वेगवेगळ्या देशांत जाणारा विद्यार्थी हा संस्कृती व मूल्य घेऊन जात असतो. एकमेकांची संस्कृती व मूल्ये समजून घेणे, हाच शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचा मूलस्रोत आहे. कोणीही परदेशी विद्यार्थ्यांकडे केवळ ग्राहक म्हणून पाहू नये, कारण पुन्हा आपल्या देशात परतल्यानंतर ते अप्रत्यक्षपणे शिक्षण घेतलेल्या देशाचे ॲम्बेसिडर म्हणून काम करतात, हे लक्षात घ्यावे, असे मत सिम्बायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राच्या वतीने आणि एसवाययू ऑनलाइन डिजिटल एज्युकेशन फाऊंडेशन अँड ग्लोबल व्हिजनच्या सहकार्याने आयोजित 'इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन डायलॉग अँड ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२४'च्या उद्घाटनप्रसंगी डॉ. मुजुमदार बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, माजी कुलगुरू व एनईपी सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, विद्यापीठच्या आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे, विद्यापीठाच्या इनोव्हेशन अँड इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. देविदास गोल्हार तसेच विविध विद्यापीठांचे कुलगुरू आदी उपस्थित होते. डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने NIRF Je QS रँकिंगमध्ये चांगली कामगिरी केली असून, 'इंटरनॅशनलायजेशन ऑफ हायर एज्युकेशन'च्या दृष्टीने विद्यापीठातर्फे वेगवेगळ्या देशांत उपकेंद्रे सुरू केली जात आहेत. त्यामुळे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांमध्ये पुढील काळात वाढ होईल.

डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी राज्यातील शैक्षणिक संस्थांचा आढावा घेतला. नॅक मूल्यांकनात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असल्याचे नमूद केले. डॉ. भूषण पटवर्धन यांनी स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो येथील भाषेचा संदर्भ दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय खरे यांनी केले. ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२४ला हजारो विद्यार्थ्यांनी भेट दिली. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या आवारात पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. विद्यार्थ्यांना यावेळी विविध शिष्यवृत्ती व परकीय भाषांची माहिती मिळाली.

Pune Edition
Dec 08, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# विद्यार्थी, प्राध्यापक, ग्रंथपालांचा मोठा सहभाग

## पुणे पुस्तक महोत्सवात सहभागी होण्याबाबत उच्च शिक्षण संचालकांच्या सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने होणाऱ्या पुणे पुस्तक महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असतानाच, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल यांच्या सहभागाने यंदाचा पुणे पुस्तक महोत्सव अधिक भव्य होणार आहे. या महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांनी सहभागी होत वाचन संस्कृतीला बळ देण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले आहे.**



एनबीटीच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणावर येत्या १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव रंगणार आहे. या महोत्सवाला पुणे, नगर, नाशिकसहसह राज्यातील विविध ठिकाणचे वाचनप्रेमी भेट देणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासोबतच महोत्सवात अधिकाधिक युवकांनी सहभागी होण्यासाठी पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक आणि एनबीटीचे विश्वस्त राजेश पांडे यांची आग्रही भूमिका आहे. त्याला अनुसरून एनबीटीने महोत्सवात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी उच्च शिक्षण विभागाकडे पत्रांद्वारे पाठपुरावा केला होता.

डॉ. देवळाणकर यांनी पुणे विद्यापीठ आणि उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या अखत्यारीत असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य आणि कर्मचाऱ्यांना महोत्सवात सहभागी होण्याबाबत सूचना केल्या आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी पुणे पुस्तक महोत्सवाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने, महाविद्यालयात आणि वर्गांमध्ये माहिती द्यायची आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या सूचना फलकांवर महोत्सवाची माहिती आणि विविध उपक्रमांना प्रसिद्धी द्यायची आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील खासगी विद्यापीठांनाही महोत्सवात आपला सहभाग नोंदवता येणार आहे. या महोत्सवात पालकवर्गाला सहभागी करण्यासाठी, त्यांच्यापर्यंत माहिती पोहोचवावी, असे आवाहनही डॉ. देवळाणकर यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांसाठी भरपूर संधी

पुणे पुस्तक महोत्सवात शांतता... पुणेकर वाचत आहे, ज्ञानसरिता ग्रंथ दिंडी, ग्रंथपालांचे संमेलन असे सुरुवातीच्या टप्प्यात काही उपक्रम आहेत. यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, कर्मचाऱ्यांना सहभागी होता येणार आहे. त्याचप्रमाणे संमेलनात शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, कवी, लेखक, चित्रकार, पत्रकार, उद्योजक यांना भेटण्याची संधी मिळणार आहे.

My Pune Edition
Dec 08, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# गोखले इन्स्टिट्यूटचे प्रभारी, अनुभव नसलेले कारभारी

## प्रा. दास अर्थशास्त्राचे तज्ज्ञ नसतानाही कुलगुरु पदाचा कार्यभार; डॉ. रानडेंनी राजीनामा दिला तरीही हस्तक्षेप सुरूच असल्याची चर्चा


प्रा. शंकर दास

**पुणे : गोखले इन्स्टिट्यूटच्या कुलगुरू पदावरून डॉ. अजित रानडे हे ४ नोव्हेंबर रोजी पायउतार झाले. मात्र ते अजूनही संस्थेच्या आवारातच मुक्कामी राहत असल्याने त्यांचा हस्तक्षेप सुरू असल्याची चर्चा आहे. त्यांच्या राजीनाम्यानंतर घेतलेले सर्वच पदाधिकारी हे अनुभवी नसल्याची ओरड होत आहे. प्रभारी कुलगुरू प्रा. शंकर दास हे अर्थशास्त्राचे तज्ज्ञ नसताना त्यांच्याकडे पदभार दिलाच कसा, असा प्रश्न संस्थेतील काही सदस्य विचारत आहेत.**

सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटीच्या अंतर्गत येणाऱ्या गोखले इन्स्टिट्यूट संस्थेच्या प्रभारी कुलगुरूपदी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस येथे प्र-कुलगुरू पदावर कार्यरत असणारे प्रा. शंकर दास यांच्याकडे दिला आहे. तसेच त्यांनी जी नवी कार्यकारिणी निवडली ते सर्वच लोक अनुभवी नसल्याची ओरड सुरू आहे. या मागे माजी कुलगुरू डॉ. रानडे व संस्थेचे सचिव मिलिंद देशमुख असल्याचे बोलले जात आहे. कारण प्रा. दास हे मानसशास्त्राचे तज्ज्ञ आहेत. त्यांचा प्रशासकीय अनुभव चांगला असेलही मात्र गोखले इन्स्टिट्यूट ही अर्थशास्त्र व राजकारण या विषयांतील देशातील प्रतिष्ठित संस्था असल्याने या संस्थेत दास यांना घेतले कसे, यावर काही सदस्य आक्षेप घेण्याच्या तयारीत आहेत.







प्रभारी कुलगुरू प्रा. दास यांनी तयार केलेली ही नऊ सदस्यांची टिम, ज्यांच्या अनुभवाबद्दल काही सदस्यांनी आक्षेप घेतला आहे.

### डॉ. रानडे यांनी मागितला वेळ

डॉ. अजित रानडे यांनी ४ नोव्हेंबर रोजी संस्थेच्या कुलगुरू पदाचा मुदत संपण्यापूर्वीच अचानक राजीनामा दिला. मात्र त्यांनी संस्थेच्या आवारातील क्वार्टर अद्याप सोडलेले नाही. त्यांनी संस्थेला दोन महिन्यांचा अवधी मागून घेतला. त्यामुळे त्यांचा या कार्यकारिणीत छुपा हस्तक्षेप असल्याची चर्चा पसरली आहे.

### प्रा. दास यांच्यावर होत आहेत आरोप

प्रा. शंकर दास यांना गोखले इन्स्टिट्यूचे प्रभारी कुलगुरू म्हणून निवडल्यानंतर त्यांनी अर्थशास्त्र विभागातील अनुभवी व ज्येष्ठ प्राध्यापकांना वगळून एक समिती तयार केली आहे. ज्यातील नऊ सदस्य हे फार अनुभवी नाहीत अशी ओरड सुरू आहे. या सदस्य निवडीत माजी कुलगुरू डॉ. अजित रानडे व संस्थेचे सचिव मिलिंद देशमुख यांचा हस्तक्षेप दिसतो. रानडे यांनी अजूनही मुख्यालय सोडले नाही. त्यांच्यावर जे आर्थिक घोटाळ्याचे आरोप झाले आहेत. त्यातील पुरावे ते नष्ट करण्याच्या हेतूनेच ते संस्थेच्या आवारात मुक्कामी असल्याचे बोलले जात आहे.

" विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार डॉ. शंकर दास हे अर्थशास्त्र विषयाचे तज्ज्ञ नसताना त्यांना प्रभारी कुलगुरू हा पदभार देणे चुकीचे आहे. प्रा. दास यांनी फारसा अनुभव नसणाऱ्या नऊ जणांची समिती तयार केली. त्यांच्यावर प्रशासकीय कार्यभार सोपवला आहे. त्यामुळे संस्थेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. हा प्रकार विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा आहे. तसेच डॉ. रानडे हे पुरावे नष्ट करू शकतात. त्यात शंकर दास हे त्यांना साह्य करीत आहेत.

**- प्रवीण राऊत, तक्रारदार.**

My Pune Edition
Dec 08, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2024

## Section: Education

लोकमत

पुणे पुस्तक महोत्सवाचा उपक्रम

# बुधवारी शांतता ठेवा...पुणेकर वाचत आहे !

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे पुस्तक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येत्या ११ डिसेंबरला दुपारी १२ ते १ या वेळेत पुणे शहरातील विविध ठिकाणी आयोजित होणाऱ्या शांतता...पुणेकर वाचत आहे या उपक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महाविद्यालये, सामाजिक संस्था, संघटना, ग्रंथालये, वाचनालये अशा समाजातील विविध स्तरांतून पाठिंबा मिळत आहे. पुणे मेट्रो, पुणे विमानतळ, रेल्वेस्थानक, रिक्षा थांबे आणि पीएमपीएमएल थांब्यांवरही हा उपक्रम होणार आहे. त्यामुळे या उपक्रमात आपणही सहभागी होऊन, त्याचे छायाचित्र पाठवायचे आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) वतीने येत्या १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणावर रंगणार आहे. हा महोत्सव पुणेकरांचा असल्याने, तो घराघरांत पोहोचावा यासाठी विविध जाहीर उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यातील सर्वांत महत्त्वाचा उपक्रम 'शांतता... पुणेकर वाचत आहे' बुधवारी ११ डिसेंबरला दुपारी १२ ते १ या वेळेत पुणे शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी होणार आहे. या उपक्रमात शहरातील प्रत्येकाने या ठरलेल्या वेळेत, आपल्या आजूबाजूला उपलब्ध असलेले पुस्तक वाचायचे असून, वाचनासाठी प्रेरणा इतरांनाही द्यायची आहे. या उपक्रमासाठी अनेक पुणेकर आणि संघटना सरसावल्या असून, दिवसेंदिवस त्यात वाढच होत आहे, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली आहे.

पुणे शहरात विमानतळ, मेट्रो स्टेशन, एसटी बसस्थानक, रेल्वेस्थानक, पीएमपीएमएल, रिक्षा अशा महत्त्वाच्या वाहतुकीच्या साधनांद्वारे दररोज लाखो नागरिक ये-जा करतात. त्यामुळे या ठिकाणी उपक्रम राबविण्यात येण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. वाचन संस्कृतीला बळकट करण्यासाठी पुण्यातील सरकारी आणि खासगी कार्यालये, आस्थापने यांनी उत्स्फूर्तपणे आपला उपक्रम नोंदवावा, असे आवाहन पांडे यांनी केले आहे.

### पुणेकर म्हणून काय करता येईल !

- या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी, वाचन करतानाचे आपले छायाचित्र आम्हाला https://pbf24.in/register लिंक वर किंवा क्यूआर कोडवर पाठवावे.
- फेसबुक, एक्स, लिंकडीन, इन्स्टाग्राम अशा समाजमाध्यमावर #पुणेपुस्तकमहोत्सव #PuneBookFestival2024 या हॅशटॅगसह शेअर करावा.
- शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कार्यालये, कंपन्या आणि विविध संस्थांनी मोठ्या प्रमाणात हा उपक्रम राबवावा.

Hello Pune
Page No. 3 Dec 09, 2024
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# पुणे पुस्तक महोत्सव विश्वविख्यात होईल

पुढारी ANCHOR

## आमदार चंद्रकांतदादा पाटील यांचा विश्वास

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

लेखन, वाचन, चिंतन, संशोधन ही समाजाला सकारात्मक करणारी क्षेत्रे आहेत. पुणे या क्षेत्रांची प्रयोगशाळा असून, संपूर्ण जग या शहराचे अनुकरण करते. पुण्याचा गणेशोत्सव जगभर प्रसिद्ध आहे, तसा यंदाचा पुणे पुस्तक महोत्सवही विश्वविख्यात होईल, असा विश्वास राज्याचे माजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा आमदार चंद्रकांत पाटील यांनी रविवारी व्यक्त केला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) वतीने येत्या १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणावर पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यासंदर्भात ॲम्फी थिएटर येथे बैठक पार पडली, त्या वेळी चंद्रकांत पाटील बोलत होते.

या प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, अभिनेते प्रवीण तरडे, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, एनबीटीचे सहायक संचालक (प्रदर्शन) मयांक सुरोलिया, संयोजन समितीचे सदस्य बागेश्री मंठाळकर, प्रसेनजित फडणवीस, प्रा. संजय चाकणे, डॉ. आनंद काटीकर आदी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले, गत वर्षीच्या तुलनेत यंदाचा पुणे पुस्तक महोत्सव चौपट मोठा होणार असून, त्याद्वारे पुस्तक प्रदर्शनांच्या जगतात नवा विश्वविक्रम प्रस्थापित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते



महोत्सवाचे उद्घाटन होणार असून, त्यांनी नागपूर येथेही अशाच पुस्तक महोत्सवाच्या आयोजनाची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे पुणे पुस्तक महोत्सवाचे अनुकरण सर्व शहरांना करावेसे वाटत आहे, असे समाधानही चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, यंदाच्या पुणे पुस्तक महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बाराशे महाविद्यालय-संस्थांमधील साडेसात लाख विद्यार्थी सक्रिय सहभागी होणार आहेत. या महोत्सवातून होणारी पुस्तक विक्री तसेच 'शांतता, पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमातून कोणत्या वयोगटाचे वाचक काय वाचतात, त्यांची आवड-निवड काय, त्यातून वाचनसंस्कृती कशी जोपासली जाते, याचा महत्त्वपूर्ण 'डेटा' उपलब्ध होईल.

डॉ. शैलेंद्र देवळाणकर म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सव ही एक वाचन चळवळ असून, त्यातून नवा पायंडा पाडण्याची संधी पुण्याला आहे. 'जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल'नंतर 'पुणे पुस्तक महोत्सवा'कडे साहित्य संस्कृती जोपासण्याच्या दृष्टीने पाहिले जात असून, लवकरच हा देशातील पहिल्या क्रमांकाचा पुस्तक महोत्सव होईल.

राजेश पांडे म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सव हा पुणेकरांचा महोत्सव असून, त्यामध्ये प्रत्येकाने सहभाग नोंदवून संघशक्तीच्या जोरावर ही वाचन चळवळ यशस्वी करावी.

My Pune Edition
Dec 09, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# 'पुस्तक महोत्सव' जगविख्यात होईल

**चंद्रकांत पाटील यांचा विश्वास**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



**"गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा 'पुणे पुस्तक महोत्सव' चौपट मोठा होणार आहे. यामुळे पुस्तक प्रदर्शनांच्या जगतात नवा विश्वविक्रम प्रस्थापित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार असून, त्यांनी नागपूर येथेही अशाच पुस्तक महोत्सवाच्या आयोजनाची तयारी सुरू केली आहे. पुणे पुस्तक महोत्सवाचे अनुकरण सर्व शहरांना करावेसे वाटत आहे.**

– चंद्रकांत पाटील, आमदार

'लेखन, वाचन, चिंतन, संशोधन ही समाजाला सकारात्मक करणारी क्षेत्रे आहेत. पुणे या क्षेत्रांची प्रयोगशाळा असून, संपूर्ण जग या शहराचे अनुकरण करते. पुण्याचा गणेशोत्सव जगभर प्रसिद्ध आहे, तसा यंदाचा 'पुणे पुस्तक महोत्सव'ही विश्वविख्यात होईल,' असा विश्वास माजी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री व आमदार चंद्रकांत पाटील यांनी रविवारी व्यक्त केला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे (एनबीटी) येत्या १४ ते २२ डिसेंबरदरम्यान फर्ग्युसन कॉलेजच्या प्रांगणावर 'पुणे पुस्तक महोत्सव' होणार आहे. महोत्सवाच्या नियोजनाची व्यापक बैठक रविवारी सायंकाळी कॉलेजच्या ॲम्फी थिएटरमध्ये आयोजित केली होती. या वेळी चंद्रकांत पाटील बोलत होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, अभिनेते-लेखक प्रवीण तरडे, संयोजक राजेश पांडे, 'एनबीटी'चे सहायक संचालक मयांक सुरोलिया, बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, प्रा. संजय चाकणे, डॉ. आनंद काटीकर उपस्थित होते. गोसावी म्हणाले, 'महोत्सवात विद्यापीठाच्या बाराशे कॉलेज आणि संस्थामधील साडेसात लाख विद्यार्थी सक्रिय सहभागी होणार आहेत. यातून होणारी पुस्तक विक्री; तसेच 'शांतता पुणेकर वाचत आहेत,' या उपक्रमातून कोणत्या वयोगटाचे वाचक काय वाचतात, त्यांची आवड-निवड काय, त्यातून वाचन संस्कृती कशी जोपासली जाते, याची महत्त्वपूर्ण माहिती संकलित होणार आहे.'

देवळाणकर म्हणाले, 'हा महोत्सव एक वाचन चळवळ असून, त्यातून नवा पायंडा पाडण्याची संधी पुण्याला आहे. 'जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल'नंतर 'पुणे पुस्तक महोत्सवा'कडे साहित्य संस्कृती जोपासण्याच्या दृष्टीने पाहिले जात असून, लवकरच हा देशातील पहिल्या क्रमांकाचा पुस्तक महोत्सव होईल.'

'हा महोत्सव पुण्याच्या मूळ संस्कृतीशी जोडलेली नाळ असून, सारस्वतांच्या पंढरीची नामदेवांची पायरी आहे. पुस्तकांच्या या कुंभमेळ्यात पुस्तकांवर प्रेम करणाऱ्या पुणेकरांनी साहित्य स्नान करावे,' असे आवाहन तरडे यांनी केले.

पांडे यांनी महोत्सवातील उपक्रमांची माहिती आणि त्यासाठी सुरू असलेल्या नियोजनाची माहिती दिली. काटीकर यांनी सूत्रसंचालन केले.

Maharashtra Times 9.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# पुस्तक महोत्सव विश्वविख्यात होईल

## आमदार चंद्रकांत पाटील यांचा नियोजन बैठकीत विश्वास

**पुणे, ता. ८ : "लेखन, वाचन, चिंतन, संशोधन ही समाजाला सकारात्मक करणारी क्षेत्रे आहेत. या क्षेत्रांची प्रयोगशाळा पुणे असून संपूर्ण जग शहराचे अनुकरण करते. तसाच यंदाचा पुणे पुस्तक महोत्सवही विश्वविख्यात होईल," असा विश्वास माजी मंत्री आणि आमदार चंद्रकांत पाटील यांनी रविवारी व्यक्त केला.**

राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या (एनबीटी) वतीने १४ ते २२ डिसेंबरदरम्यान 'पुणे पुस्तक महोत्सव' रंगणार आहे. या महोत्सवाच्या नियोजनाची बैठक रविवारी झाली. त्यावेळी पाटील यांनी विश्वास व्यक्त केला. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, अभिनेते-लेखक प्रवीण तरडे, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, एनबीटीचे सहाय्यक संचालक (प्रदर्शन) मयांक सुरोलिया, संयोजन समितीचे सदस्य बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, प्रा. संजय चाकणे, डॉ. आनंद काटीकर आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, "गत वर्षाच्या तुलनेत यंदाचा 'पुणे पुस्तक महोत्सव' चौपट मोठा होणार असून त्याद्वारे पुस्तक प्रदर्शनांच्या जगतात नवा विश्वविक्रम प्रस्थापित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार असून त्यांनी नागपूर येथेही अशाच पुस्तक महोत्सवाच्या आयोजनाची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे पुणे पुस्तक महोत्सवाचे अनुकरण सर्व शहरांना करावेसे वाटत आहे." यंदाच्या महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एक हजार २०० महाविद्यालय-संस्थांमधील साडेसात लाख विद्यार्थी सक्रिय सहभागी होणार आहेत. या महोत्सवातून होणारी पुस्तक विक्री आणि विविध उपक्रमांतून कोणत्या वयोगटाचे वाचक काय वाचतात, त्यांची आवड-निवड काय, त्यातून वाचन संस्कृती कशी जोपासली जाते, याचा महत्त्वपूर्ण 'डेटा' उपलब्ध होईल, असे डॉ. सुरेश गोसावी म्हणाले.

डॉ. देवळाणकर म्हणाले, "जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल'नंतर 'पुणे पुस्तक महोत्सवा'कडे साहित्य संस्कृती जोपासण्याच्यादृष्टीने पाहिले जात असून लवकरच हा देशातील पहिल्या क्रमांकाचा पुस्तक महोत्सव होईल."

> पुणे पुस्तक महोत्सव आणि 'सकाळ'तर्फे जगातील सर्वांत मोठा पुस्तकांच्या छायाचित्राचा ऑनलाइन अल्बम तयार करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात अधिकाधिक पुणेकरांनी आपला सहभाग नोंदवावा. प्रत्येकाने पुढाकार घेऊन आपल्या घरातील, शाळेतील, ग्रंथालयातील जेवढी पुस्तके असतील, तेवढ्या पुस्तकांच्या मुखपृष्ठाचा फोटो काढावा, तसेच 'सकाळ'ने दिलेल्या क्यूआर कोडमध्ये तो अपलोड करून नव्याने होणाऱ्या विश्वविक्रमात आपला सहभाग नोंदवावा.
>
> **— राजेश पांडे.** संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

## शांतता... पुणेकर वाचत आहेत

'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या पार्श्वभूमीवर बुधवारी (ता. ११) दुपारी १२ ते एकदरम्यान शहरातील विविध ठिकाणी आयोजित होणाऱ्या 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमाला समाजातील विविध स्तरातून पाठिंबा मिळत आहे.

मेट्रो, विमानतळ, रेल्वे स्थानक, रिक्षा थांबे आणि पीएमपी थांब्यांवरही उपक्रम उत्साहात होणार असून, तेथे उपलब्ध असणारे पुस्तक वाचणार आहेत. त्यामुळे उपक्रमात आपणही सहभागी होऊन, त्याचे छायाचित्र पाठवायचे आहे, असे आवाहन महोत्सवातर्फे करण्यात आले आहे.

### पुणेकर म्हणून काय करता येईल?

- उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी वाचन करतानाचे आपले छायाचित्र आम्हाला https://pbf24.in/register लिंकवर किंवा क्यूआर कोड स्कॅन करून पाठवावे.
- फेसबुक, एक्स, लिंक्डइन, इंस्टाग्राम अशा समाजमाध्यमांवर #पुणेपुस्तकमहोत्सव #PuneBookFestival2024 या हॅशटॅगसह शेअर करावा.
- शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कार्यालये, कंपन्या आणि विविध संस्थांनी मोठ्या प्रमाणात उपक्रम राबवावा.
- पुणे शहरातील ग्रंथालये, वाचनालयात उपक्रम अधिक चांगल्या पद्धतीने पार पाडून सहकार्य करावे.

Sakal 9.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# Pupils demand action on lack of fee display notice

## Most of the city institutes violate government order

Yashpal Sonkamble yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror




Students and their parents are demanding action against colleges that do not display the fees fixed for the courses offered by them. They allege that fees are collected arbitrarily by most of the colleges putting a financial burden on aspiring students.

It is mandatory for all government, non-agricultural, private, and deemed universities to display the fees fixed for all courses on their websites as well as on notice boards in visible areas of their premises.

Barring some, fee information is not displayed by most of the city colleges.

Open and backward-class students who are admitted to undergraduate and postgraduate courses in the Higher and Technical Education Departments get scholarships from the state and central governments. In addition to the backward class category, students in these courses are eligible for the Rajshri Chhatrapati Shahu Maharaj Education Fee Reimbursement Scholarship Scheme. Therefore, the colleges get the scholarship money for these students from the government. However, it is alleged that college administrations insist on students paying the full fee while taking admission.

Instructions were given through a government circular on June 27, 2005, to reimburse the college for tuition fees, laboratory fees, library fees, other fees, extra-curricular activities, magazine fees, registration fees, computer practical fees, and examination fees as per the fee rates fixed by the respective universities.

It is mandatory to charge the fee fixed by the university and the fee regulatory authority while taking admission in undergraduate and postgraduate courses from open and backward class students in all government, non-agricultural, private, and deemed university-affiliated colleges in the state. However, with some exceptions, many colleges have charged increased fees.

Student unions have demanded that all government, non-agricultural, private, and deemed universities in Maharashtra should immediately publish the information on the fees fixed for all courses on the websites of all universities and colleges and the notice boards of the universities and colleges.

### Collection of additional fees

In many aided colleges, additional fees are being charged to students in the name of 'other' fees. While it is required to declare the balance sheet of all types of fees and expenses every year, it is not done. When Pune Time Mirror tried to contact Dr. Shailendra Devlankar, the Director of Higher Education, and Dr. Vinod Mohitkar, the State Director of Technical Education in this regard, they were not available for comment.

Pune Mirror 9.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

लोकमत

# शनिवारपासून 'पुणे पुस्तक महोत्सव : वाचकांसाठी भरणार पुस्तकांची मांदियाळी...




लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुस्तक वाचून माणूस मनाने, विचाराने समृद्ध होतो आणि जगणं संपन्न होऊन जाते; पण आज मोबाइलच्या जमान्यात पुस्तकांकडे दुर्लक्ष होत आहे. म्हणूनच पुन्हा वाचनसंस्कृती वाढावी, यासाठी पुण्यात १४ डिसेंबरपासून पुणे पुस्तक महोत्सव सुरू होत आहे. गतवर्षी या महोत्सवाला पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला, यंदाही तो भव्य-दिव्य असा होत आहे. शनिवारपासून पुस्तकांची मांदियाळीच पुण्यामध्ये भरणार आहे.

**14 ते 22 डिसेंबरदरम्यान पुणे पुस्तक महोत्सव**

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे मागील वर्षी आयोजिलेला आणि दिल्लीपाठोपाठ देशातील सगळ्यात मोठा पुस्तक महोत्सव म्हणून नावाजलेला 'पुणे पुस्तक महोत्सव' यंदाही होत आहे. यंदा १४ ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या परिसरात हा महोत्सव होत आहे.

विविध भाषांमधील पुस्तकांची दालने, तसेच मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्वांसाठी वैविध्यपूर्ण कार्यक्रम आणि विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांची उपस्थिती हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य असणार आहे, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली. राष्ट्रीय पुस्तक न्यास सातत्याने देशाच्या विविध भागांमध्ये पुस्तक महोत्सवाचे आयोजन करीत असते. मागील वर्षी पुण्यात आयोजित केलेल्या पुस्तक महोत्सवाला मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे यंदा आणखी भव्य स्वरूपात या महोत्सवाची आखणी करण्यात आली आहे. या महोत्सवासाठी ७०० हून अधिक पुस्तक स्टॉल्सची नोंदणी झाली आहे.

या महोत्सवात वाचन संस्काराला बळ मिळेल, असे विविध कार्यक्रम होणार आहेत. देशभरातील विविध भाषांमधील साहित्यिकांची उपस्थिती हे या महोत्सवाचे आकर्षण आहे. तसेच यामध्ये मुलांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त बाल चित्रपटांचा महोत्सव होणार आहे.



### चार दिवसांत होणार विविध उपक्रम

या महोत्सवात दिनांक १९ ते २२ या चार दिवसांच्या कालावधीत पुण्यातील साहित्यिकांचा सहभाग असलेले विशेष कार्यक्रम होणार आहेत. या महोत्सवाला डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सक्रिय सहकार्य लाभले आहे. तसेच अन्य साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्थादेखील यात सहभागी होणार आहेत. यामध्ये विविध प्रकारच्या स्पर्धा, संल्पपॉइंट, लेखक स्वाक्षरी कट्टा अशा अभिनव कल्पनाही राबविण्यात येणार आहेत.

अलीकडेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असून, या पार्श्वभूमीवर यंदाच्या महोत्सवात मराठी साहित्याचे विविध पैलू पुणेकरांसमोर अभिनव पद्धतीने उलगडणार आहेत. उद्घाटन आणि समारोप सत्रासह यामध्ये साहित्याला केंद्रस्थानी ठेवून विविध सत्रे होणार आहेत.

- राजेश पांडे, संयोजक

### ज्येष्ठ, दिव्यांगांसाठी ई-व्हेईकल उपलब्ध

हा महोत्सव फर्ग्युसन महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित करण्यात येत असून यासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून काम पाहणार आहेत. महोत्सवाला येणाऱ्या पुणेकरांच्या वाहनांसाठी महाविद्यालयाच्या परिसरात विविध ठिकाणी वाहनतळाची सुविधा उपलब्ध असेल. तसेच ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना वाहनतळापासून कार्यक्रमस्थळी जाण्या-येण्यासाठी ई-व्हेईकलदेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

Hello Pune
Page No. 1 Dec 10, 2024
Powered by: erelego.com

लोकसत्ता

# सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठात 'उत्कृष्टता केंद्र'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भारत आणि जपान या दोन देशांमध्ये शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या आदानप्रदानासाठी केलेल्या सामंजस्य करारांतर्गत सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठात उत्कृष्टता केंद्र (सेंटर ऑफ एक्सलन्स) स्थापन करण्यात येणार आहे. तसेच, नॉलेज सर्व्हिस उपक्रमातून विद्यार्थ्यांना जपानमधील करिअर संधींच्या अनुषंगाने जपानी भाषा, सांस्कृतिक शिष्टाचार आणि व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि कॉग्नावी इंडिया या जपानी कंपनीत नुकताच करार करण्यात आला. राज्य सरकारतर्फे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव विकासचंद्र रस्तोगी, कुलगुरू डॉ. सुनील भिरुड, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, सहसचिव संतोष खोरगडे, तर कॉग्नावी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक वरुण मोदील, संचालक मित्सु सेकिना, महाव्यवस्थापक नोरिको मियामोटो, उपमहाव्यवस्थापक मोहित सरीन या वेळी उपस्थित होते.

या कराराद्वारे राज्यभरातील सर्व सरकारी आणि अनुदानित संस्थांमधील विद्यार्थीही या उपक्रमांचा लाभ घेऊ शकतील. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि कॉग्नावी यांच्यातील ही भागीदारी जागतिक स्तरावर सक्षम विद्यार्थी घडवण्याच्या सीओईपी टेकच्या वचनबद्धतेचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या सहकार्यामुळे भारत आणि जपान यांच्यातील शैक्षणिक, व्यावसायिक संबंध अधिक दृढ होतील, असे कुलगुरू डॉ. भिरुड यांनी सांगितले.

10/12/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# शांतता... पुणेकर वाचत आहेत...

## पुणे पुस्तक महोत्सवातील ग्रंथदिंडी, विविध उपक्रमांत विद्यापीठाचा सक्रिय सहभाग

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**
**फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत रंगणाऱ्या पुणे पुस्तक महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सक्रिय सहभाग घेतला असून, यानिमित्त उद्या बुधवारी ११ डिसेंबरला होणाऱ्या 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी होणार आहेत. वाचनसंस्कृतीला वाढविण्यासाठी आणि ज्ञानार्जन करण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सोमवारी केले.**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. शिक्षण मंत्रालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका यांच्या सहकार्याने हा महोत्सव होत असून, राजेश पांडे महोत्सवाचे मुख्य संयोजक आहेत. यानिमित्त १४ डिसेंबरला निघणाऱ्या ग्रंथदिंडीत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. त्याचप्रमाणे वाचनसंस्कृतीचा जागर होण्यासाठी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम बुधवारी दुपारी १२ ते १ या वेळेत होत आहे. या उपक्रमात पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या जिल्ह्यांतील विद्यापीठांचे सर्व घटक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी व पालक आपल्या आवडत्या पुस्तकाचे वाचन करतील आणि त्याचा फोटो अथवा व्हिडीओ सोबत दिलेला क्यूआर कोड स्कॅन किंवा pbf24.in/register वर तो फोटो/व्हिडीओ पाठवतील. सोशल मीडियावर पुणे पुस्तक महोत्सव यासह पोस्ट करावे, असे आवाहन डॉ. गोसावी यांनी केले आहे. याचाच एक भाग म्हणजे पुणे विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या साहाय्याने गिनीज वर्ल्ड बुक रेकॉर्ड करण्यात येणार आहे. विविध भाषांमधील सुमारे ६०० पुस्तकांची दालने राहणार असून, विद्यार्थ्यांना ती पाहता आणि खरेदी करता येणार आहेत. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमात कलावंतांच्या सादरीकरणाचा आनंद घेता येणार आहे.

### मुखपृष्ठांच्या छायाचित्रांचा होणार विश्वविक्रम

या वर्षीच्या पुणे पुस्तक महोत्सवात पुस्तकांच्या मुखपृष्ठांच्या छायाचित्रांचा सगळ्यात मोठा ऑनलाइन अल्बम असा विश्वविक्रम होणार आहे. त्यात सहभागी होण्यासाठी वाचकप्रेमींनी क्यूआर कोड स्कॅन करून किंवा लिंकवर क्लिक करून सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले आहे.

### असे पाठवा पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र

- पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र मोबाईलच्या साहाय्याने काढून पाठवायचे आहे.
- एकावेळी एका छायाचित्रात केवळ एका पुस्तकाचेच मुखपृष्ठ दिसेल असे छायाचित्र काढून पाठवावे.
- केवळ पुस्तकाचे मुखपृष्ठ दिसेल असेच छायाचित्र काढावे.
- छायाचित्रात पुस्तकाच्या कव्हर आणि चारही बाजूंनी सोडलेल्या थोड्या जागेव्यतिरिक्त अन्य काहीही नसावे.
- एकावेळी फक्त एका पुस्तकाचा फोटो काढून पाठवणे.
- आपल्याकडील अनेक पुस्तके असतील, तर असलेल्या पुस्तकांच्या एकत्रित मुखपृष्ठांचा फोटो काढून पाठवू नये.
- पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा म्हणजेच कव्हरपेजचा फोटो काढताना पुस्तकाचे नाव फोटोत व्यवस्थित वाचता येईल असाच फोटो काढावा.

My Pune Edition
Dec 10, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

# UGC Is Chasing 'Flexibility' In A Blind Maze

**40% Indians hold jobs for which they're undereducated, 13% with advanced degrees remain jobless. Adding 'options' doesn't fix the gulfs between choosing a course, getting a degree & landing a job**

Chandrima.Banerjee@timesofindia.com



Those not chronically online may have missed this. But last week, an innocuous post by a University of Cambridge academic announcing she had completed her PhD became an astonishing source of outrage for far too many people. The problem? The subject of her thesis – *Olfactory Ethics: The Politics of Smell in Modern and Contemporary Prose*.

Trolls had a lot of questions. Why say 'olfactory' and not simply 'smell'? Don't 'modern' and 'contemporary' mean the same thing? (They don't.) And who even studies smell? By now, the post has had over 100mn views, what started with mockery had turned into death and rape threats. Why this disproportionate rage? Anti-intellectualism, a lot of people commented. But it is more than that. It is the culmination of a neoliberal fallacy – where the purpose of study is judged by its market value. Is it that different in India?

**What's the UGC proposal?** | The buzzword of University Grants Commission's recent draft regulations seems to be 'flexibility'. It *should* mean progress in how higher education is seen and structured. If the draft goes through, students will be able to seek admissions twice a year, rejoin courses they may have left, complete courses quicker than usual or slower than usual, pursue two UG or PG programmes simultaneously, and – most importantly – be eligible for courses without a background in those specific disciplines. That means a significant amount of openness and choice for students in planning their education.

But besides the immediate questions about capacity and infra to actually see this liberalisation through, the *laissez faire* approach leads back to the important question about purpose.

In India, it might be too late (and sometimes misguided) to make a case for students simply following through on what genuinely interests them. Without generational wealth or an ecosystem that supports people in working on what they are drawn to, aptitudes and passions are often best left for the privileged to explore. Data from the latest All India Higher Education Survey bear this out.

**What does it mean for underprivileged students?** | How many students from SC and ST communities complete degrees in art education? 3%. Interior design? 3%. Visual arts? 4%. In which courses do students from SC and ST communities account for the largest share? Those which prepare them to become medical lab techs and nurses. If the choice of disciplines is still dictated by social background, flexibility may not always mean choice – not for everyone.

Besides, shifts in the choice of subject do not always follow straightforward supply-demand logic. For instance, when Unesco data show that the most dramatic surge in India has been in arts and humanities graduates (while social sciences plummeted) – from 6% of college degrees in 2020 to 29% now – it might seem like a translation of growing interest. But as academics have pointed out, expansion in humanities in India has historically been more about how inexpensive it is to create more 'seats' than about a commitment to the interrogative ideals of humanities.




**Is faith in college degrees misplaced?** | India places a lot of faith in the value of a college degree, and having one – even if it is mismatched to skills or interests – is believed to be better than not having any formalised certificate of study.

It's not going too well, though. Because what comes after actually getting the degree is even more confounding. ILO data show that less than 40% of Indians are engaged in work that matches their education level – India, at 124, is one of the lowest in this ILO list of 145 countries. A little under a quarter of Indians hold jobs for which they are overqualified. But many more hold jobs for which they are undereducated – 40%, one of the highest shares in the world.

There *can* be a surge in undereducated workers when there are more high-skill jobs than high-skill workers. But that is clearly not the case in India, unlike developed economies like Australia and Israel where high-skill jobs make up the largest share. In fact, the share of high-skill jobs in India has dropped from 17% in 2018 to just under 12% now.

**Who's doing India's high-skill jobs?** | Not just people with college degrees. About 40% of high-skill jobs are held by people without advanced degrees – and about half of them are people with primary or lower secondary education.

Obviously, job mismatches are not degree-to-work anagrams, which simple rearrangements can resolve. But the scale of these incongruities means that India simply doesn't know what to do with its educated workforce. Even though just one-third of Indians who are of college-going age actually go to college – that share is about 80% in US and UK – 13% of Indians with advanced degrees remain unemployed, one of the highest shares in the world. In US, that share is 2.3% and in UK, 2.7%.

Flexibility is great. But what would India do if every college-age student actually signed up for a degree?

Calvin & Hobbes

The Times of India 10.12.2024

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 10 Dec 2024_001
10 Dec 2024

### आता राज्य शिक्षण मंडळाचे ॲप




#### दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार अचूक माहिती

**मुंबई, दि. ९ -** राज्य मंडळाच्या दहावी-बारावी परीक्षेसंबंधी आवश्यक माहिती, परिपत्रके व सुविधा यासाठी मंडळाने एमएसबीएसएचएसई हे मोबाइल ॲप विकसित केले आहे. या ॲपवर बोर्डाच्या परीक्षेची सर्व अचूक आणि महत्त्वाची माहिती देखील मिळणार आहे. या ॲपमध्ये विद्यार्थ्यांना वेळापत्रक, गुणपत्रिका, फी यासह अनेक महत्त्वाच्या परीक्षेशी संबंधित माहिती सहज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे विद्यार्थी-पालक, शाळा, कर्मचारी यांच्यासाठी हे ॲप उपयुक्त ठरणार आहे.

दहावी-बारावीच्या परीक्षेसाठी दरवर्षी लाखो विद्यार्थी बसत असतात. त्यांना शाळांमधून माहिती दिली जाते. मात्र, सोशल मीडिया व काही खासगी कोचिंग क्लासेसच्या माध्यमांतून माहितीची शहानिशा न करता ती फॉरवर्ड केली जात होती. त्यामुळे अनेकदा गैरसमज व अफवा पसरत होत्या. त्यामुळे परीक्षा मंडळाने एमएसबीएसएचएसई ॲप सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता.

एमएसबीएसएचएसईने तयार केलेले हे ॲप दहावी आणि बारावी अशा दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांना वापरता येईल. तसेच परीक्षा आणि इतर माहितींचे नोटिफिकेशनही विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक महामंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. हे ॲप, विद्यार्थी, शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांसाठी सोयीस्कर ठरणार आहे. यात दहावी आणि बारावी या दोन्ही विद्यार्थ्यांसाठी परीक्षांचे वेळापत्रक समाविष्ट आहे. हे ॲप राज्य मंडळाच्या अधिकृत वेबसाइटवरील लिंकद्वारे डाउनलोड करता येणार आहे.

**या ॲपची वैशिष्ट्ये**

- गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध
- विद्यार्थी, शाळा व कर्मचाऱ्यांना करता येणार लॉगइन
- नमुना प्रश्नपत्रिका, वेळापत्रक, निकालासह सर्व बाबींचा समावेश
- फी परतावा, अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षा गुणांसह अन्य सुविधा शाळांसाठी उपलब्ध

### विश्वविक्रमात विद्यापीठाचाही सहभाग

#### विविध विभाग, महाविद्यालयांना कुलगुरूंचे आवाहन

पुणे, ता. ९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विविध विभाग, संलग्न महाविद्यालये, परिसंस्था पुणे पुस्तक महोत्सवात सक्रिय सहभाग घेतील. महोत्सवांतर्गत 'पुस्तकांच्या छायाचित्रांचा सर्वांत मोठा ऑनलाइन अल्बम' हा विश्वविक्रम करण्याचा संकल्प आहे.

सावित्री कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले की, प्रत्येकाने आपल्या संग्रहातील किंवा वाचनालयातील दुर्मीळ किंवा आवडत्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा फोटो काढून संबंधित लिंकवर पाठवावा. यात तंत्रज्ञान विभागाचे विद्यार्थीही सहभागी झाले आहेत.

राष्ट्रीय पुस्तक न्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, फर्ग्युसन महाविद्यालय, महापालिका यांच्या संयोजनातून येत्या शनिवारपासून (ता. १४) पुणे पुस्तक महोत्सव सुरू होत आहे. महोत्सवांतर्गत 'सकाळ'च्या माध्यमातून विश्वविक्रमी उपक्रम राबविण्यात येईल. याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात येणार आहे.

महोत्सवानिमित्त येत्या बुधवारी (ता. ११) 'शांतता...पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम होणार आहे. या उपक्रमातही विद्यापीठाचा शैक्षणिक विभाग, संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी होतील. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी आणि ज्ञानार्जनासाठी पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यांतील विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन डॉ. गोसावी यांनी केले आहे.

महोत्सवांतर्गत शनिवारी (ता. १४) होणाऱ्या ग्रंथ दिंडीत विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी होतील.

**वाचनप्रेमींना आवाहन**

- विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी सांगितले की, 'पुणे पुस्तक महोत्सवात यावर्षी 'पुस्तकांच्या मुखपृष्ठांच्या छायाचित्रांचा सगळ्यात मोठा ऑनलाइन अल्बम' असा विश्वविक्रम होणार आहे. त्यात सहभागी होण्यासाठी वाचनप्रेमींनी क्यूआर कोड स्कॅन करून सहभाग नोंदवावा.'

पुस्तकाचे मुखपृष्ठ अपलोड करण्यासाठी लिंक : https://photoupload.pbf24.in

**विश्वविक्रमी उपक्रमाविषयी...**

- आपल्याला आवडत्या किंवा आपल्याकडील दुर्मीळ पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र मोबाईलच्या साहाय्याने काढून ते पाठवायचे आहे.
- एकावेळी एका छायाचित्रात केवळ एका पुस्तकाचेच मुखपृष्ठ दिसेल, असे छायाचित्र संबंधित लिंकवर अपलोड करावे.
- छायाचित्रात पुस्तकाच्या आजूबाजूची चारही बाजूंनी थोडी थोडी जागा सोडून, केवळ पुस्तकाचे मुखपृष्ठ दिसेल असे छायाचित्र काढावे.
- एकावेळी फक्त एका पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र पाठवावे. परंतु, एक व्यक्ती एकामागून एक असे कितीही पुस्तकांच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र काढून वेगवेगळे पाठवू शकतो.
- मुखपृष्ठाचे छायाचित्र काढताना पुस्तकाचे नाव व्यवस्थित वाचता यायला हवे.

### पुस्तक महोत्सव स्थळाचे प्रवेशद्वार ठरणार आकर्षण

#### आज सायंकाळी उद्‌घाटन सोहळा होणार

पुणे, ता. ९ : पुण्याला मानबिंदू आणि वैभवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या शनिवारवाड्याचे प्रवेशद्वार आणि पुण्याच्या वाचनसंस्कृतीची ओळख दर्शविणारे पुस्तकरूपी बुरूज असे पुणे पुस्तक महोत्सवाचे बोधचिन्हच भव्यदिव्य प्रवेशद्वाराच्या स्वरूपात साकारण्यात आले आहे. साहित्यप्रेमींचा कुंभमेळा असलेल्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या या भव्य प्रवेशद्वाराचे उद्‌घाटन मंगळवारी (ता. १०) सायंकाळी पाच वाजता फर्ग्युसन महाविद्यालयात होणार आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव येत्या शनिवारपासून (ता. १४) सुरू होत आहे. संयोजक राजेश पांडे आणि कला दिग्दर्शक विनायक तासकर यांच्या संकल्पनेतून हे प्रवेशद्वार साकारण्यात आले आहे.

'या वेळी माजी आमदार उल्हास पवार, माजी खासदार प्रदीप रावत, माजी महापौर अंकुश काकडे, ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, अभिनेते प्रवीण तरडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत महोत्सवाच्या प्रवेशद्वाराचे उद्‌घाटन होईल,' असेही पांडे यांनी सांगितले.

**अशी आहे भव्यता...**

- ६६ फूट रुंदी आणि ३३ फूट उंची असलेले प्रवेशद्वार प्लायबोर्ड, खरशीट असे साहित्य वापरून तयार केले आहे. त्यासाठी फॅब्रिकेशनही करण्यात आले आहे.

Sakal 10.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार 'पुस्तक महोत्सवा'चे उद्‌घाटन

### पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

वाचन चळवळ सक्षम करण्यासाठी आणि पुण्याला नवी ओळख देण्यासाठी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे उद्‌घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी, १४ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता होणार आहे. मुख्यमंत्री झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांचा पहिलाच पुणे दौरा असल्याने, समारंभाला पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत केले.

या वेळी संयोजन समितीचे सदस्य प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, प्राचार्य डॉ. संजय चाकणे आदी उपस्थित होते. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर येत्या १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव' होत आहे. महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात सुरू असून, उद्‌घाटनाचा कार्यक्रम हजारो पुणेकरांच्या उपस्थितीत जल्लोषात होणार असल्याचे पांडे यांनी सांगितले.

दरम्यान, 'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या बोधचिन्हाच्या स्वरूपात साकारलेल्या भव्य प्रवेशद्वाराचे उद्‌घाटन मंगळवारी सायंकाळी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ साहित्यिक-वात्रटिकाकार रामदास फुटाणे, ज्येष्ठ लेखक अच्युत गोडबोले, माजी आयपीएस अधिकारी अशोक धिवरे, महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, संजय नहार, माजी खासदार प्रदीप रावत, डॉ. सतीश देसाई, डॉ. सुधाकर जाधवर आदी उपस्थित होते.

पुण्यनगरीचा मानबिंदू असलेल्या शनिवारवाड्याचे प्रवेशद्वार आणि पुण्याच्या वाचनसंस्कृतीची ओळख दर्शविणारे पुस्तकरूपी बुरूज अशा संकल्पनेतील महोत्सवाचे बोधचिन्ह महोत्सवाच्या प्रवेशद्वाराच्या स्वरूपात साकारण्यात आले.




'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ डिसेंबपासून आयोजित होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या आकर्षक प्रवेशद्वाराचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत मंगळवारी झाले.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'पुणे पुस्तक महोत्सवा'तील पुस्तकांच्या स्टॉलला भेट देऊन, लेखक, साहित्यिक, प्रकाशकांशी संवाद साधणार आहेत. या निमित्ताने पुणेकरांना देवेंद्रजींशी संवाद साधण्याची संधी मिळेल. उद्‌घाटनाचा मुख्य कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या भव्य मंचावर होणार आहे.
>
> - राजेश पांडे, मुख्य संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

### आज 'शांतता... पुणेकर वाचत आहेत'मध्ये सहभागी व्हा

'शांतता...पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम आज, बुधवारी (११ डिसेंबर) दुपारी १२ ते एक या वेळेत अप्पा बळवंत चौकासह शाळा, महाविद्यालये, पुणे मेट्रो स्टेशन, पीएमपीएमएल बसथांबे, विमानतळ, कारागृह, वाचनालये, ग्रंथालये अशा शेकडो ठिकाणी उत्साहात होणार आहे. पुणेकरांनी आज १२ ते एक या वेळेत असेल, त्या ठिकाणी आपल्या आवडीचे पुस्तक वाचून, वाचन चळवळ बळकट करण्यासाठी योगदान द्यायचे आहे, असे आवाहन राजेश पांडे यांनी केले आहे.

Maharashtra Times 11.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# ग्रंथदिंडीत विद्यापीठाचा सहभाग

### 'शांतता...पुणेकर वाचत आहेत'मध्ये सहभागाचे आवाहन

### 'ज्ञानसरिता दिंडी'तून समाजसुधारकांची माहिती

'पुणे पुस्तक महोत्सवा'चे उद्घाटन होण्यापूर्वी शहरात नावीन्यपूर्ण 'ज्ञानसरिता दिंडी' काढण्यात येणार आहे. या दिंडीत पुणे विद्यापीठाशी संलग्न १०१ महाविद्यालयांतील दिंड्या सहभागी होणार आहेत. पुणे परिसरातील संत, क्रांतिकारक, समाजसुधारक, विचारवंत यांच्या कार्यावर आधारित दिंड्या असतील. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्व विचारांची दिंडी टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूल शाळेतून सुरू होऊन, फर्ग्युसन महाविद्यालयात येणार आहे, अशी माहिती बागेश्री मंठाळकर यांनी दिली.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'पुणे पुस्तक महोत्सवा'त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सक्रिय सहभाग घेतला असून, या निमित्ताने आज, बुधवारी (दि. ११) होणाऱ्या 'शांतता...पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी होतील. यासोबतच विद्यार्थी ज्ञानसरिता ग्रंथ दिंडी काढणार असून, 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्येही सहभाग घेणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दिली.

'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव' होत आहे. या निमित्ताने १४ डिसेंबरला निघणाऱ्या ग्रंथदिंडीत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. वाचन संस्कृतीचा जागर होण्यासाठी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम बुधवारी दुपारी १२ ते एक या वेळेत होईल. या उपक्रमात पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांतील विद्यापीठाचे सर्व घटक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी व पालक आपल्या आवडत्या पुस्तकाचे वाचन करतील आणि त्याचा फोटो pbf24.in/register वर पाठविण्याचे आवाहन डॉ. गोसावी यांनी केले आहे.

याचाच एक भाग म्हणजे पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या साह्याने पुस्तकांच्या मुखपृष्ठांच्या छायाचित्रांचा सगळ्यात मोठा ऑनलाइन अल्बम हा 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'साठी करण्यात येणार आहे. 'पुणे पुस्तक महोत्सवा'त संशोधक, लेखक, साहित्यिक, कवी, चित्रकार, अभ्यासक यांची मांदियाळी आहे. या सर्वांना विद्यार्थ्यांना भेटण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमात कलावंतांच्या सादरीकरणाचा आनंद घेता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल यांनी पुणे पुस्तक महोत्सवात उपस्थित राहून वाचनसंस्कृती बळकट करावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले आहे.

Maharashtra Times 11.12.2024

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'क्यूएस' क्रमवारीत आयआयटी दिल्ली देशात अव्वल

### 'आयआयएससी' पर्यावरण शिक्षणात आघाडीवर

पीटीआय, नवी दिल्ली

**भारतीय तंत्रज्ञान** संस्था (आयआयटी), दिल्ली भारतातील विद्यापीठांमध्ये शाश्वततेच्या बाबतीत अव्वल आहे. मंगळवारी जाहीर २०२५च्या 'क्यूएस क्रमवारी'नुसार आयआयटी, दिल्ली जागतिक स्तरावर २५५ वरून १७१ वर पोहोचली आहे. एकूण ७८ भारतीय विद्यापीठे या क्रमवारीत आहेत. यात देशातील १० शैक्षणिक संस्थांपैकी नऊ संस्थांच्या क्रमवारीत सुधारणा झाली आहे. तर २१ नवीन संस्थांचा यात समावेश झाला आहे.

आयआयटी-दिल्ली आणि आयआयटी-कानपूरला पर्यावरणीय प्रभावासाठी जगातील आघाडीच्या १०० विद्यापीठांत तर भारतीय विज्ञान शिक्षण संस्था (आयआयएससी), बंगळुरूला पर्यावरण शिक्षणासाठी जगातील आघाडीच्या ५० मध्ये आहेत. ७८ भारतीय विद्यापीठांपैकी ३४ संस्थांनी क्रमवारीत सुधारणा केली . आठ विद्यापीठांनी त्यांचे स्थान कायम राखले आहे.

### टोरंटो विद्यापीठ प्रथम

**क्यूएस क्रमवारीत १०७ देश आणि प्रदेशांमधील १,७४० पेक्षा अधिक विद्यापीठांचा सहभाग आहे. टोरंटो विद्यापीठ हे या वर्षी जगातील अव्वल क्रमांकाचे विद्यापीठ ठरले. ईटीएच झुरिचने दुसरे स्थान मिळवले आहे.**

11/12/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'भारतीय व्यवहार कोश' ग्रंथालयांना प्रदान



**कोशकार विश्वनाथ** नरवणे यांच्या १०१ व्या जन्मदिनाचे औचित्य साधून भारतीय विचार साधनेच्या वतीने पुणे जिल्ह्यातील शालेय, महाविद्यालयीन, सार्वजनिक तसेच खासगी ग्रंथालयांना विश्वनाथ नरवणे यांच्या 'भारतीय व्यवहार कोश' या खंडाचे विनामूल्य वितरण करण्यात आले. पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघाचे अध्यक्ष प्रदीप बागल, भारतीय विचार साधनेचे कार्यवाह काशिनाथ देवधर, भाविसा फाउंडेशनचे संचालक बिपिन पाटसकर, संदर्भ ग्रंथपाल प्रसाद भडसावळे या वेळी उपस्थित होते.

भारतीय एकात्मतेचा सर्वव्यापी संचार होण्यासाठी विविध प्रांतांतील बोली भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या भावनेतून व्यवहार कोशाची निर्मिती करणाऱ्या विश्वनाथ नरवणे यांच्या कार्यकर्तृत्वाचा व भारतीय व्यवहार कोश निर्मितीबाबतच्या भूमिकेचा परिचय संदर्भ भडसावळे यांनी आपल्या मनोगतातून करून दिला.

11/12/2024 | Pune | Page : 19
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

**लोकमत**

# बारावीत न शिकलेल्याही विषयाची निवड करण्याची मुभा मिळणार

## सीयूईटी-यूजी परीक्षेच्या निकषांमध्ये बदल, हायब्रिड मोड नसणार

**नवी दिल्ली :** विद्यार्थांना इयत्ता १२ वीत नसलेल्या विषयाची निवड करून सामान्य विद्यापीठ प्रवेश परीक्षा - अंडरग्रॅज्युएट (सीयूईटी-यूजी) देता येईल, म्हणजे कोणत्याही शाखेतला विद्यार्थी ही परीक्षा देऊ शकेल. तसेच ही परीक्षा २०२५ पासून केवळ संगणक-आधारित परीक्षा म्हणून घेतली जाईल, असे विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) चे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी सांगितले आहे.

कुमार म्हणाले की, आयोगाने स्थापन केलेल्या तज्ज्ञांच्या समितीने परीक्षेचा आढावा घेतला. यात परीक्षेची रचना, पेपरची संख्या, चाचणी पेपरचा कालावधी, अभ्यासक्रम संरेखन, आदीचा समावेश आहे आणि त्यानंतर अनेक बदल सुचवले.

कुमार म्हणाले, "गेल्या वर्षीच्या 'हायब्रिड मोड' (संगणक-आधारित आणि उत्तरपत्रिका प्रणाली) ऐवजी, २०२५ पासून संगणक-आधारित परीक्षा असेल. आम्ही विषयांची संख्या ६३ वरून ३७ पर्यंत कमी केली आहे. तसेच काढून टाकलेल्या विषयांसाठी कॉमन ॲप्टिट्यूड टेस्टमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाईल."

### कठोर विषयांच्या सीमा ओलांडण्याची संधी

१ परीक्षेतील बदलांविषयी माहिती देताना कुमार म्हणाले की, "परीक्षार्थींना त्यांनी १२ वीमध्ये न शिकलेले विषयही सीयूईटी-यूजीसाठी निवडण्याची परवानगी देण्यात येणार आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात कठोर विषयाच्या सीमा ओलांडण्याची संधी मिळू शकेल."

२ विद्यार्थी आता सीयूईटी-यूजीसाठी सहा ऐवजी जास्तीत जास्त पाच विषयांमध्ये बसू शकतील. त्याचप्रमाणे, विषयानुसार ४५ मिनिटांपासून ते ६० मिनिटांपर्यंत असणारा परीक्षेचा कालावधी आता ६० मिनिटांवर प्रमाणित करण्यात आला आहे. परीक्षेतील ऐच्छिक प्रश्नांची संकल्पनाही रद्द करण्यात आली असून, आता सर्व प्रश्न अनिवार्य असणार आहेत, असे कुमार यांनी स्पष्ट केले.

Pune Main
Page No. 12 Dec 11, 2024
Powered by: erelego.com

**प्रभात** City 11 Dec 2024_013 11 Dec 2024

# आविष्कार संशोधन स्पर्धा रविवारी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे,** दि. १० - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी संशोधन स्पर्धे अंतर्गत आविष्कार, अन्वेषन, इनोव्हेशन परिषद यासारखे उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विभागीय स्तरांवर निवडलेल्या संशोधन स्पर्धकांसाठी विद्यापीठस्तर संशोधन स्पर्धा रविवारी (दि. १५) विद्यापीठातील खाशाबा जाधव कीडा संकुल येथे आयोजित करण्यात येणार आहे.

संशोधन स्पर्धेत फक्त विद्यापीठस्तर स्पर्धेसाठी निवडलेल्या सहा विद्याशाखांच्या यूजी, पीजी, पीपीजीच्या प्रत्येक प्रकल्पासाठी फक्त एकाच संशोधक विद्यार्थ्याने आपला संशोधन प्रकल्प सादर करता येणार आहे. संशोधन विद्यार्थ्याने पोस्टरवर स्वतःचे नाव, महाविद्यालयाचे नाव, विद्यापीठाचे नाव अथवा कोणत्याही ओळख चिन्हांचा वापर करू नये. विद्यापीठस्तर स्पर्धे साठी पात्र संशोधन स्पर्धेच्या ठिकाणी संशोधन कोड देण्यात येईल. विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या परिपत्रकामध्ये निवड करण्यात आलेल्या संशोधक विद्यार्थ्यानेच फक्त सदर स्पर्धेस उपस्थित रहावे. प्राचार्य, शिक्षक, पालक किंवा संशोधन समन्वयकांनी संशोधन सादरीकरणाच्या ठिकाणी उपस्थित राहू नये. संशोधक विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ओळखपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष संचालक प्रा. डॉ. संजय ढोले यांनी स्पष्ट केले आहे.

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# CUET-UG to be fully online, students can choose any subject, says UGC chief

VIDHEESHA KUNTAMALLA
NEW DELHI, DECEMBER 10

FOLLOWING RECOMMENDATIONS by an expert panel, the CUET-UG from next year will be a computer-based test (CBT), a shift from the earlier hybrid mode, and students will be allowed to appear for subjects irrespective of subjects studied in Class 12, said University Grants Commission (UGC) Chairperson M Jagadesh Kumar on Tuesday.

The UGC also announced that the number of subjects will be reduced from 63 to 37 and admissions for programmes in dropped subjects will be based on the General Aptitude Test (GAT) scores.

Speaking to The Indian Express, Kumar said, "Based on feedback from past years, we are continuously working to improve the exam process and provide a better, more efficient and conducive environment for students taking CUET. In this spirit, the UGC has constituted an expert committee to review the conduct of CUET-UG 2025. The committee has examined various aspects of the test, such as its structure, number of papers, duration of test papers, syllabus alignment, and operational logistics. The commission considered these recommendations in its meeting held on 13th November 2024."

"Candidates will also be allowed to opt for subjects in CUET-UG which they haven't studied in Class 12 to allow the students to cross over the rigid disciplinary boundaries in higher education," the UGC chief said.

He said that the decision to adopt CBT instead of OMR-based tests was "to reduce the scope for human errors in evaluation."

"CBT allows quicker result processing and provides enhanced security, ensuring the integrity of the exam process... Making all questions compulsory provides a level playing field for all candidates, and their overall proficiency is tested. A compulsory-answer format offers a more comprehensive and uniform assessment of their knowledge and abilities as all candidates are evaluated on the same set of questions. It also encourages students to adopt well-rounded preparation as they must prepare to address all topics covered in the test," Kumar said.

Instead of separate tests for 33 languages, tests will be offered for only 13 languages — Assamese, Bengali, English, Gujarati, Hindi, Kannada, Malayalam, Marathi, Punjabi, Odia, Tamil, Telugu and Urdu.

The domain-specific subjects have been reduced from 29 to 23. The dropped domain-specific papers are Entrepreneurship, Teaching Aptitude, Fashion Studies, Tourism, Legal Studies and Engineering Graphics.

The test duration has also been made identical for all papers and standardised at 60 minutes, he said, adding that the number of questions have been made identical for all papers. The concept of optional questions in the exam has also been done away with and all questions will be compulsory now, Kumar added.

CUET-UG, conducted by the National Testing Agency (NTA), serves as the single gateway for UG admissions across 46 central universities, including Delhi University, BHU, and Allahabad University.

In 2024, the exam was held in both online and pen-and-paper modes in multiple shifts from May 15-31, but the announcement of results, originally scheduled for June 30, was delayed.

When the test was held for the first time in 2022, technical glitches and logistical issues had delayed results until September. Last year, results were postponed until mid-July to accommodate candidates from Manipur amid ethnic conflicts.

WITH PTI INPUTS

**KEY CHANGES IN THE TEST**

NO. OF SUBJECTS REDUCED FROM 63 TO 37

- Computer-based test instead of hybrid mode
- Candidates can opt for subjects which they haven't studied in Class 12
- Admissions for programmes in dropped subjects will be based on the General Aptitude Test (GAT) scores

**INSTEAD OF** separate tests for 33 languages, tests will be offered for only 13 languages

**DOMAIN-SPECIFIC** subjects reduced from 29 to 23

**CONCEPT OF** optional questions done away with

60 MINUTES TEST DURATION

The Indian Express 11.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# साडेतीन लाख लोकांचे वाचन

**पुणे पुस्तक महोत्सव**

## 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद

आशिष काळे

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या पार्श्वभूमीवर बुधवारी शहरात ठिकठिकाणी राबविण्यात आलेल्या 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात सुमारे साडेतीन लाख नागरिकांनी सहभाग नोंदवला. अप्पा बळवंत चौक, महात्मा फुले मंडई, पीएमपीएमएल डेपो, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महानगरपालिका, शाळा, महाविद्यालय, ग्रंथालय, वाचनालयांमध्ये हा उपक्रम उत्स्फूर्तपणे राबविण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सामाजिक, साहित्य, कला, उद्योग, शिक्षण अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या उपक्रमात सहभागी होऊन एक तास वाचन केले.

'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी बुधवारी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम राबवण्यात आला.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार सुनेत्रा पवार, आमदार चंद्रकांत पाटील, हेमंत रासने, सिद्धार्थ शिरोळे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, अभिनेत्री विभावरी देशपांडे, अभिनेते प्रवीण तरडे, सुबोध भावे, लेखक किरण यज्ञोपवीत, रमेश परदेशी, ज्येष्ठ लेखक वसंत वसंत लिमये, उद्योजक पुनीत बालन, कृष्णकुमार गोयल, 'न्यासा'चे अध्यक्ष मिलिंद मराठे, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, संचालक युवराज मलिक अशा अनेकांनी उपक्रमात सहभाग घेतला.

या वेळेत समता भूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, महात्मा फुले मंडई, अंधशाळा, मेट्रो स्थानक, पुणे महापालिका अशा ठिकाणी सार्वजनिक पुस्तक वाचन करण्यात आले.

**वाचनाचे फोटो केले 'अपलोड'**

या उपक्रमात ३० हजारहून अधिक लोकांनी पुस्तक वाचतानाचे आपले छायाचित्र 'अपलोड' केले. सुमारे साडेतीन लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी आपले आवडते पुस्तक वाचले, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली.



'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या पार्श्वभूमीवर आयोजित 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात बुधवारी विविध शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले.



'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात बुधवारी अप्पा बळवंत चौकात आमदार चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सामूहिक वाचन करण्यात आले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### 'राजकारण्यांनी वाचन करणे गरजेचे'

''शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम महत्त्वाचा आहे. अनेक राजकारणी उत्तम वाचक, लेखक आहेत. वाचनासाठी एकाग्रता लागते. आजच्या काळात वाचनाच्या पद्धती बदलल्या आहेत. ऑडिओ बुक्स उपलब्ध झाली आहेत. पुस्तके मोबाइलवर मिळतात. महाराष्ट्रातील ११ हजार सार्वजनिक वाचनालयांमुळे वाचनाची चांगली संस्कृती आहे. या ग्रंथालयांना राज्य सरकारकडून ४०० कोटी रुपये अनुदान दिले जाते,' असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

Maharashtra Times 12.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# 'सर्व काळांत संदर्भग्रंथ महत्त्वाचे'

(चित्र : एआय)



### 'भारतीय व्यवहार कोश' ग्रंथालयांना प्रदान

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'देशात संदर्भग्रंथांना मोठी परंपरा आहे. विविध संकल्पनांवर आधारित कोश मराठीतही उपलब्ध आहेत. एखाद्या संकल्पनेची अधिकृत माहिती हवी तर कोशवाङ्मयाला पर्याय नाही. त्यामुळेच बदलत्या काळातही संदर्भ ग्रंथांचे मोल कमी झालेले नाही,' असे मत अखिल भारतीय मराठी बालकुमार संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू यांनी व्यक्त केले.

निमित्त होते, भारतीय विचार साधना (भाविसा) प्रकाशन संस्थेतर्फे आयोजित पुणे जिल्ह्यातील ग्रंथालयांना 'भारतीय व्यवहार कोश' प्रदान कार्यक्रमाचे. व्यासपीठावर पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघाचे अध्यक्ष प्रदीप बागल, भारतीय विचार साधनेचे कार्यवाह काशिनाथ देवधर, 'भाविसा फाउंडेशन'चे संचालक बिपिन पाटसकर उपस्थित होते.

या वेळी ज्येष्ठ क्रांतिकारक कवी व कोशकार विश्वनाथ नरवणे यांच्या १०१व्या जयंती वर्षानिमित्त पुणे जिल्ह्यातील शालेय, महाविद्यालयीन, सार्वजनिक; तसेच खाजगी ग्रंथालयांना नरवणे यांच्या 'भारतीय व्यवहार कोश' या खंडाचे वितरण करण्यात आले.

राजगुरू म्हणाले, 'ग्रंथपाल केवळ वाचणारे सुंदर हात नसून, ते वाचकांना दर्जेदार साहित्य उपलब्ध करून त्यांना समृद्धी करीत असतात. मनोरंजनात्मक साहित्यासोबतच कोश वाङ्मयाच्या वाचनाने विषय संकल्पना स्पष्ट होतात. त्यामुळेच विविध ग्रंथालयापर्यंत कोश विनामूल्य पोहोचवल्याबद्दल भारतीय विचार साधनेचे कौतुक केले पाहिजे.'

भारतीय एकात्मतेचा सर्वव्यापी संचार होण्यासाठी विविध प्रांतातील बोली भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या भावनेतून व्यवहार कोशाची निर्मिती करणाऱ्या विश्वनाथ नरवणे यांच्या कार्यकर्तृत्वाचा व भारतीय व्यवहार कोश निर्मितीबाबतच्या भूमिकेचा परिचय संदर्भ ग्रंथपाल व माहितीतज्ज्ञ प्रसाद भडसावळे यांनी उपस्थितांना करून दिला.

प्रदीप बागल यांनी, शालेय जीवनात पुस्तकांचे महत्त्व सांगतानाच ग्रंथपालांचे एकंदरीतच वाचन व्यवहारातील महत्त्व विशद केले. कार्यक्रमास पुणे जिल्ह्यातील ८०हून अधिक ग्रंथपाल प्रतिनिधी उपस्थित होते. काशीनाथ देवधर यांनी प्रास्ताविक आणि बिपीन पाटसकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. शरयू लोणकर यांनी सूत्रसंचालन केले.

Maharashtra Times 12.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# साडेतीन लाख लोकांचे वाचन

**पुणे पुस्तक महोत्सव**

## 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या पार्श्वभूमीवर बुधवारी शहरात ठिकठिकाणी राबविण्यात आलेल्या 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात सुमारे साडेतीन लाख नागरिकांनी सहभाग नोंदवला. अप्पा बळवंत चौक, महात्मा फुले मंडई, पीएमपीएमएल डेपो, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महानगरपालिका, शाळा, महाविद्यालय, ग्रंथालय, वाचनालयांमध्ये हा उपक्रम उत्स्फूर्तपणे राबविण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सामाजिक, साहित्य, कला, उद्योग, शिक्षण अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या उपक्रमात सहभागी होऊन एक तास वाचन केले.

'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी बुधवारी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम राबवण्यात आला.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार सुनेत्रा पवार, आमदार चंद्रकांत पाटील, हेमंत रासने, सिद्धार्थ शिरोळे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, अभिनेत्री विभावरी देशपांडे, अभिनेते प्रवीण तरडे, सुबोध भावे, लेखक किरण यज्ञोपवीत, रमेश परदेशी, ज्येष्ठ लेखक वसंत वसंत लिमये, उद्योजक पुनीत बालन, कृष्णकुमार गोयल, 'न्यासा'चे अध्यक्ष मिलिंद मराठे, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, संचालक युवराज मलिक अशा अनेकांनी उपक्रमात सहभाग घेतला.

या वेळेत समता भूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, महात्मा फुले मंडई, अंधशाळा, मेट्रो स्थानक, पुणे महापालिका अशा ठिकाणी सार्वजनिक पुस्तक वाचन करण्यात आले.

अशिष काळे



'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या पार्श्वभूमीवर आयोजित 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात बुधवारी विविध शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले.



'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात बुधवारी अप्पा बळवंत चौकात आमदार चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सामूहिक वाचन करण्यात आले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### 'राजकारण्यांनी वाचन करणे गरजेचे'

''शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम महत्त्वाचा आहे. अनेक राजकारणी उत्तम वाचक, लेखक आहेत. वाचनासाठी एकाग्रता लागते. आजच्या काळात वाचनाच्या पद्धती बदलल्या आहेत. ऑडिओ बुक्स उपलब्ध झाली आहेत. पुस्तके मोबाइलवर मिळतात. महाराष्ट्रातील ११ हजार सार्वजनिक वाचनालयांमुळे वाचनाची चांगली संस्कृती आहे. या ग्रंथालयांना राज्य सरकारकडून ४०० कोटी रुपये अनुदान दिले जाते,' असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**वाचनाचे फोटो केले 'अपलोड'**

या उपक्रमात ३० हजारहून अधिक लोकांनी पुस्तक वाचतानाचे आपले छायाचित्र 'अपलोड' केले. सुमारे साडेतीन लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी आपले आवडते पुस्तक वाचले, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

Maharashtra Times 12.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# Total subjects reduced to 37 from 63 in CUET

**HT Correspondent**
puneletters@hindustantimes.com

**PUNE:** University Grant Commission (UGC) has announced changes in the Common University Entrance Test (CUET), undergraduate and postgraduate 2025, saying the total number of subjects has been reduced to 37 from 63 and there will be a uniform exam duration of 60 minutes.

"Students will be allowed to appear for CUET-UG in any subject other than the subjects they studied in Class 12. Along with this, this exam will now be conducted only in Computer Based Test (CBT) mode. From 2025, students will be able to appear for a maximum of five subjects in CUET-UG. The duration of all CUET-UG exams will be 60 minutes. Along with this, the concept of optional questions in the exam has also been abolished and now all questions will be compulsory. Also, from the 2025 session, CUET-UG will be conducted in 63 subjects instead of 37," said Jagdish Kumar, UGC chairman.

He said 20 language subjects have been discontinued and admissions to the dropped subjects can be done based on General Aptitude Test (GAT) scores.

The domain-specific subjects were 29 earlier, but the UGC has decided to discontinue six subjects, bringing the number down to 23, Kumar added.

The UGC had constituted a committee of experts to review CUET UG and PG. These changes have been made after the review conducted by this panel.

> THE UGC HAD CONSTITUTED A COMMITTEE OF EXPERTS TO REVIEW CUET UG AND PG. THESE CHANGES HAVE BEEN MADE AFTER THE REVIEW CONDUCTED BY THIS PANEL

"We are discontinuing six papers including Entrepreneurship, Teaching Aptitude, Fashion Studies, Tourism, Legal studies and Engineering graphics... in undergraduate programmes, admissions can be taken based on the general test score," said Kumar.

"The commission will soon publish a detailed draft of revised guidelines for conducting CUET-UG and CUET-PG 2025, in which feedback and suggestions will be sought from students, parents, teachers and institutions.'

Students have welcomed the decision of UGC, Manisha Rathi a student said, "It is an important decision taken by the UGC which will help us to choose different subjects to appear for the CUET exams in future. Also, the time has been extended up to 60 minutes which will be beneficial for us."

*(With Agency Inputs)*

Hindustan Times 12.12.2024

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City _13 Dec 2024_013
13 Dec 2024

# पुणे पुस्तक महोत्सवात भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १२ - भारतीय भाषांमधील पुस्तकांचे ६०० पेक्षा अधिक स्टॉल, ८० पेक्षा अधिक पुस्तकांचे प्रकाशन, बाल चित्रपट महोत्सव, शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम अशा भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी यंदाच्या पुणे पुस्तक महोत्सवात नागरिकांना मिळणार आहे.

या महोत्सवात पुस्तकांची खरेदी करणाऱ्या नागरिकांना पुस्तकांवर १० टक्के सवलत आहे. त्याचप्रमाणे महोत्सवात होणारे संपूर्ण कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून, सकाळ ते रात्रीपर्यंत फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर रंगणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येनी विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे (एनबीटी) संचालक युवराज मलिक आणि विश्वस्त राजेश पांडे यांनी केले.

### आज विश्वविक्रम होणार

पुणे पुस्तक महोत्सवात दहा हजार पुस्तकांच्या सहाय्याने सरस्वती यंत्राचे सुंदर चित्र तयार करण्याचा विश्वविक्रम दुपारी चार वाजता करण्यात येणार आहे. यावेळी विधान परिषदेचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चित्रा वाघ, माधुरी मिसाळ, रतन टाटा राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती राजेश पांडे यांनी दिली.

पुस्तकांची दालने सकाळी १० ते रात्री १० या वेळेत कार्यरत असतील. शालेय विद्यार्थ्यांसाठी १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत दररोज सकाळी आणि दुपारच्या सत्रात कथा लिहिणे, चित्रकला, नृत्य, संगीत, वेदिक गणित अशा विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत दुपारी १२ ते ४ या वेळेत पुणे बाल चित्रपट महोत्सव होणार आहे. पुणे पुस्तक महोत्सवात लिट फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात आले आहे.

---

# 'पुस्तक महोत्सवा'त भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी

**पुणे पुस्तक महोत्सव**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

भारतीय भाषांमधील पुस्तकांचे ६००हून अधिक स्टॉल, ८० पुस्तकांचे प्रकाशन, बालचित्रपट महोत्सव, शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि लिट फेस्टिव्हल अशा कार्यक्रमांची मेजवानी यंदा 'पुणे पुस्तक महोत्सवा'त मिळणार आहे. युवकांमध्ये ट्रेंडिंग असलेले बँड दररोज सायंकाळी अनुभवता येणार आहेत.

'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या (एनबीटी) वतीने आयोजित पत्रकार परिषदेत 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे तपशील 'न्यासा'चे संचालक युवराज मलिक आणि विश्वस्त राजेश पांडे यांनी दिले. या वेळी पुणे पुस्तक महोत्सवाच्या संयोजन समितीचे सदस्य आनंद काटीकर, प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, डॉ. संजय चाकणे आदी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि पुणे महापालिकेच्या सहकार्याने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर येत्या १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव होईल. महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या, शनिवारी १४ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता होईल.

### महोत्सवात चुकवू नये असे काही

- प्रसिद्ध लेखक शिव खेरा यांचे व्याख्यान.
- निती आयोगाचे माजी सीईओ अमिताभ कांत यांचे मार्गदर्शन.
- 'अभंग रीपोस्ट', 'युग्म', 'हरगुन कौर' आणि 'साधो' अशा प्रसिद्ध बँडचे सादरीकरण.
- 'ट्रेनिंग द ट्रेनर्स' हा उपक्रम दररोज.
- उद्योजक गोविंद ढोलकिया यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान.
- दीपा किरन : द आर्ट ऑफ स्टोरीटेलिंग
- हिरू भोजवानी : बेस्ट प्रॅक्टिसेस इन लायब्ररी
- विवेककुमार : टीचिंग क्विक कॅलक्युलेशन्स थ्रू वेदिक मॅथेमॅटिक्स

**"पुणे पुस्तक महोत्सवाला यंदा राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले असून, त्याला आंतरराष्ट्रीय करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवे. यंदाच्या महोत्सवात विविध भाषांमधील सुमारे ८०पेक्षा अधिक पुस्तकांचे प्रकाशन होणार आहेत. या महोत्सवात नागरिकांना लेखक, साहित्यिक, विचारवंत, कवी, पत्रकार यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे सर्वांनी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट देऊन, दुर्मीळ, नाविन्यपूर्ण, प्रसिद्ध पुस्तकांच्या खरेदीचा आनंद घ्यावा.**
**- राजेश पांडे, मुख्य संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव**

पुस्तकांची दालने सकाळी १० ते रात्री १० या वेळेत सुरू असतील. यात पुस्तकांची खरेदी करणाऱ्या नागरिकांना १० टक्के सवलत मिळणार आहे. सर्व कार्यक्रम मोफत आहेत. त्यामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक, अभ्यासकांनी हजेरी लावून पुणे शहराला 'वाचन संस्कृती जपणारे शहर' म्हणून ओळख देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मलिक आणि पांडे यांनी गुरुवारी केले.

**चित्रपट महोत्सव रंगणार**

शालेय विद्यार्थ्यांसाठी १४ ते २२ डिसेंबरदरम्यान दररोज सकाळी आणि दुपारी कथा लिहिणे, चित्रकला, नृत्य, संगीत, वेदिक गणित अशा विविध कार्यशाळा आणि स्पर्धा आयोजिण्यात आल्या आहेत. त्या मोफत असून, त्यात विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. १४ ते १८ डिसेंबरदरम्यान दुपारी ११ ते चार या वेळेत पुणे बालचित्रपट महोत्सव होणार आहे. हा उपक्रमही मोफत असल्याचे युवराज मलिक यांनी सांगितले.

**'लिट फेस्ट'मध्ये नामवंत**

पुणे पुस्तक महोत्सवात यंदा २० ते २२ डिसेंबरला 'लिट फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे. यात २५हून अधिक सत्र विविध विषयांवर होतील. त्यात ६०पेक्षा अधिक साहित्यिक, लेखक, विचारवंत, पत्रकार, कवी सहभागी होतील. हे कार्यक्रम फर्ग्युसनच्या ॲम्फी थिएटरमध्ये होणार असून, मोफत असतील. महोत्सवात १० हजार पुस्तकांच्या साह्याने सरस्वती यंत्राचे सुंदर चित्र तयार करण्याचा विश्वविक्रम दुपारी चार वाजता करण्यात येईल, असे राजेश पांडे यांनी सांगितले.

Maharashtra Times 13.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 14 Dec 2024_005
14 Dec 2024
www.dainikprabhat.com

### पुणे पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला उपक्रम

# विश्वविक्रम...१० हजार पुस्तकांतून साकारले श्री सरस्वती चिन्ह



**पुणे :** पुस्तकांद्वारे साकारण्यात आलेल्या श्री सरस्वती चिन्हाचे ड्रोनद्वारे घेतलेले छायाचित्र.

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे**, दि. १३ - पुणे पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला गिनीज विश्वविक्रम नोंदवण्यात आला आहे. यासाठी तब्बल दहा हजार पुस्तकांचा वापर करून श्री सरस्वती चिन्ह साकारण्यात आले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांनी विश्वविक्रम नोंदवला गेल्याची घोषणा केली.

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चित्रा वाघ, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष डॉ. मिलिंद मराठे, लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकूर, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, कृष्णकुमार गोयल, संयोजन समितीचे सदस्य प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, डॉ. आनंद काटिकर, ॲड. मंदार जोशी, डॉ. संजय चाकणे, गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकारी प्रवीण पटेल, मिलिंद वेर्लेकर या वेळी उपस्थित होते. विश्वविक्रमी कलाकृतीसाठी नीलकंठ प्रकाशन, राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्या पुस्तकांचा वापर करण्यात आला.

विश्वविक्रमासाठीची कलाकृती किमान एक हजार चौरस मीटरची असणे, सुस्थितीत असलेल्या पुस्तकांचा वापर, जागा रिकामी न राहणे, पाच वेगवेगळे रंग असणे अशा विविध निकषांवर या कलाकृती मूल्यमापन करण्यात आले. त्यानुसार साकारलेली कलाकृती विश्वविक्रमासाठी पात्र ठरून विश्वविक्रम नोंदवला गेला आहे, अशी घोषणा प्रवीण पटेल यांनी केली. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, सरस्वतीचे चित्र साकारून विश्वविक्रम नोंदवला जाणे महत्त्वाची बाब आहे. यंदाच्या निवडणुकीच्या काळात मी २५ कविता लिहिल्या. मुलांच्या मोबाइल वापराबाबत गांभार्याने विचार करण्याची गरज आहे.

चित्रा वाघ म्हणाल्या, पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने सरस्वतीचे पूजन करण्याचा मान मिळाल्याचा आनंद आहे. हा महोत्सव केवळ पुण्यात न करता त्याची चळवळ होण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये हा महोत्सव झाला पाहिजे.

> पुणेकरांचे पुस्तकांवर किती प्रेम आहे हे पुणे पुस्तक महोत्सवाला मिळत असलेल्या प्रतिसादावरून दिसून येते. यंदाच्या महोत्सवाचा प्रारंभ सरस्वती यंत्राचा विश्वविक्रम नोंदवून होत आहे याचा आनंद आहे.
> – राजेश पांडे,
> संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# पुस्तकांचा वापर करून सरस्वती यंत्राचे सुंदर चित्र साकारण्याचा विश्वविक्रम

- गिनीज बुक ॲफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये नोंद



पुणे पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला पुस्तकांद्वारे साकारलेले सरस्वती यंत्राचे चित्र.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अनेक पुस्तकांचा वापर करून सरस्वती यंत्राचे सुंदर चित्र साकारण्याचा विश्वविक्रम गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये शुक्रवारी (दि. १३) नोंदविण्यात आला. पुणे पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला हा विश्वविक्रम नोंदविला असून, या विश्वविक्रमासाठी पुस्तकांचा वापर करून सरस्वती यंत्राचे चित्र साकारले. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌सच्या अधिकाऱ्यांनी विश्वविक्रम नोंदविल्याची अधिकृत घोषणा केली.

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चित्रा वाघ, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष डॉ. मिलिंद मराठे, लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लिमिटेडचे अध्यक्ष किरण ठाकूर, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, उद्योजक कृष्णकुमार गोयल, प्रसेनजित फडणवीस, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्‌सचे अधिकृत अधिकारी प्रवीण पटेल आदी उपस्थित होते.

विश्वविक्रम कलाकृतीसाठी नीलकंठ प्रकाशन, राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्या पुस्तकांचा वापर करण्यात आला.

विश्वविक्रमासाठीची कलाकृती किमान एक हजार चौरस मीटरची असणे, सुस्थितीत असलेल्या पुस्तकांचा वापर, जागा रिकामी न राहणे, पाच वेगवेगळे रंग असणे, अशा विविध निकषांवर या कलाकृतीचे मूल्यमापन करण्यात आले. त्यानुसार साकारलेली कलाकृती विश्वविक्रमासाठी पात्र ठरून विश्वविक्रम नोंदविला गेला आहे, अशी घोषणा प्रवीण पटेल यांनी केली.

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, चांगल्या गोष्टी होण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. त्यानुसार सरस्वती यंत्राचे चित्र साकारून विश्वविक्रम नोंदविला जाणे महत्त्वाची बाब आहे. आज मुलांची दिशाभूल होणारे साहित्य मोबाईलवर येणार, याची काळजी घेतली पाहिजे. केंद्र सरकार डीपफेकविरोधात कायदा करत आहे. मात्र, मुलांच्या मोबाईल वापराबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

गेल्या वर्षीच्या महोत्सवात चार विश्वविक्रम नोंदविले गेले होते. यंदाच्या महोत्सवात पाच विश्वविक्रम नोंदविले जाणार आहेत, असे बागेश्री मंठाळकर यांनी सांगितले.

Pune Edition
Dec 14, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 14 Dec 2024_005
14 Dec 2024

# पुणेकरांनो, ग्रंथालयासाठी पुस्तके दान करा

## ग्रंथालय-वाचन चळवळ सक्षम करा : लोकमान्य सोसायटीचे आवाहन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १३ -** लोकमान्य सोसायटीतर्फे मोफत चालवल्या जाणाऱ्या नव्या ग्रंथालयासाठी पुणेकरांनी आपली वाचून झालेली वा वैयक्तिक ग्रंथालयात असलेल्या अधिकच्या पुस्तकांचे दान करावे. हा आगळावेगळा मदतीचा हात पुढे करत पुणेकरांनी ग्रंथालय व वाचन चळवळ अधिक सक्षम करावी, असे आवाहन लोकमान्य सोसायटीचे संस्थापक- अध्यक्ष किरण ठाकूर यांनी केले आहे.

- **पुणे पुस्तक महोत्सवात होणार पुस्तकांचे संकलन**
- **कोथरूड परिसरात उभारणार नवे ग्रंथालय**

पुण्यात कोथरूड परिसरात उभारण्यात येणारे नवे ग्रंथालय लोकमान्य सोसायटीतर्फे चालविण्यात येणार आहे. अबालवृद्धांना हे वाचनालय मोफत उपलब्ध असणार आहे. या ग्रंथालयासाठी पुणेकरांनी आपली वाचून झालेली वा वैयक्तिक ग्रंथालयात असलेल्या अधिकच्या पुस्तकांचे दान करावे. या पुस्तकांचे संकलन फर्गसन महाविद्यालयांच्या मैदानावर होत असलेल्या पुणे पुस्तक महोत्सवात दि. १४ ते २२ डिसेंबर पर्यंत सकाळी ११ ते ८ या वेळात लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने उभारण्यात आलेल्या पुस्तके विशेष संकलन केंद्रात ही पुस्तके आणून द्यावीत, असे आवाहन लोकमान्य सोसायटीतर्फे करण्यात आले आहे.



पुणेकर वाचक- रसिक अधिक सजग आहेत. वाचन चळवळीच्या या ज्ञानयज्ञात पुणेकरांनी आग्रह व प्राधान्याने आपली ज्ञानसमिधा पुस्तकांचे दान देऊन हा उपक्रम अधिक यशस्वी करावा, असे आवाहन मी करतो.

**– किरण ठाकूर,** संस्थापक अध्यक्ष, लोकमान्य सोसायटी

याबाबत बोलताना किरण ठाकूर म्हणाले, की 'लोकमान्य सोसायटीने नेहमीच पारदर्शक व्यवसाय व व्यवहारासोबत समृद्ध अशा सामाजिक जाणीवांना आपल्या कर्तव्याचा भाग मानले आहे. त्या अनुषंगानेच बेळगाव येथे लोकमान्य लायब्ररी ही एक प्रतिथयश संस्था मागील अनेक वर्षांपासून ग्रंथालय व वाचक चळवळ सक्षम करण्यात हातभार लावते आहे. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळतो आहे. अशाच प्रकारे बेळगाव व परिसरातील नागरिकांनी केलेल्या आवाहनानंतर पत्रास हजार पुस्तके जमा झाली होती.'

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 14 Dec 2024_016
14 Dec 2024

# पुस्तकांसाठी 'सवलत कुपन'

## वाचन चळवळ बळकटीसाठी आमदार चंद्रकांत पाटील यांचा पुढाकार



**कोथरूड, दि. १३ (प्रतिनिधी)** - वाचन संस्कृती वाढावी, नागरिकांना जास्तीत जास्त पुस्तके खरेदी करता यावी यासाठी पुणे पुस्तक महोत्सवात आमदार चंद्रकांत पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. या महोत्सवात कोथरूड मतदार संघातील नागरिकांना पाटील यांच्याकडून सवलतीचे कूपन देण्यात येणार असून सोसायटीच्या वाचनालयासाठी पुस्तक खरेदी अधिकची सवलत दिली जाणार आहे, अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर दि. १४ ते २२ डिसेंबर दरम्यान पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध भारतीय भाषांमधील हजारो पुस्तके ६०० पेक्षा अधिक स्टॉल्सद्वारे नागरिकांना खरेदी करता येणार आहे. ही पुस्तके खरेदी करताना नागरिकांवर आर्थिक ताण येऊ नये, त्यांना अधिकाधिक पुस्तके खरेदी करता यावीत, यासाठी चंद्रकांत पाटील यांच्याकडून कोथरूड



मतदारसंघातील सर्व जनसंपर्क कार्यालयात या कालावधीत दुपारी ४:०० ते सायंकाळी ७:०० या वेळेत शंभर रूपये सवलतीचे कुपन देण्यात येणार आहे. तसेच, सोसायटीमधील वाचनालयात पुस्तके खरेदी केल्यास, त्या खरेदीवर एक हजार रुपये सवलत मिळू शकते. ते कूपनही जनसंपर्क कार्यालयात उपलब्ध आहे. त्यासाठी कर्वे पुतळाजवळील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शेजारील कार्यालय, औंध येथील आंबेडकर चौकातील ओमकार कॉम्प्लेक्स शॉप नंबर-१ येथील कार्यालय, बाणेर मधील बालेवाडी फाट्याजवळील श्रॉफ सुयश अपार्टमेंटमधील कार्यालय, पौड रोडवरील वनाज मेट्रो स्टेशनजवळील कार्यालयामध्ये हे कुपन दिले जाणार आहे.

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

लोकमत

# पुणेकरांनी ग्रंथालयासाठी पुस्तके दान करण्याचे आवाहन

## पुणे पुस्तक महोत्सव : ५० हजार पुस्तके झाली जमा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : लोकमान्य सोसायटीतर्फे मोफत चालवल्या जाणाऱ्या नव्या ग्रंथालयासाठी पुणेकरांनी आपली वाचून झालेली वा वैयक्तिक ग्रंथालयात असलेल्या अधिकच्या पुस्तकांचे पुणे पुस्तक महोत्सवातील लोकमान्य सोसायटीच्या विशेष केंद्रात ही पुस्तके जमा करावीत. हा आगळावेगळा मदतीचा हात पुढे करीत पुणेकरांनी ग्रंथालय व वाचन चळवळ अधिक सक्षम करावी, असे आवाहन लोकमान्य सोसायटीचे संस्थापक- अध्यक्ष श्री. किरण ठाकूर यांनी केले आहे.

पुण्यात कोथरूड परिसरात उभारण्यात येणारे नवे ग्रंथालय लोकमान्य सोसायटीतर्फे चालविण्यात येणार आहे.

> पुणेकर वाचक- रसिक अधिक सजग आहे. वाचन चळवळीच्या या ज्ञानयज्ञात पुणेकरांनी आग्रह व प्राधान्याने आपली ज्ञान समीधा पुस्तकांचे दान देऊन हा उपक्रम अधिक यशस्वी करावा.
>
> **- किरण ठाकूर, संस्थापक अध्यक्ष, लोकमान्य सोसायटी**

आबालवृद्धांना हे वाचनालय मोफत उपलब्ध असणार आहे. या ग्रंथालयासाठी पुणेकरांनी आपली वाचून झालेली वा वैयक्तिक ग्रंथालयात असलेल्या अधिकच्या पुस्तकांचे दान करावे. या पुस्तकांचे संकलन फर्ग्युसन महाविद्यालयांच्या मैदानावर होत असलेल्या पुणे पुस्तक महोत्सवात दिनांक १४ ते २२ डिसेंबरपर्यंत सकाळी ११ ते ८ या वेळात लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने उभारण्यात आलेल्या पुस्तके विशेष संकलन केंद्रात ही पुस्तके आणून द्यावीत, असे आवाहन लोकमान्य सोसायटीतर्फे करण्यात आले आहे.

लोकमान्य सोसायटीने नेहमीच पारदर्शक व्यवसाय व व्यवहारासोबत समृद्ध अशा सामाजिक जाणिवांना आपल्या कर्तव्याचा भाग मानले आहे. त्या अनुषंगानेच बेळगाव येथे लोकमान्य लायब्ररी ही एक प्रथितयश संस्था मागील अनेक वर्षांपासून ग्रंथालय व वाचक चळवळ सक्षम करण्यात हातभार लावते आहे. अशाचप्रकारे बेळगाव व परिसरातील नागरिकांनी केलेल्या आवाहनानंतर पन्नास हजार पुस्तके जमा झाली.

Hello Pune
Page No. 4 Dec 14, 2024
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City_15 Dec 2024_03
15 Dec 2024
www.dainikprabhat.com

### शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून?

प्रभात वृत्तसेवा

**२०२६-२७ पासून नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याच्या हालचाली**

पुणे, दि. १४ - 'सीबीएसई' पॅटर्नप्रमाणेच राज्य बोर्डाच्या शाळांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १५ जूनऐवजी १ एप्रिलपासून करण्याचा प्रस्ताव सुकाणू समितीने शासनाला दिला आहे. हा निर्णय नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा असणार आहे.

या धोरणाअंतर्गत विविध वयोगटासाठी शैक्षणिक पातळ्या निश्चित केल्या जाणार आहेत. त्या पातळ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरणार आहेत. या प्रस्तावाची अंमलबजावणी २०२६-२७ पासून सुरू होणार आहे. त्याआधी शाळा, शिक्षक व पालक यांना नवीन प्रणालीबद्दल माहिती देण्यासाठी शासनामार्फत आवश्यक ती पावले उचलली जातील. त्यानंतर अंतिम आदेश काढला जाणार आहे. शैक्षणिक वर्ष ३१ मार्चला संपून दि. १ एप्रिलपासून सुरू होण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांना अधिक अभ्यासाला वेळ देणार असल्याचे म्हटले जात आहे.

सीबीएसईच्या पॅटर्नप्रमाणेच राज्यातील अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे. गणित व विज्ञान या विषयांना विशेष प्राधान्य दिले जाईल. याशिवाय, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याचा पर्याय देण्यात येणार आहे. अभ्यासक्रमाच्या सुलभतेमुळे विद्यार्थ्यांची घोकंपट्टी कमी होईल आणि त्यांना रचनात्मक विचार करण्यास प्रोत्साहन मिळणार आहे, असे शिक्षण विभागातील तज्ज्ञांनी सांगितले.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### पुणे पुस्तक महोत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पुणे पुस्तक महोत्सवात पुस्तक प्रदर्शनासह सांस्कृतिक - साहित्यिक कार्यक्रमांची मेजवानीही पुणेकरांना अनुभवायला मिळत आहे. लोककलांच्या सादरीकरणासह चित्रपट गीतांपासून रॉक बँडपर्यंतच्या कार्यक्रमांचा आस्वाद पुणेकरांना घेता येत आहे. याचाच एक भाग म्हणून शनिवारी (दि.१४) आणि रविवारी (दि.१५) रसिकांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेतला.

**लोकसंगीतापासून रॉक बँडपर्यंतचे दररोज होणार कार्यक्रम**

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर २२ डिसेंबरपर्यंत पुणे पुस्तक महोत्सव आयोजित केला आहे. महोत्सवात पुस्तकांची सहाशेपेक्षा अधिक दालने आहेत. त्यामुळे वैविध्यपूर्ण पुस्तके पाहण्याची संधी पुणेकरांना मिळत आहे. महोत्सवाला असलेली सांस्कृतिक कार्यक्रमांची जोड हा आनंद द्विगुणित करत आहे.

महोत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात शनिवारी (दि.१४) कवी ग्रेस आणि आरती प्रभू यांच्या कवितांवर आधारित चांदणे स्मरणाचे - एक काव्यानुभूती या दृकश्राव्य कार्यक्रमाने झाली. रविवारी (दि. १५) बैठक अदबी संगम, डिग व्ही आणि ग्लोबल घराना या कार्यक्रमांनाही उत्तम प्रतिसाद मिळाला. सांस्कृतिक कार्यक्रम रोज सायंकाळी सहा आणि रात्री आठ वाजता आयोजिले आहेत. सर्व कार्यक्रम विनामूल्य असणार आहेत.

#### पुस्तक प्रदर्शनाला प्रतिसाद

पुणे पुस्तक महोत्सवाच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजेच रविवारी पुणेकरांनी मोठ्या संख्येने महोत्सवाला भेट दिली. महोत्सवातील पुस्तक प्रदर्शनाची तीन दालने, आकर्षक सजावट, कलाकृती, शिल्प, चित्र अशा सर्वांचा पुणेकरांनी आनंद लुटला. महोत्सवाला भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी भेट दिली.

#### आज तिसरा विश्वविक्रम होणार

पुणे पुस्तक महोत्सवात साधारण ९० हजारांपेक्षा अधिक पुस्तकांनी संविधानाचे शिल्प सोमवारी (दि.१६ डिसेंबर) साकारण्यात येणार आहे. हा एक विश्वविक्रम असणाार आहे. या वेळी नागरिकांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीचा इतिहास आणि त्यांच्याशी निगडित दुर्मीळ वस्तू पाहण्याची संधी आहे, अशी माहिती महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

My Pune Edition
Dec 16, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City Edition 16 Dec 2024_005
16 Dec 2024

# पुणेकरांचा रविवार... पुस्तक खरेदीवार

## पुस्तक महोत्सवाला लाखाहून अधिक वाचकांनी दिली भेट

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - पुणे पुस्तक महोत्सवाच्या दुसऱ्याच दिवशी (रविवारी) लाखाहून अधिक पुणेकरांनी फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर गर्दी करत पुस्तक खरेदीचा आनंद लुटला. पुणेकरांनी सकाळपासूनच महोत्सवाला कुटुंबासह भेट दिली. महोत्सवातील पुस्तक प्रदर्शनाची तीन भव्य दालने, आकर्षक सजावट, कलाकृती, शिल्प, चित्र, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स अशा सर्वांचा पुणेकरांनी मनमुराद आनंद लुटला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) वतीने फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी या महोत्सवाला केंद्रीय सहकार आणि विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी भेट दिली.

सरकारी आणि खासगी कार्यालयांना आणि शाळा- महाविद्यालयांनाही सुटी असल्याने अनेकांनी सहकुटुंब पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली. याप्रसंगी त्यांनी विविध विषयांवरील पुस्तकांची खरेदी करण्याचा आनंद घेतला. महोत्सवात लहान मुलांसाठी विविध दालनांवर पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामुळे साहित्याच्या शोधात अगदी लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वच सहभागी झाले होते. यामध्ये काही दिव्यांग व्यक्तीही त्यांच्या शारीरिक मर्यादांवर मात करीत महोत्सवात आले होते. त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. या वेळी एक ज्येष्ठ नागरिक इलेक्ट्रिक वॉकर घेऊन फेरफटका मारत होते, तर एक महिला तिच्या तान्हुल्या बाळाला वॉकरमध्ये घेऊन आली होती. या दोघांनाही वॉकर घेऊन जाताना कोठेच अडथळा आला नाही.

दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, की डिजिटल काळात वाचन चळवळ टिकविण्याचे काम ही तरुण पिढी करत असल्याचे महोत्सवाच्या प्रतिसादावरून दिसून येते. संयोजक राजेश पांडे म्हणाले, की सर्वांनी सहकुटुंब पुणे पुस्तक महोत्सवाला भेट देऊन, वाचन संस्कृतीला पुढे नेण्यासाठी आणि पुणे शहराला नवी ओळख देण्यासाठी पुढे यावे.





यंदा पुणे पुस्तक महोत्सवास तिप्पट गर्दी वाढली आहे. नागरिक भरभरून पुस्तक खरेदी करीत आहेत. त्यामुळेच पुस्तक महोत्सवासाठी पुणे हे अत्यंत आदर्श शहर आहे. डिजिटल युगात नागरिकांचा वाचनासाठी असणारा उत्साह उल्लेखनीय आहे. महोत्सवासाठी मुंबई, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक येथून लोक येत आहेत, हे महोत्सवाचे यश आहे.

**- विनोद तावडे,**
राष्ट्रीय सरचिटणीस, भाजप

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City Edition 16 Dec 2024_005
16 Dec 2024

# संशोधनाचा फायदा प्रत्येक मानवाला व्हावा

## प्रा. डॉ. आशिष लेले; सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अविष्कार संशोधन संमेलन

प्रभात वृत्तसेवा

पुणे, १५ - आपल्या संशोधनाचा समाजाला उपयोग व्हावा, तसेच त्याचा विश्वातील प्रत्येक मानवाला फायदा झाला पाहिजे, यासाठी संशोधकाने नेहमी प्रयत्नशील राहायला हवे, असे मत राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) चे संचालक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. आशिष लेले यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अविष्कार - २०२४-२५ या १७ व्या विद्यापीठस्तरीय संशोधन संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.



याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा.डॉ. ज्योती भाकरे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक प्रा. डॉ. संजय ढोले, अविष्कार २०२४-२५ समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. देविदास वायदंडे, डॉ. के. सी. मोहिते, डॉ. प्रगती ठाकूर आदी उपस्थित होते.

सोशल सायन्स हे विज्ञान व तंत्रज्ञानसाठी खूप महत्त्वाचे ठरले आहे. यामधील विविध संशोधनामुळे समाजाच्या अनेक समस्या सुटल्या आहेत. अविष्कार स्पर्धेचे कौतुक करतांना यामध्ये ज्ञानाचे विविध प्रवाह एकत्र आलेले पाहावयास मिळत असल्याचे डॉ. आशिष लेले यांनी सांगितले. संशोधक म्हणून तुमच्यात ते संशोधन समाजासमोर मांडण्याचे कौशल्यही विकसित करता आले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

पुणे शहर, पुणे जिल्हा, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थी त्यांच्या प्रकल्पासह सहभागी झाले होते. स्पर्धेमध्ये ३०० प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यासाठी २७ विषयतज्ज्ञ यांनी आपले योगदान दिले.

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

## दुसऱ्यांदा पीएच.डी. करणाऱ्या उमेदवारांना 'कोर्स वर्क'मधून सूट

### विद्यापीठाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पीएच.डी. अभ्यासक्रम करणाऱ्या उमेदवारांना रीसर्च मेथडॉलॉजी, रीसर्च पब्लिकेशन एथिक्स कोर्स वर्क हा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. मात्र, दुसऱ्यांदा पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना कोर्सवर्क पूर्ण करण्यातून सूट देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव मुंजाजी रासवे यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. पीएच. डी. उमेदवारांना त्यांचे संशोधन कार्यक्षम पद्धतीने करता येण्यासाठी 'रीसर्च मेथडॉलॉजी हे कोर्स वर्क पूर्ण करावे लागते. तर शोधनिबंध प्रकाशनासंदर्भातील जागृती करण्यासाठीचे मार्गदर्शन 'रीसर्च पब्लिकेशन एथिक्स' या कोर्स वर्कमध्ये केले जाते. यूजीसीच्या नियमानुसार दोन्ही कोर्सवर्क पीएच.डी. उमेदवारांनी पूर्ण करणे बंधनकारक आहे.

या पार्श्वभूमीवर, एका विषयात पीएच.डी.प्राप्त विद्यार्थ्यांना दुसऱ्या विषयात पीएच.डी. करायची असल्यास त्यांना रीसर्च मेथडॉलॉजी कोर्स वर्क पूर्ण करण्यातून सूट देण्यात येत आहे. तसेच, पहिली पीएच.डी. करताना त्यांनी रीसर्च पब्लिकेशन एथिक्स हे कोर्स वर्क पूर्ण केले असल्यास त्यांना रीसर्च पब्लिकेशन एथिक्स हे कोर्सवर्क पूर्ण करण्यातूनही सूट देण्यात येत असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

Loksatta 17.12.2024

## संशोधनाचा फायदा समाजाला होणे गरजेचे

### ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. लेले यांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'आपल्या संशोधनाचा समाजाला उपयोग व्हावा; तसेच त्याचा विश्वातील प्रत्येक मानवाला फायदा झाला पाहिजे. यासाठी संशोधकाने नेहमी प्रयत्नशील राहायला हवे,' असे मत राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. आशिष लेले यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'आविष्कार २०२४-२५' या १७ व्या विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. लेले बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले, अविष्कार समितीचे अध्यक्ष डॉ. देविदास वायदंडे, डॉ. के. सी. मोहिते, डॉ. प्रगती ठाकूर आदी उपस्थित होते.

संशोधक म्हणून तुमचे संशोधन समाजासमोर मांडण्याचे कौशल्यही विकसित करता आले पाहिजे, असाही संदेश प्रा. लेले यांनी दिला. डॉ. काळकर यांच्या अध्यक्षतेत 'आविष्कार २०२४-२५'चे उद्घाटन पार पडले.

या वेळी पुणे शहर, पुणे जिल्हा, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी त्यांच्या प्रकल्पासह सहभागी झाले होते. स्पर्धेमध्ये ३०० प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. सदर प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यासाठी २७ विषयतज्ज्ञांनी योगदान दिले. डॉ. संजय ढोले आणि अविष्कार समिती सभासद डॉ. प्रगती ठाकूर यांनी संयोजन केले.



"सोशल सायन्स हे विज्ञान व तंत्रज्ञानासाठी खूप महत्त्वाचे ठरले आहे. यामधील विविध संशोधनामुळे समाजाच्या अनेक समस्या सुटल्या आहेत. आविष्कार स्पर्धेमध्ये ज्ञानाचे विविध प्रवाह एकत्र आलेले पाहावयास मिळतात.

– प्रा. आशिष लेले

Maharashtra Times 17.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# पुणे पुस्तक महोत्सवात खास दालनांना मिळतोय प्रतिसाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात मांडण्यात आलेली चार वैविध्यपूर्ण दालने लक्षवेधी ठरत आहेत. यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याविषयी माहिती देणारे दालन, वंदे मातरम् या गीतावर आधारित दालन, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे दालन आणि ब्लेड्स ऑफ ग्लोरी या क्रिकेटवर आधारित दालनाचा महोत्सवात समावेश असून, महोत्सवाला भेट देणारे पुणेकर या दालनांनाही भेट देत आहेत. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर महोत्सव सुरू आहे. या महोत्सवात चार खास दालनांची मांडणी करण्यात आली आहे.**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याच्या निमित्ताने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे अभिजात भाषा दर्जा दालन करण्यात आले आहे. तर इतिहास विभागातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले कार्य, त्यांची प्रशासकीय कार्यशैली, होळकर घराण्याचा इतिहास, त्यांच्यावर लिहिले गेलेले ग्रंथ अशी माहिती देणारे दालनही पाहायला मिळेल. भारत इतिहास संकलन समितीकडून वंदे मातरम् या गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त माहितीपूर्ण दालनही आहे. क्रिकेटवर आधारित ब्लेड्स ऑफ ग्लोरी हे दालनही आहे.



**पुणे पुस्तक महोत्सवात भरविण्यात आलेल्या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रदर्शनातील छायाचित्रे पाहताना बावनकुळे आणि इतर मान्यवर.**

### महोत्सवात वृत्तपत्र छायाचित्रकारांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यातील वर्षभरातील घडामोडींचे विविध वृत्तपत्रांतील छायाचित्रकारांनी काढलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन पुणे पुस्तक महोत्सवात आयोजित केले आहे. या छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव, महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, सदस्य प्रसेनजित फडणवीस, डॉ. संजय चाकणे, बागेश्री मंठाळकर आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन महोत्सवात येणाऱ्या पुणेकरांना सकाळी १० ते रात्री १० या वेळेत पाहता येणार आहे.

### पुस्तकांमुळे माणसाची उंची वाढते

महोत्सवात तरुणाईचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. त्यामुळे हे पाहून तरुण पिढी वाचन करत नाही, हा गैरसमज दूर होईल. पुस्तक वाचनातून समाज मजबूत होतो. पुस्तकांमुळे माणसाची उंची वाढते. राजकारण्यांनीही वाचनासाठी वेळ काढला पाहिजे. राजकारण्यांनी पुस्तके वाचल्यास ज्ञान वाढून समाजातील शेवटच्या अंधाऱ्या घरात उजेड नेता येईल, असे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. सोमवारी महोत्सवाला बावनकुळे यांनी भेट दिली. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, राघवेंद्र मानकर या वेळी उपस्थित होते. बावनकुळे यांनी पुणे पुस्तक महोत्सव देशासाठी, महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे, हा महोत्सव देशाला पुढे नेणारा, महाराष्ट्र विकसित करणारा आहे. महाराष्ट्राची उंची वाढत आहे, असे सांगितले.

My Pune Edition
Dec 17, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यापीठाशी संलग्न कस्तुरी संस्थेच्या महाविद्यालयाचे होणार ऑडिट

## चौकशी समितीची स्थापना, शैक्षणिक सोयी-सुविधांची माहिती समोर येणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न कस्तुरी शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना मराठी विषय घेण्यापासून रोखले होते. त्यामुळे विद्यापीठाने चौकशी समिती स्थापना केली. तसेच, विद्यापीठाच्या अधिसभेतही प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावर आता या महाविद्यालयाचे ॲकॅडेमिक ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परिणामी, या महाविद्यालयामध्ये असणाऱ्या शैक्षणिक सोयी-सुविधांची माहिती समोर येणार आहे.**

विद्यार्थ्यांना मराठी विषय घेण्यापासून रोखण्याचा आरोप कस्तुरी शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयाविरोधात झाला होता. काही विद्यार्थ्यांनी लेखी तक्रार विद्यापीठाकडे केली होती. तसेच, एका विद्यार्थ्यांचा व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाला होता. विद्यापीठाने स्थापना केलेल्या समितीचा चौकशी अहवालही विद्यापीठाला सादर करण्यात आला होता. या अहवालावर विद्यापीठच्या बोर्ड ऑफ डीनच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. संबंधित अहवाल स्वीकारण्यात आला. त्याचप्रमाणे या महाविद्यालयाचे ॲकॅडेमिक ऑडिट करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, विद्यार्थी संघटनांचा आक्रमक पवित्रा पाहून संबंधित महाविद्यालयाने मराठी विषय बंद करणार



नसल्याचे स्टॅम्प पेपरवर लिहून दिले आहे. परंतु, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर एखाद्या महाविद्यालयात एकही विद्यार्थी मराठी विषयाचे शिक्षण घेत नसेल, तर ही खेदाची बाब आहे. तसेच, संस्था व महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्यातील वादामुळे विद्यार्थ्यांना मराठी विषय घेण्यापासून रोखले जात असेल तर विद्यार्थ्यांच्या होण्याऱ्या नुकसानीला जबाबदार कोण? असा प्रश्न शिक्षण क्षेत्रातून उपस्थित केला जात आहे.

My Pune Edition
Dec 17, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During December 2024

## Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### परदेशी विद्यार्थी, प्राध्यापकांना 'जी २० टॅलेंट व्हिसा'

**केंद्रीय गृहमंत्रालयाकडून व्हिसाची नवी श्रेणी लागू**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

परदेशातून शिक्षण, संशोधनासाठी भारतात येऊ इच्छिणारे विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधकांसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने 'जी २० टॅलेंट व्हिसा' ही नवीन श्रेणी लागू केली आहे. याअंतर्गत जी २० सदस्य देशांतून शिक्षण, संशोधन, पाठ्यवृत्ती, प्रशिक्षण, प्रकल्पांसाठी भारतात येणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधकांना व्हिसा दिला जाणार आहे. यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे संबंधित माहिती दिली आहे.

परदेशातून उच्च शिक्षण, संशोधन, पाठ्यवृत्ती, प्रशिक्षण, प्रकल्पांसाठी येणारे परदेशी विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधकांना भारताचा व्हिसा काढावा लागतो. काही वेळा या प्रक्रियेस विलंब लागतो. या पार्श्वभूमीवर व्हिसाची नवी श्रेणी केंद्रीय गृहमंत्रालयाने सादर केली आहे. त्यामुळे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकांची व्हिसा प्रक्रिया सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

यूजीसीच्या परिपत्रकानुसार, जी २० टॅलेंट व्हिसा ही श्रेणी एस ५ या उपश्रेणीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. त्यासाठी आयआयटी, एनआयटी, आयसर, आयआयएम, आयआयएस्सी, आयआयआयटी अशा महत्त्वाच्या राष्ट्रीय संस्थांचा दर्जा असलेल्या संस्थांची, अन्य मंत्रालयांकडून अनुदान दिल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थांची यूजीसी, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे (एआयसीटीई) असलेली यादी केंद्रीय गृहमंत्रालयाला दिली जाणार असल्याचे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 18, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

City _18 Dec 2024_005
18 Dec 2024
प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

### पुस्तक महोत्सवात ५ लाख पुस्तकांची विक्री

**१२ भाषांमधील पुस्तके उपलब्ध; तीन लाखांपेक्षा जास्त वाचकांची भेट**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १७** - पुणे पुस्तक महोत्सवाला पहिल्या चार दिवसांत तीन लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी भेट दिली आहे. यामध्ये नागरिकांनी तब्बल पाच लाख पुस्तके खरेदी केली. त्यामुळे यंदाचा पुणे पुस्तक महोत्सव नागरिकांच्या चांगला पसंतीस उतरला आहे, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव सुरू आहे. सर्व पुस्तकांच्या खरेदीवर १० टक्के सवलत असून, यंदा २२ भारतीय भाषांमधील सुमारे १२ लाख पुस्तके खरेदीसाठी उपलब्ध आहेत. नागरिकांना एतिहासिक विषयांपासून ते विज्ञान, तंत्रज्ञानावर आधारित पुस्तके मिळत आहे. लहान मुलांसाठी मोठ्या प्रमाणावर पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामुळे पालक आवर्जून पुस्तकांची खरेदी करीत आहेत. पुणे आणि पिंपरी- चिंचवड परिसरातील शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे. त्याचप्रमाणे पुणे बाल चित्रपट महोत्सवात दररोज दर्जेदार चित्रपट दाखविण्यात येत आहे. त्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवात लघुपट, निमेशन चित्रपटांनाही चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

**'बट व्हॉट डज सायन्स से' पुस्तकाचे प्रकाशन**

वाढदिवसाला भरभरून साखर असलेल्या केकसह गोडाधोडाचे खाद्यपदार्थ लोक आवडीने खातात; परंतु प्रथिने खाणे चांगले की वाईट, ते विचारतात. वास्तविक सर्व वयोगटांतील व्यक्तींनी प्रथिनांचे सेवन केले पाहिजे, असे सांगत प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ आणि क्रीडा वैद्यक तज्ज्ञ डॉ. मनन व्होरा यांनी वाचकांना निरोगी जीवनशैलीविषयी मार्गदर्शन केले. पुणे पुस्तक महोत्सवात लिटररी कॉर्नर येथे डॉ. मनन व्होरा लिखित बट व्हॉट डज सायन्स से या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्या वेळी डॉ. व्होरा यांनी वाचकांशी संवाद साधला.

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

# पुणे पुस्तक महोत्सवात ८० हून अधिक पुस्तकांचे प्रकाशन

## लेखक-वाचक संवाद वाचन संस्कृती संवर्धित करण्यास उपयुक्त



पुणे पुस्तक महोत्सवात वाचक दररोज मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आहेत.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सव वाचकांप्रमाणेच लेखक, प्रकाशकांसाठी पर्वणी ठरला आहे. यंदाच्या महोत्सवात ८०पेक्षा जास्त पुस्तकांचे प्रकाशन होत आहे. ललित साहित्यासह चरित्र, माहितीपर, अध्यात्म, अनुवाद अशा विविध प्रकारच्या पुस्तकांचा यात समावेश आहे.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्यातील पुस्तक प्रदर्शनात विविध भाषांतील बालसाहित्यापासून वैविध्यपूर्ण विषयांवरील पुस्तकांची सहाशेपेक्षा जास्त दालने आहेत. तसेच लहान मुलांसाठी कार्यशाळा, स्पर्धा, बालचित्रपट महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याशिवाय नव्या पुस्तकांच्या प्रकाशनासाठी प्रकाशकांनी महोत्सवाचे औचित्य साधले आहे. त्याशिवाय लेखक संवाद, गप्पांचे कार्यक्रमही आयोजित केले आहेत.

> पुणे पुस्तक महोत्सव हा प्रकाशक, लेखकांसाठी महत्त्वाचा मंच ठरत आहे. महोत्सवातील पुस्तक प्रदर्शनातील विक्रीसह ८०पेक्षा जास्त नव्या पुस्तकांचे प्रकाशन होत आहे, ही महत्त्वाची बाब आहे. प्रकाशकांकडून लेखक संवादासारखे उपक्रमही होत आहेत. यातून वाचक, लेखक, प्रकाशक जोडले जाण्यास मदत होत आहे. येत्या काळात नवी पुस्तके महोत्सवात प्रकाशित होण्याची संख्या निश्चितपणे वाढेल. – राजेश पांडे, संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

### ग्रंथपालांचे संमेलन

पुणे शहरातील विद्यापीठ, महाविद्यालयीन, शालेय आणि सार्वजनिक ग्रंथालयांच्या ग्रंथपालांचे संमेलन पुणे पुस्तक महोत्सवात झाले. राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक कर्नल युवराज मलिक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. राजेंद्र कुंभार, जयकर ग्रंथालयाचे संचालक डॉ. संजय देसले, शालेय ग्रंथपाल संघटनेचे अध्यक्ष प्रदीप बागल, डॉ. चारुदत्त गंधे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रेया गोखले यांच्यासह शहरातील सर्व ग्रंथालयांचे मिळून १७७ ग्रंथपाल उपस्थित होते. राष्ट्रीय पुस्तक न्यासाने वाचनासंबंधीचा अभ्यासक्रम सुरू करावा, असे आवाहन डॉ. कुंभार यांनी केले. ग्रंथपालांनी वाचनासंबंधी अधिकाधिक प्रयत्न करावेत, त्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यास त्यांना कायम सहकार्य करेल, अशी ग्वाही मराठे यांनी दिली.

### पाच लाखांहून अधिक पुस्तकांची विक्री

महोत्सवाला पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. महोत्सवाच्या पहिल्या चार दिवसांत सुमारे तीन लाखांपेक्षा जास्त लोकांनी महोत्सवाला भेट दिली आहे, तर पुस्तकांच्या ५ लाखांपेक्षा जास्त प्रती विकल्या गेल्या आहेत. त्यामुळे गेल्या वर्षीपेक्षा यंदाच्या महोत्सवात पुस्तक विक्रीचा आकडा अधिक मोठा असेल, असे पांडे यांनी सांगितले.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे अध्यक्ष, दिलीपराज प्रकाशनाचे संचालक राजीव बर्वे म्हणाले, 'सर्वसाधारणपणे दर वर्षी मराठीत साडेतीन ते चार हजार पुस्तकांचे प्रकाशन होते. 'जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल'सारख्या महोत्सवांत प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची संख्या जास्त असते. मात्र, पुणे पुस्तक महोत्सवाचे यंदा दुसरेच वर्ष आहे. येत्या काळात पुणे पुस्तक महोत्सवातील पुस्तक प्रकाशनांची संख्या वाढत जाईल. महोत्सवातच पुस्तक प्रकाशित केल्याने वाचकांना लगेचच पुस्तकाची प्रत मिळते, लेखकाची स्वाक्षरी मिळते, लेखकाशी संवाद साधता येतो. पुस्तकाची विक्री झटपट सुरू होते. त्यामुळे महोत्सवात पुस्तक प्रकाशित करणे उपयुक्त ठरते.'

'पुणे पुस्तक महोत्सवात वाचकांना नवीन काही देण्यासाठी खास नियोजन करून दहा पुस्तकांचे काम पूर्ण करून दहा पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येत आहे. वाचकांशी जोडले जाण्यासाठी हा महोत्सव चांगला मंच आहे. प्रकाशित होत असलेल्या पुस्तकांमध्ये पर्यावरण, कादंबरी, चरित्र, अनुभवकथन, कथासंग्रह, आर्थिक, बालसाहित्य अशा वैविध्यपूर्ण पुस्तकांचा समावेश आहे. मोठ्या प्रदर्शनात पुस्तके नीट पाहता येतात, वाचकांशी संवाद साधता येतो. त्यामुळे महोत्सवात पुस्तके प्रकाशित करणे उपयुक्त ठरते,' असे रोहन प्रकाशनचे रोहन चंपानेकर यांनी सांगितले.

Loksatta 18.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# SSC, HSC students working for literacy may get 5 marks

## Proposal To Award Bonus Points Sent To Govt For Approval

**SwatiShindeGole**
@timesofindia.com

**Pune:** The state govt will consider a proposal to award bonus marks to SSC and HSC students for participating in the Ullas Navbharat Literacy programme.

The board already grants such marks to students excelling in arts, fine arts, and sports competitions and for participation in NCC, Scouts, and Guides.

State board chairman Sharad Gosavi said, "Such a proposal was rejected once. But it has come up again. It will be discussed, and then govt will make a decision. But, it won't be implemented this year."

The directorate of education implements 39 schemes and initiatives, including the Navbharat Literacy programme. The response from teachers in the literacy initiative is minimal.

There is a possibility that SSC and HSC students could receive bonus marks for volunteering in the literacy mission. If a student volunteers to bring at least five people who cannot read and write, they will receive five marks.

An official from the education directorate, on the condition of anonymity, said, "A proposal was recently sent to the Maharashtra State Secondary and Higher Secondary Education Board, which will now go to the state govt for a policy decision. Std X and Std XII students may receive incentive points for helping to make illiterates literate, in addition to points for arts and sports."

Experts are skeptical about the implementation of this scheme, the criteria for awarding marks, and other factors. Educator Shrinivas Khare said, "Govt has been running this scheme of extra or bonus marks for the students appearing for board exams through sports, art, and culture. There have been several discrepancies in awarding these marks, so it will be interesting to see how the students are analysed for this particular scheme. Effective and accurate implementation will reduce confusion among the students and parents."

### EXACT NUMBER UNCLEAR

File photo



➤ **According to Census 2011, there are over 1.6 crore illiterates in the state and Navbharat Literacy Programme aims to make everyone literate by 2030**

➤ The campaign has five stages, the first being basic literacy, which involves writing, reading, and numeracy followed by life skills development, focusing on economic and legal literacy

➤ **Basic education, vocational skill acquisition, and continuous education will be provided**

➤ Teachers conduct surveys in villages to determine the number of those without schooling and volunteers work to educate them. Students from Std VIII to Std XII undertake this task

> The education department believes that if incentive points are given for this work, there will be 100% participation, and parents will also get involved. A volunteer can earn a maximum of five points, provided they volunteer for at least five illiterates
> **– A state education department official**

The Times of India 18.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

City | Pune Times Mirror Wednesday, December 18, 2024 | 9

# NCERT announces price cut on class IX to XII textbooks

**Starting 2026-27 academic year, these books will now cost 20% less; for grades I-VII, price will remain at ₹65 per copy**



| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

The National Council of Educational Research and Training (NCERT) has announced a 20% reduction in the prices of textbooks for classes IX to XII.

This decision was announced by NCERT Director Dinesh Prasad Saklani at an event. The price cut will be effective in the upcoming 2026-27 academic year, bringing relief to students and parents alike.

### No change in textbooks of classes I-VII

While the new pricing applies to books for classes IX-XII, textbooks for grades I-VII will remain at Rs 65 per copy. The discounted books for classes IX-XII will be available in the 2026-27 academic year.

### Efficiency in printing and procurement

During the announcement, Dinesh Saklani emphasized the role of increased efficiency in paper procurement and the introduction of new printing technologies.

"This year, NCERT has streamlined its paper procurement process and onboarded printers with the latest machines, allowing us to pass on the savings to students," Saklani told the media.

### Tie-up with online shopping apps

To make textbooks more accessible, NCERT has signed Memorandums of Understanding (MoUs) with Flipkart and Amazon. These platforms will now sell the books, making them available even in rural areas at reduced prices.

Each year, NCERT prints approximately 4-5 crore textbooks across around 300 titles. However, for the next academic year, the council plans to increase this to 15 crore books, ensuring students across the country benefit from affordable educational resources.

This is the first time that the price of textbooks has been reduced significantly, added the director.

Pune Mirror 18.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 19 Dec 2024_013
19 Dec 2024
www.dainikprabhat.com

# पुणे पुस्तक महोत्सवात ग्रंथपालांचे संमेलन उत्साहात

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १८** - पुणे पुस्तक महोत्सवात विद्यापीठ, महाविद्यालयीन शालेय आणि सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांचे संमेलन उत्साहात पार पडले. यावेळी राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, डॉ. राजेंद्र कुंभार, जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रेया गोखले उपस्थित होते. राष्ट्रीय पुस्तक न्यासाने वाचनासंबंधीचा अभ्यासक्रम सुरू करावा, असे आवाहन डॉ. कुंभार यांनी केले. मराठे यांनीही ग्रंथपालांनी वाचनासंबंधी अधिकाधिक प्रयत्न करावेत आणि त्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यास त्यांना सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली. न्यासाचे संचालक कर्नल युवराज मलिक (निवृत्त) यांनीही ग्रंथपालांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक डॉ. संजय देसले यांनी केले. आभार शालेय ग्रंथपाल संघटनेचे अध्यक्ष प्रदीप बागल यांनी मानले.

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 19 Dec 2024_005
19 Dec 2024
www.dainikprabhat.com

# पुणे पुस्तक महोत्सव सामाजिक महोत्सव व्हावा

### केंद्रीय शिक्षणमंत्री प्रधान यांची अपेक्षा

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. १८** - 'पुणे पुस्तक महोत्सव येत्या काळात हा एक सामाजिक महोत्सव व्हावा,' अशी अपेक्षा केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी व्यक्त केली.

पुणे पुस्तक महोत्सवाला प्रधान यांनी मंगळवारी भेट दिली. 'एनबीटी'चे संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, प्रसेनजित फडणवीस, डॉ. आनंद काटीकर, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक परिषदेचे अध्यक्ष प्रमोद रावत या वेळी उपस्थित होते. प्रधान म्हणाले, 'संस्कृती चिरंतन राहण्यात भाषा, संस्कृतीचे महत्त्वाचे असते. त्यासाठी पुस्तकांचे महत्त्व मोठे आहे. आई-वडिलांनंतर पुस्तक हा व्यक्तीचा सोबती असतो. पुणे पुस्तक महोत्सवाला इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो ही फारच मोलाची बाब आहे.'

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

# जॉब मार्केट के आधार पर तैयार होंगे स्किल बेस्ड कोर्सेज़, UGC ने जारी की गाइडलाइंस

Bhupender.Sharma
@timesofindia.com

AI Image



■ नई दिल्ली: यूजीसी ने उच्च शिक्षण संस्थानों (HEI) में स्किल वेस्ड कोर्सेज की शुरुआत के लिए गाइडलाइंस और SOP जारी कर दी है। कोर्स तैयार करने से लेकर इंटर्नशिप व जॉब प्लेसमेंट तक के प्रोसेस में इंडस्ट्री के साथ भागीदारी को ग्रीन सिग्नल दिया गया है। यूजीसी ने वीए, वीएससी व मैनेजमेंट स्ट्रीम के लिए स्किल कोर्सेज का वड़ा पूल तैयार किया है। अलग-अलग स्ट्रीम में करीव 200 कोर्सेज का पूल है। सव कैटिगरी में भी कोर्सेज को जोड़ दें तो यह संख्या चार सौ तक पहुंच जाती है। यूजीसी की ये गाइडलाइंस जल्द ही फीडवैक के लिए पव्लिक की जाएंगी। वैक्सीन डिवेलपमेंट, स्पेस साइंस एंड टेक्नोलॉजी, विजनेस के लिए साइवर सिक्योरिटी समेत डिजिटल दौर की जरूरतों को ध्यान में रखते हुए कोर्सेज लाए गए है। इनमें आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) को महत्व दिया गया है।

**UGC ने जारी की SOP और गाइडलाइंस**

यूजीसी के चेयरमैन प्रो. एम. जगदीश कुमार का कहना है कि यूनिवर्सिटी-कॉलेजों में कौशल-आधारित पाठ्यक्रम और माइक्रो-क्रेडेशियल की शुरुआत के लिए दिशानिर्देश को हाल ही में मंजूरी दी गई है। ये गाइडलाइंस राष्ट्रीय शिक्षा नीति (NEP) 2020 के उद्देश्यों को पूरा करने की दिशा में वड़ा कदम है। जॉव मार्केट की वदलती मांगों को पूरा करने के मकसद को ध्यान में रखा गया है। यूजीसी ने स्किल वेस्ड कोर्सेज के लिए जो सिस्टम तैयार किया है, उसमें छात्र अव यूनिवर्सिटी की पढ़ाई के वाद सिर्फ आसानी से रोजगार ही नहीं पा सकेंगे वल्कि अपना खुद का विजनेस भी शुरू कर सकेंगे। मौजूदा समय में पढ़ाए जा रहे कोर्सेज में स्किल वेस्ड कोर्सेज को यूनिफाइड किया गया है।

**आर्ट्स के विषय में भी AI की एंट्री:** वीए हिस्ट्री में एआई इन हिस्टोरिकल रिसर्च और कल्चरल रिसोर्स मैनेजमेंट जैसे 12 कोर्स प्रस्तावित हैं। वीए पॉलिटिकल साइंस में भी एआई आधारित कोर्स हैं। वीए सोशियोलोजी में डिजिटल सोशियोलोजी और एआई एंड सोशल रिसर्च जैसे कोर्स हैं।

Navbharat Times 19.12.2024

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# SPPU exempts students pursuing their second PhD from coursework

**SOHAM SHAH**
PUNE, DECEMBER 18

THE SAVITRIBAI Phule Pune University has announced that students with a PhD in any subject will be exempted from Research Methodology coursework while pursuing a second PhD. Students are also exempted from the Research Publication Ethics coursework if they have completed it during their first PhD.

This rule will apply to all affiliated colleges and departments, as noted in a circular dated December 14 and signed by deputy registrar of SPPU Dr Munjaji Rasve.

Pro Vice-Chancellor of SPPU Dr Parag Kalkar told The Indian Express, "We have taken this step so that students don't have to repeat coursework that they have already done. The coursework we have exempted is also covered in the MPhil course. If the PhD is in a different subject, then the students will only have to do the coursework for that subject and not repeat the common courses."

In October, SPPU had invited online applications for PhD admissions from students who had qualified the National Eligibility Test (NET) held between August 21 and September 5 and appeared for the university's PhD Entrance Test (PET) on August 31. SPPU PhD eligibility also requires a minimum of five years of Bachelors+ Masters education and 55% marks in aggregate or its equivalent grade in a point scale wherever grading system is followed.

The minimum duration of a PhD at SPPU is three years, including coursework, and a maximum duration of six years from the date of admission to the programme.

The Indian Express 19.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# ४९ हजारांवर शिक्षक, शिक्षकेतरांना वेतनवाढ!

## २० टक्के अनुदान टप्पा वाढ जाहीर; हिवाळी अधिवेशनात मात्र आर्थिक तरतूद नाही

कोल्हापूर : प्रवीण मस्के

राज्य सरकारकडून टप्पा अनुदान घेत असलेल्या खासगी, अंशत: अनुदानित शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा निधीसह मंजूर झाला आहे. त्याची जून २०२४ महिन्यापासून अंमलबजावणी करण्याचा शासन निर्णय झाला. याचा राज्यातील ४९ हजार ५६२ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. मात्र, हिवाळी अधिवेशनात आर्थिक तरतूद न काढल्याने विनाअनुदानित शिक्षकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

राज्य सरकारने २००१ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर शाळांना मान्यता दिली आहे. त्यानंतर २००९ ला 'कायम' शब्द वगळण्यात आला. विनाअनुदानित शिक्षकांनी आंदोलने, मोर्चे काढले. त्यानंतर २०१६ रोजी अनेक शाळांना अनुदानाचा पहिला टप्पा मिळाला. त्यानंतरही शिक्षकांना वाढीव अनुदानासाठी संघर्ष करावा लागला. १ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर २०२४ मध्ये शिक्षकांनी राज्यव्यापी ७५ दिवसांचे बेमुदत आंदोलन केले.

पुढारी विशेष

अडीच वर्षांच्या महायुती सरकारच्या काळात निवडणुकीच्या काही दिवस अगोदर १४ ऑक्टोबरला शिक्षकांच्या वेतनवाढीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. मात्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने निर्णयास स्थगिती देण्यात आली. महायुतीचे सरकार सत्तेवर येताच राज्यातील विनाअनुदानित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २० टक्के अनुदान टप्पा वाढ देण्यासंदर्भात निर्णय झाला आहे. यानुसार खासगी, अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, तुकड्या, वर्ग, अतिरिक्त शाखा व त्यावरील ४९ हजार शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अनुदानाच्या विविध टप्प्यावर (२० टक्के, ४० टक्के व ६० टक्के) वेतन अनुदान घेत आहेत. त्यांना पुढील अनुदानाचा टप्पा मंजूर करण्यात आला आहे.



**अनुदान पात्र शाळा, तुकड्या, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संख्या**

| शाळा स्तर | शाळा | तुकड्या/वर्ग | शिक्षक/ शिक्षकेतर |
|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा | ८२० | ३५१३ | ८६०२ |
| माध्यमिक शाळा | १९८४ | २३८० | २४०२८ |
| उच्च माध्य./कनिष्ठ महाविद्यालये | ३०४० | ३०४३ | १६०३२ |

"शासनाने जून २०२४ पासून टप्पा वाढीचा निर्णय घेतला. परंतु, हिवाळी अधिवेशनात आर्थिक तरतूद करणे अपेक्षित होते. यासाठी शिक्षकांनी ७५ दिवस कोल्हापूरसह राज्यभरात आंदोलन केले. १४ ऑक्टोबरला याबाबतचा शासन निर्णय झाला. यानुसार अधिवेशनात याबाबत चर्चादेखील झाली नाही. शासनाने शिक्षकांची फसवणूक केली असे वाटते. राज्यातील शिक्षक आमदार याबाबत उदासीन आहेत. पुन्हा अनुदानासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करायचे का?

- **खंडेराव जगदाळे**, राज्य उपाध्यक्ष, राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समिती

Pune Edition
Dec 23, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# यूजीसी नेट परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

## नेट परीक्षा आता ३ ते १६ जानेवारीदरम्यान होणार

पुणे : पुढारी वृत्तसेवा

यूजीसी नेट डिसेंबर सत्राच्या परीक्षेच्या वेळापत्रकात बदल केला आहे. यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार नेट डिसेंबर २०२४ ची परीक्षा १ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत होणार होती. परंतु, आता प्रसिद्ध केलेल्या विषयनिहाय वेळापत्रकानुसार परीक्षा ३ जानेवारी २०२५ पासून सुरू होईल आणि १६ जानेवारीला संपणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

नव्याने जाहीर केलेल्या विषयनिहाय वेळापत्रकानुसार ८५ विषयांसाठी ही परीक्षा ३ जानेवारी २०२५ पासून सुरू होणार आहे. शेवटची परीक्षा १६ जानेवारी २०२४ रोजी घेतली जाईल. परीक्षा दोन सत्रामध्ये घेण्यात येणार आहे. पहिले सत्र सकाळी ९ ते दुपारी १२ पर्यंत असेल. तर दुसरे सत्र दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत चालणार आहे. परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांना https:/// ugcnet. nta. ac. in या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन वेळापत्रक पाहता येणार आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने परीक्षेसाठी परीक्षा सिटी स्लिप जारी करण्याच्या तारखेबद्दल देखील माहिती दिली आहे. एनटीएने स्पष्ट केले आहे की, परीक्षेसाठी परीक्षेचे शहर तपशील परीक्षेच्या फक्त आठ दिवस आधी जाहीर केले जातील. या आधारावर ३ जानेवारी २०२५ पासून परीक्षा सुरू होणार असेल तर २७ डिसेंबर २०२४ पर्यंत सिटी स्लिप जाहीर केली जाईल.

**असे आहे नेट परीक्षेचे वेळापत्रक**

- ३ जानेवारीला पहिल्या सत्रामध्ये सार्वजनिक प्रशासन आणि दुसऱ्या सत्रामध्ये अर्थशास्त्र.
- ६ जानेवारीला कॉम्प्युटर सायन्स, बंगाली, चायनीज, राजस्थानी आणि इतर विषयांच्या परीक्षा घेतल्या जातील. त्याचबरोबर राज्यशास्त्रासह इतर विषयांच्या परीक्षा दुसऱ्या सत्रामध्ये होणार आहेत.
- ७ जानेवारीला दुसऱ्या सत्रामध्ये वाणिज्य, हिंदी, कन्नड आणि इंग्रजी, सामाजिक कार्य यासह इतर विषयांच्या परीक्षा होतील.
- गृहविज्ञान आणि संगीत विषयांची परीक्षा ८ जानेवारीला घेण्यात येणार आहे.

Pune Edition
Dec 23, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात
City 23 Dec 2024_013
23 Dec 2024
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# शैक्षणिक बदलांची माहिती आता शाळेतच

## 'स्कूल कनेक्ट' अभियानाची व्याप्ती वाढवली

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शैक्षणिक बदलांची माहिती विद्यार्थ्यांना शाळेतच उपलब्ध होणार आहे. या साठी सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावरुन 'स्कूल कनेक्ट' अभियानाची व्याप्ती वाढवली जाणार आहे. यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. यंदा दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध उपक्रमांच्या माध्यमातून ही माहिती दिली जाणार आहे.

यंदा या उपक्रमात इयत्ता नववी, दहावी आणि अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांत ही माहिती दिली जाणार आहे. यात प्रामुख्याने व्याख्याने, प्रशिक्षण शिबिरे यांसह ऑनलाइन माध्यमातूनही माहिती पुरवली जाणार आहे. यासाठी विद्यापीठांतील तज्ज्ञ मंडळी शाळांना भेटी देतील आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. गेल्या वर्षी हा उपक्रम फक्त इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवला गेला होता. यंदा त्यांची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. या उपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी होणार आहे. हा उपक्रम विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

### अभियानाची उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांना बारावीनंतर त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे
- दहावीनंतर विद्यार्थ्यांना रोजगारक्षम अभ्यासक्रम निवडायचा असेल त्यांना त्यासाठी उपलब्ध संधी आणि पुढे पदवी अभ्यासक्रमात उपलब्ध संधीची माहिती करुन देणे
- प्रत्येक विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे वाटचाल करेल, यासाठी मार्गदर्शन करणे.
- नावीन्यपूर्ण बदलाविषयी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणे
- विद्यापीठांनी तयार केलेल्या नव्या अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे
- नव्या पद्धतीचे मूल्यांकन, ग्रेडिंग पद्धत याची माहिती पुरविणे
- शिष्यवृत्तीविषयी सविस्तर माहिती देणे

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# Pvt colleges a step closer to forming cluster univs

Niraj Pandit
niraj.pandit@hindustantimes.com

MUMBAI: The state government has proposed major amendments to the Maharashtra Public Universities Act (MPUA), 2016, allowing private colleges across district boundaries to form cluster universities. A bill to this effect was tabled in the assembly on December 16, the first day of the winter session of the state legislature. The bill will be taken up for discussion in the next session of the assembly, following which it will be introduced in the legislative council.

Earlier, only government-aided colleges managed by a single trust or society and located within the same district were allowed to form cluster universities. An ordinance issued in October this year removed the requirement of government-aided colleges as mandatory constituents of a cluster university, though they had to be located in the same district.

The proposed amendments seek to formalise and augment the change introduced through the ordinance. The amendments also seek to align Maharashtra's cluster university framework with the National Education Policy (NEP) 2020 and University Grants Commission (UGC) guidelines, which allow private institutions to establish cluster universities.

The NEP envisions transforming fragmented higher education institutions (HEIs) into multidisciplinary clusters or self-governing degree-granting entities to encourage cross-disciplinary research and optimise resources. UGC guidelines from 2022 further support this model by allowing both government and private colleges to form clusters, even if they are still affiliated with parent universities.

Maharashtra had amended the MPUA in March 2022, simplifying the rules for establishment of cluster universities. Detailed guidelines issued in November 2023 allowed 2-5 institutes within a district and managed by a single trust or society to form a cluster. Lead colleges must have a National Assessment and Accreditation Council (NAAC) rating above 3.25 and National Board of Accreditation (NBA) accreditation for 50% of its courses, the guidelines specified.

Despite these efforts, the initiative has seen limited uptake. Out of four cluster universities in the state, only one – Warana University – was constituted under provisions of MUPA while three others – Dr Homi Bhabha State University, HSNC University and Karmaveer Bhaurao Patil University – were established under the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA), a centrally sponsored scheme under the ministry of education.

Only a few proposals for cluster universities under MUPA provisions are in advanced stages of scrutiny, while others are preliminary, said a senior officer from the state higher and technical education department. Many colleges are hesitant to detach from parent universities citing restrictive parameters, the officer said.

The amendments allowing private institutions spread over several districts to form a cluster seek to address these challenges. The government hopes the recent legislative push will accelerate the adoption of cluster universities and foster innovation and efficiency in higher education.

## Transforming higher education

- The Maharashtra Public Universities Act (MUPA) was amended in March 2022, allowing 2-5 state-aided colleges to form a cluster university
- Colleges under a cluster university had to be located within a district and managed by the same trust/ society
- An ordinance issued in October 2024 removed the requirement of state-aided colleges as mandatory constituents
- Amendments in MUPA tabled in the assembly last week seek to formalise this change, allow private colleges across districts to form a cluster
- The amendments are in line with NEP 2020, which seeks to transform higher education



institutions into self-governing degree-granting entities

- The aim behind cluster universities is to encourage cross-disciplinary research and optimise resources

Hindustan Times 23.12.2024

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSES ONLY



# IRREGULARITY SLUR ON SPPU OVER TEACHER RECRUITMENT

### Aspirants, student bodies allege illegal appointment of certain candidates as associate professors

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

Allegations are rife that volunteers of organisations with specific ideologies have been selected in the recruitment process for associate professors while ignoring merit and violating reservation rules for candidates of Scheduled Castes, Scheduled Tribes, and other nomadic and destitute categories.

A few days ago, the list of candidates appointed department-wise was published on the official website of Savitribai Phule Pune University (SPPU). At least 109 associate professors were appointed on a contractual basis. Following this, disadvantaged candidates and student organisations raised serious allegations by raising questions about the selection process.

A candidate, on the condition of anonymity, said, "As per the new reservation policy, a department-wise reservation has not been announced, but it is done at the university level. Therefore, it was seen that a Hindi candidate was competing with zoology candidates. We feel that this recruitment process is illegal, unconstitutional, and unfair."

Rahul Sasane, PhD researcher and president of the University Student Struggle Action Committee, said, "After studying the selection list, it is seen that some people of a particular ideology have been deliberately included. Candidates who are in favour of the heads of departments and senior officers are being selected repeatedly.

"There are allegations of malpractice in this recruitment process. Some of them are working in two places at the same time and are taking advantage of fellowships. Some candidates have been deliberately rejected by giving low marks in the interview.

"Are the selected candidates eligible for SET, NET, M.Phil, and Ph.D.? All these things should be investigated. In the coming time, we will investigate all the appointed candidates through RTI."

CONTINUED ON PAGE 4»

# Irregularity slur on SPPU over teacher recruitment

CONTINUED FROM PAGE 1

### Short duration/saving money

It is alleged that SPPU has been recruiting contract professors for the past few years. Although this recruitment is for 11 months, it is actually done for only 6 to 8 months. These professors are paid a meagre salary from the university fund. It has been clear that this is an attempt to save money by the university.

### Vacancies

Advertisements were published for 133 posts in about 50 departments in the university; however, only 109 posts were filled, and no explanation has been given by the university administration as to why 24 posts were kept vacant.

### Undue importance given to natural sciences

Candidates from natural sciences have been selected for almost all the posts in the open category. For this, they have been given 98 or 99 marks out of 100 in the interview. There are whispers in the university that more importance may have been given to natural sciences due to the bias of the vice-chancellor.

Due to this malpractice, professors have not been recruited in some other departments. For example, some positions remained vacant in the Department of Foreign Languages, the Center for Fine Arts, and Anthropology.

### Deterioration of quality

While a candidate scoring 75 to 80 marks in the interview is not selected, those who have got only 15 to 20 marks have been preferred by the university. Candidates of inferior quality have been selected by pretending to implement the reservation rules. For example, in the economics department, a Scheduled Caste candidate who scored 65 marks was rejected, while a Scheduled Tribe candidate who scored only 25 marks was selected. This has also happened in political science, sociology, and some other departments. There are talks in the university circles that office bearers close to the ruling parties have interfered in this process.

### Helpless department heads

Many issues are coming to light, right from some department heads rejecting experts recommended for interviews to rejecting candidates selected by the selection committee. Due to the centralisation of power in the university, department heads have become helpless. Due to this, it has been proven that the campaigners of organisations with a particular ideology have control over the recruitment process. It is also alleged that the recruitment process of part-time and full-time workers of organisations with specific ideological affiliations is rigged.

### Candidates working at two places

Candidates appointed on a contractual basis are working at two places. Also, some candidates are taking advantage of various schemes of Sarathi, Barti, and Mahajyoti. Due to this, their appointment becomes illegal. Candidates who did not belong to the Sangh were not taken into consideration in the recruitment process. Candidates are also alleging that the principle of equality of status and opportunity has been trampled on.

Mirror tried to contact SPPU Vice-Chancellor Dr. Suresh Gosavi, Pro Vice-Chancellor Dr. Parag Kalkar, and In-charge Registrar Jyoti Bhakere for their comment. However, they could not be reached.

Mirror Classified

Pune Mirror
TO PLACE AN ADVERTISEMENT IN THIS SECTION
Please call 9820870567

Pune Times Mirror

Pune Times Mirror doesn't vouch for any claims made by the Advertisers of products and services. The Printer, Publisher, Editor and Owners of Pune Times Mirror shall not be held legally responsible for any consequences, in the event of claims not being honoured by the Advertisers. Readers are advised to take informed decisions before sending money, incurring any expenses, acting on medical recommendations or entering into any commitment in relation to any advertisement published in this publication.

Pune Mirror 23.12.2024

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

# State plans higher edu 'connect' in Stds IX, X to reduce dropout rate

Yogita.Rao
@timesofindia.com

**Mumbai:** In order to catch students young, when they are in Std IX and X, the state's higher education department has decided to extend the reach of its school connect programme.

The School Connect 1.0 programme, as it is called now, involved connecting the state's universities and colleges with junior colleges. After realising that a lot of students take career decisions even before they reach junior college, School Connect 2.0 has decided to tap them young and inform them about different possibilities available at college level under the National Education Policy (NEP) 2020 — to not only reduce the dropout rate but also to improve the state gross enrolment ratio (GER) in higher education, which stands at 35% now.

"It is a general observation that higher numbers of students appear for SSC exams, and the numbers decline in HSC. Since these students are dropping out even at higher secondary school level, it is important they know of possibilities NEP offers. It is also necessary for them to understand the different schemes govt offers: free coaching for competitive exams through NCERT's Sathee portal, affordable loans available through the Vidya Lakshmi scheme. And there are options of multiple exit and entry options at degree level available with NEP," said director of higher education, Shailendra Deolankar.

He said there are also apprenticeship-embedded degree programmes now.

Deolankar added the current GER in higher education is 35%, and the idea of the school connect programme is to take it to 50%. "We realised that by the time students come to junior college, they have decided about their career path. So we thought these students need orientation on the different possibilities," he said. While there are 6,000 colleges in the state, the target is to cover 50,000-60,000 schools through the School Connect 2.0 programme, he added.

School Connect 1.0 was launched on Jan 1, 2024, and the second version will be launched a year later on Jan 1, 2025 for 15 days. These orientation programmes are also conducted with parents. Mumbai University V-C Ravindra Kulkarni said they have identified 10-25 schools/junior colleges in each district, preferably covering all talukas in a district.

**WHAT STAGE 2.0 OF PROGRAMME HAS**

**New changes that will be part of orientation given to school-going students through the School Connect 2.0 programme**

- Apprenticeship-embedded degree programmes, mandatory internship schemes, online courses through Swayam portal, free online tutoring on Sathee
- Sathee (Self-assessment, test, help for entrance exams) portal launched to provide equal education to students keen on appearing for NEET, JEE & other state-level exams, for students unable to afford coaching
- PM's Vidyalaxmi Loan scheme for students to pursue higher ed



**Objectives of School Connect 2.0**

- To guide students and parents about changes in NEP
- To give info on multi-disciplinary, flexible curriculum and skill-based education
- To provide info on opportunities through distance & open learning
- To provide info on different govt scholarship schemes
- To guide every school and junior college student towards higher education

The Times of India 24.12.2024

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 24 dec 2024_001
24 Dec 2024

### पाचवी व आठवीबाबत केंद्र सरकारचा निर्णय

# ढकलगाडी बंद; फेरपरीक्षा होणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ - केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने 'आरटीई' कायद्यात बदल केल्यानुसार 'नो-डिटेन्शन' पॉलिसी रद्द केली आहे. यामुळे इयत्ता पाचवी आणि आठवीमध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांना आता पुढच्या वर्गात ढकलण्यात येणार नाही. नापास झालेल्या विद्यार्थ्यांची दोन महिन्यांच्या आत फेरपरीक्षा घेऊन त्यांना पुढच्या वर्गात जाण्याची तरतूदही करण्यात आली आहे.**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने केंद्र



शासनाकडून सतत धोरणात अमुलाग्र बदल करण्याबाबतचे निर्णय घेण्यात येतात. आधी पाचवी, आठवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जायच्या. त्यानंतर या परीक्षा बंद करून सरसकट सर्वच विद्यार्थ्यांनाही पुढच्या वर्गात पाठविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा विद्यार्थ्यांच्या

### सर्व राज्यांना ठेवावे लागणार एकच धोरण

परीक्षा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. देशांतील विविध राज्यांत पाचवी, आठवीसाठी वेगवेगळे धोरण राबवले जात होते. आता सर्व राज्यांत एकच धोरण ठेवावे लागणार आहे.

पाचवी, आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना नापास करू नये, असा नियम करण्यात आला होता. त्यामध्ये आता बदल करण्यात आला आहे. आता केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार पाचवी आणि आठवीतल्या ढकलगाडीला यापुढे ब्रेक लागणार असून केंद्र सरकारने या वर्गातील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचे धोरण रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. पाचवी आणि आठवीत नापास झाल्यानंतर फेरपरीक्षा घेण्यासंदर्भात धोरण आखण्याच्या सूचना राज्य सरकारला देण्यात आल्या आहे. त्यामध्येही जर विद्यार्थी नापास झाला तर त्याला त्याच वर्गात बसवावे लागणार आहे. अपयशी विद्यार्थ्यांनी शाळा सोडू नये, याची योग्य ती काळजी घेतलीही घ्यावी लागणार आहे, असे केंद्र शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

पाचवी आणि आठवीत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना निकालानंतर पुढच्या दोन महिन्यांत फेरपरीक्षा देता येणार आहे. पुनर्परीक्षेनंतर एखादा विद्यार्थी पुन्हा अनुत्तीर्ण झाल्यास त्याला त्याच वर्गात ठेवले जाणार आहे. या कालावधीत शिक्षक विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे. शिक्षक विद्यार्थ्यांच्या पालकांशीही समन्वय (पान २ पहा) ▸▸

पान १ वरून

### ढकलगाडी बंद; फेरपरीक्षा होणार

साधणार आहेत. या सुधारित पद्धतीचा उद्देश उत्तम शैक्षणिक कामगिरी सुनिश्चित करणे आणि आवश्यक मानकांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आरटीई कायदानुसार कोणत्याही विद्यार्थ्यांना इयत्ता ८ वी पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकले जाणार नाही. २०१९ मध्ये शिक्षण हक्क कायद्यात सुधारणा केल्यानंतर किमान १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांनी दोन वर्गांसाठी नो-डिटेंशन पॉलिसी आधीच काढून टाकली आहे. त्यात आसाम, बिहार, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, मेघालय, नागालँड, पंजाब, राजस्थान, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, दिल्ली, दादरा आणि नगर-हवेली आणि जम्मू-काश्मीर यांचा समावेश आहे.

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता प्रतिनिधी

### उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांसाठी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'

**१ ते १५ जानेवारी दरम्यान आयोजन**

**पुणे :** विद्यार्थ्यांना पुस्तके आणि वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्यात सामूहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक परीक्षण आणि कथाकथन स्पर्धा असे उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. त्याद्वारे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सूचना आणि कार्यपद्धती देण्यात आली आहे. राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य कोणतेही पुस्तक वाचायचे आहे. या पुस्तकावर किमान ५०० शब्दांचे परीक्षण किंवा पाच मिनिटांचे सादरीकरण करायचे आहे. वाचनीय पुस्तकांची यादी प्रसिद्ध करून उच्च शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून द्यायची आहेत.

> 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमात राज्यातील सहा हजारांहून अधिक महाविद्यालये, ८३ विद्यापीठे, साडेबारा हजार ग्रंथालयांचा सहभाग आहे. शहरी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यात सहभागी होता येईल. वाचन प्रेरणा दिनाअंतर्गत वाचन उपक्रम होत असला, तरी तो उपक्रम आणि 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम यात गुणात्मक फरक आहे. - डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण संचालक

स्पर्धेतील विजेत्या परीक्षणांचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात करावा, स्पर्धेतील विजेत्यांना २६ जानेवारी रोजी पारितोषिके प्रदान करावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

'राज्यातील दहा विभागांतील प्रत्येकी सर्वोत्कृष्ट तीन विद्यार्थ्यांची निवड करून एकूण ३० विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात येईल,' असे उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले.

'उपक्रमासाठी राज्यस्तरीय समिती, विभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती, महाविद्यालयीनस्तरीय समिती नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वाचन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांनी पुस्तक प्रदर्शन आयोजित करावे. ग्रंथालयांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी करावी,' असेही नमूद करण्यात आले आहे.

Loksatta 24.12.2024

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

**पुढारी**

www.pudhari.com

पुढारी ANCHOR



# विद्यार्थ्यांना लावणार अवांतर वाचनाची गोडी

**'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम महाविद्यालयांमध्ये राबविण्याचा निर्णय**

**१ ते १५ जानेवारी वाचन पंधरवडा**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**तरुण पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे. ही बाब लक्षात घेता राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने महाविद्यालयांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे राज्यातील ४५ लाख विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर पुस्तकवाचनाच्या प्रवाहात आणण्याचा मानस राज्य सरकारने आखला आहे.**

**... असे आहे वेळापत्रक**

- १ जानेवारी : वाचनकौशल्य कार्यशाळा आयोजित करणे
- ३ ते ७ जानेवारी : लेखक आणि विद्यार्थी यांच्यामधील वाचनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करणे
- १६ जानेवारी : पुस्तकपरीक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन करणे
- २६ जानेवारी : विजेत्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र, बक्षीस देण्यात यावे

> विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचावे, यासाठी १ जानेवारी ते १५ जानेवारीदरम्यान 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पंधरा दिवसांत विद्यार्थी एक पुस्तक वाचणार आहे तसेच त्याचे परीक्षण देखील करणार आहे. या माध्यमातून ४५ लाख पुस्तकांचे वाचन करण्यात येणार असून, हा एक नवा विक्रम होण्याची अपेक्षा आहे.
> - **डॉ. शैलेंद्र देवळाणकर**, उच्च शिक्षण संचालक

नव्या वर्षात राज्यातील ४५ लाख विद्यार्थी पुस्तके वाचून त्यांचे परीक्षण लिहिणार आहेत. १ ते १५ जानेवारी या कालावधीत हा वाचन पंधरवडा उपक्रम राबविण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर पुस्तकपरीक्षण आणि कथन स्पर्धा राबवावी लागणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याने वाचलेल्या आवडीच्या पुस्तकातील परीक्षण लिहून द्यावे लागणार आहेत. हे परीक्षण ५०० शब्दांचे असावे किंवा त्याचे ५ मिनिटे कथन करावे. यातील तीन उत्कृष्ट परीक्षणांची निवड करून त्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस दिले जाणार आहे, असेही उच्च शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

तरुणांना वाचनाके वळविण्यासाठी राज्य सरकारने ह उपक्रम हाती घेतला आहे. त्यादृष्टीने महाविद्यालये, विद्यापीठे, सार्वजनिक ग्रंथालये या माध्यमांतू वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला राज्यातील सव महाविद्यालये, विद्यापीठे आणि सार्वजनिक ग्रंथालये यांना त्यांच्या संस्थेच्या प्रांगणात वाचनाचा सामूहिक उपक्रम राबविण्याच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने दिल्या आहेत. या उपक्रमाची छायाचित्रे महाविद्यालयांना त्यांच्या संकेस्थळावर, स्थानिक वर्तमानपत्रात आणि समाजमाध्यमांव प्रसिद्धीस देण्यासही सांगण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांनी कोणती पुस्तके वाचावीत आणि ती कशी वाचावीत, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा घ्यावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

Pune Edition
Dec 25, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

सामना

### गरवारे महाविद्यालयाकडून क्लस्टर विद्यापीठाचा प्रस्ताव

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रात नवीन शैक्षणिक धोरणाच्या एनईपी अंमलबजावणी बरोबरच क्लस्टर विद्यापीठांच्या स्थापनेबाबत शासनाकडून पुढाकार घेतला जात आहे. राज्यात खासगी विद्यापीठांबरोबरच क्लस्टर विद्यापीठे स्थापन होत असून, पुण्यातून क्लस्टर विद्यापीठासाठी पहिला प्रस्ताव गरवारे महाविद्यालयाने राज्य शासनाकडे दाखल केला आहे.

राज्यात खासगी विद्यापीठांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांनी खासगी विद्यापीठ म्हणून शासनाची मान्यता घेतली आहे. त्यात एमआयटी, जी. एच. रायसोनी जेएसपीएम, अलार्ड आदी विद्यापीठांचा समावेश आहे. राज्यात इतरही जिल्ह्यांत खासगी विद्यापीठे सुरू झाली आहेत. त्यातच राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी क्लस्टर विद्यापीठे स्थापन होत आहेत. होमी भाभा राज्य विद्यापीठ (हैदराबाद) सिंध नॅशनल कॉलेजीएट (HSNC) विद्यापीठ, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ (सातारा) आणि वारणा विद्यापीठ (कोल्हापूर) ही चार क्लस्टर विद्यापीठे स्थापन झाली आहेत. आता मुंबईतील नगिनदास खंडवाला, शासकीय विज्ञान संस्था (नागपूर), बजाज इन्स्टिट्यूट (वर्धा) यांनी क्लस्टर विद्यापीठासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यात पुण्यातून क्लस्टर विद्यापीठाचा पहिला प्रस्ताव महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीकडून म्हणजेच गरवारे महाविद्यालयाकडून सादर करण्यात आला आहे. त्यामुळे पुढील काळात गरवारे महाविद्यालयाचे रूपांतर क्लस्टर विद्यापीठात होणार आहे.

शासनाकडे दाखल झालेल्या प्रस्तावानुसार शिक्षण विभागाने संबंधित शिक्षण संस्थांच्या भेटी घेऊन आवश्यक कार्यवाही सुरू केली आहे. मंत्रिमंडळ मंजुरी व अधिवेशनात विधेयक सादर केल्यानंतर या विद्यापीठांना मंजुरी मिळणार आहे.

Pune Edition
Dec 25, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

सामना

### अनामत रकमेबाबत पुनर्विचार करावा

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नियमक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे म्हणाले, एमईएस गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, आबासाहेब गरवारे महाविद्यालय आणि एमईएस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करियर कोर्स अर्थात आयएमसीसी या तीन शैक्षणिक संस्थांचे मिळून क्लस्टर विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे. राज्य शासनाच्या सर्व नियमांची पूर्तता आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच क्लस्टर विद्यापीठ म्हणून मान्यता मिळणार आहे. परंतु, क्लस्टर विद्यापीठ स्थापनेसाठी तरतूद करण्यात आलेली पाच कोटी रुपये एवढी अनामत रक्कम हा शैक्षणिक संस्थांवर अनावश्यक बोजा आहे. याबाबत शासनाने पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे.

Pune Edition
Dec 25, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

**लोकमत**

# भाषा विभागांतर्गत येणार मराठी विद्यापीठ, ग्रंथालये

## मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मराठी भाषा विद्यापीठ तसेच सर्व शासकीय ग्रंथालये मराठी भाषा विभागाच्या अखत्यारित येण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड येथे मराठी भाषा विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागाचे सहसचिव नामदेव भोसले, अवर सचिव नितीन डंगारे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक तथा विश्वकोश निर्मिती मंडळाचे प्रभारी सचिव डॉ. श्यामकांत देवडे, भाषा संचालक विजया डोणीकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील, विभागाच्या कक्ष अधिकारी ऐश्वर्या गोवेकर आदी उपस्थित होते.

सामंत म्हणाले, राज्यस्तरावर महिला साहित्य संमेलन तसेच विभागनिहाय युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्याचे नियोजन करावे.

### मराठी भाषेसाठी एक तास राखून

राज्य भाषेला अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या तामिळनाडू किंवा अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रानेही आपल्या भाषेच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून अधिकाधिक निधी मिळावा यासाठी प्रस्ताव पाठवून गतीने पाठपुरावा करावा. दुसरे विश्व मराठी संमेलन २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च असे तीन दिवस पुणे येथे घेण्यात येईल. त्यासाठी विभागाने तयारी करावी, तसेच दिल्ली येथे होणाऱ्या विश्व साहित्य संमेलनात मराठी भाषेसाठी एक तास राखून त्या माध्यमातून जागतिक स्तरावर मराठी भाषा जाईल, यासाठी प्रयत्न करावेत.

Hello Pune
Page No. 2 Dec 25, 2024
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

**लोकमत**

राष्ट्रीय शिक्षण धोरणातील बदलांच्या माहितीसाठी स्कूल कनेक्ट २.०

# नववी ते बारावीच्या मुलांची काळजी घेणार विद्यापीठे

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे (एनईपी) शिक्षणक्षेत्रात होऊ घातलेल्या बदलांची माहिती आता माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांची मदत घेतली जाणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने आखलेल्या 'स्कूल कनेक्ट' या उपक्रमाचा दुसरा टप्पा नव्या वर्षात सुरू केला जाणार आहे.

१ जानेवारी ते १५ जानेवारीदरम्यान हे अभियान राबविले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात नववी ते बारावीच्या शिक्षणात होऊ घातलेल्या बदलांची सविस्तर माहिती यात विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे.



## नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांवर परिणाम

नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातील अप्रेंटिसशीप, एम्बेडेड पदवी अभ्यासक्रम, इंटर्नशिप, भारतीय ज्ञान प्रणाली, स्वयं, महास्वयं, सेल्फ असेसमेंट टेस्ट अँड हेल्प फॉर एण्ट्रन्स एक्झामिनेशन (साथी) अशा विविध उपक्रमांबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) वेळोवेळी मार्गदर्शक नियमावली जारी केली आहे. या बदलांचा परिणाम आता नववी ते बारावी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात होऊ घातलेल्या बदलांची माहिती मिळावी यासाठी उच्च शिक्षण विभागाच्या वतीने 'स्कूल कनेक्ट' अभियान राबवले जात आहे. त्याचाच भाग म्हणून आता दुसऱ्या टप्प्यात या बदलांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे.

## कुलगुरूंवर जबाबदारी

- उच्च शिक्षण विभागाने या अभियानाची जबाबदारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंकडे सोपवली आहे.
- यासाठी प्र-कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली सर्व अधिष्ठाता, चांगल्या गुणवत्ता असलेल्या संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी प्रतिनिधी आदींची समिती स्थापन करण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत.
- तसेच स्कूल कनेक्ट अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस टूरचेही आयोजन केले जाणार आहे.

## प्राध्यापकांचे मार्गदर्शन

१ विद्यापीठांनी तयार केलेल्या अनुभवाधिष्ठित, बहुविद्याशाखीय, लवचीक अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती पालक आणि विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे.

२ मूल्यमापनातील श्रेयांक पद्धती, त्यामुळे आलेली लवचीकता, मुक्त व दुरस्थ शिक्षणाच्या संधी, तसेच कल्पक, व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित संबोधनाविषयी माहिती दिली जाणार आहे.

३ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शिष्यवृत्ती, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध संधी, एनईपीमुळे झालेले बदल यांची माहिती दिली जाणार आहे. त्याचबरोबर बारावीनंतर आवडीचे अभ्यासक्रम निवडण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

Pune Main
Page No. 4 Dec 25, 2024
Powered by: erelego.com

# नववर्षाची सुरुवात वाचनाने

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

- १ ते १५ जानेवारीदरम्यान विविध उपक्रम
- विद्यापीठे, कॉलेजे आणि वाचनालयांमध्ये आयोजन
- उपक्रमाचे पहिलेच वर्ष



चित्र : एआय

महाराष्ट्रात वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. एकीकडे शालेय शिक्षण विभागाने महावाचन उपक्रमाद्वारे राज्यभरातील शालेय विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यासाठी तयारी केली असताना आता उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम राबवण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजे १ ते १५ जानेवारी या काळात राज्यातील विद्यापीठे, कॉलेजे आणि सार्वजनिक वाचनालये येथे वाचन पंधरवड्याचे आयोजन केले जाणार आहे. या उपक्रमाचे हे पहिलेच वर्ष आहे.

वाचनामुळे संस्कारक्षम वयातील मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. मात्र अलीकडच्या काळात देशाचा तरुण वाचनापासून दुरावल्याचे दिसते, असे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढलेल्या शासन निर्णयात म्हटले आहे. या पिढीला ग्रंथवाचनाकडे आकर्षित करण्यासाठी आणि वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी विद्यापीठे, कॉलेजे आणि सार्वजनिक वाचनालये यांमार्फत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत १ ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा साजरा केला जाईल.

### विविध समित्या

या वाचन पंधरवड्याच्या आयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्याचे निर्देशही उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिले आहेत. यात राज्य, विभाग, जिल्हा आणि कॉलेज या स्तरांवर समिती असेल. तसेच या पंधरवड्याच्या निमित्ताने सार्वजनिक वाचनालये आणि कॉलेजे यांना पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. आता 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दरवर्षी १ ते १५ जानेवारी या कालावधीत राबवण्यात यावा, असेही या शासन निर्णयात म्हटले आहे.

### वाचन पंधरवड्यात काय होणार?

- **सामूहिक वाचन उपक्रम :** विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी एकत्र येत पुस्तक वाचणे
- **वाचन कौशल्य कार्यशाळा :** पुस्तक कसे वाचावे, कोणती पुस्तके वाचावीत, याबाबत मार्गदर्शन
- **वाचन संवाद :** स्थानिक लेखकांना कॉलेजमध्ये निमंत्रित करून संवाद
- **पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा :** विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचून त्याचे परीक्षण करावे

Maharashtra Times 25.12.2024

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

# दुहेरी पदवीचे 'गिफ्ट'

## विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्राचा निर्णय

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

शिकण्याची इच्छा आहे, परंतु प्रत्यक्ष महाविद्यालयात प्रवेश घेणे शक्य नाही, अशांसाठी वरदान असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्राने (सीडीओई) आणखी एक क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. या केंद्रातून आता दुहेरी पदवी घेणे शक्य होणार आहे. म्हणजेच मराठीतून पदवी घेणाऱ्या एखाद्या विद्यार्थ्याला त्याच वर्षी गणितातूनही पदवी घ्यायची असेल, तर तो सीडीओईच्या माध्यमातून दुहेरी पदवी घेऊ शकतो. तसेच, जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून सामाजिकशास्त्र म्हणजेच सोशिओलॉजी विषयात ऑनलाइन पद्धतीने पदवीचा पर्यायही विद्यापीठाने उपलब्ध करून दिला आहे.

याआधी विद्यार्थ्यांना एकापेक्षा जास्त विषयांमध्ये पदवी घ्यायची असेल तर, एका विषयातील पदवी मिळाल्यानंतर नव्याने दुसऱ्या विषयासाठी प्रवेश घ्यावा लागत होता. मात्र आता विद्यापीठाने अशा विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन विषयांचा पदवी अभ्यासक्रम करण्याची मुभा दिली आहे. दुहेरी पदवीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानाची कक्षा रुंदावण्याची संधी मिळेल. एकाच वेळी त्यांना रस असलेल्या दोन विषयांमध्ये पदवी मिळवता येणार आहे, असे सीडीओईचे संचालक डॉ. शिवाजी सरगर यांनी स्पष्ट केले. सीडीओईने मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र पाठवत या दुहेरी पदवीची माहिती विद्यार्थ्यांना देण्याचे आवाहन केले आहे. अनेकदा विद्यार्थ्यांना एखाद्या विषयात रस असतो, पण त्या विषयाचा अभ्यास केल्यावर नोकऱ्यांची संधी मिळतेच, असे नाही. मग विद्यार्थी रोजगाराभिमुख विषय निवडतात आणि त्यांचा रस असलेल्या विषयाकडे दुर्लक्ष होते. दुहेरी पदवीच्या पर्यायामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयात आणि रोजगाराभिमुख विषयात एकाच वेळी पदवी घेता येईल. तसेच, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या पदव्या असल्याने नोकरी देतानाही अशा विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळण्याची शक्यता डॉ. सरगर यांनी व्यक्त केली.



### नोकरदार, गृहिणींनाही लाभ

मुंबई विद्यापीठाच्या नियमित अभ्यासक्रमातही दुहेरी पदवी घेता येऊ शकते. मात्र, काही काळापूर्वी शिक्षण अर्ध्यात सुटलेले लोक, नोकरीमुळे नियमित अभ्यासक्रम करणे शक्य नसणारे विद्यार्थी, गृहिणी, आदी सीडीओईद्वारे दुहेरी पदवीचा अवलंब करू शकतात, असे डॉ. सरगर यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे सध्या सीडीओईने सोशिओलॉजी विषयात ऑनलाइन पद्धतीने पदवी घेण्याचा पर्याय दिला आहे. येत्या वर्षात ऑनलाइन पदवीसाठीच्या विषयांची व्याप्ती वाढवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

Maharashtra Times 25.12.2024

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीची मागणी

**पुणे, ता. २५ :** ऑक्टोबर २०१७ च्या आकृतिबंधातील मंजूर पदांवर १०० टक्के सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक आणि प्रयोगशाळा सहाय्यक पदभरतीला परवानगी देऊन तत्काळ पदभरती सुरू करावी, तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना मानधनवाढ मिळावी, या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने मुख्यमंत्र्यांना दिले आहे.

राज्यात नोव्हेंबर २०२१ आणि एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयानुसार दोन हजार ८८ सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. नोव्हेंबर २०१८ च्या निर्णयानुसार तीन हजार ५८० सहाय्यक प्राध्यापकांच्या जागा भरण्यास मंजुरी मिळाली होती. दरम्यान, राज्यात सध्या अल्प प्रमाणात सहाय्यक प्राध्यापकांची भरती प्रक्रिया सुरू आहे. ऑक्टोबर २०१७ नंतर बऱ्याच विषयांची सर्व पदे सेवानिवृत्ती, आकस्मिक मृत्यूमुळे रिक्त झालेली आहेत. अशाप्रकारे अकृषी महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यापकांच्या १२ ते १५ हजार जागा, तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आठ ते दहा हजार जागा रिक्त आहेत. जागांवरील भरतीच्या प्रक्रियेला गती मिळावी, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष डॉ. संदीप पाथ्रीकर यांनी निवेदनात केली आहे.

### सहाय्यक प्राध्यापकांच्या मागण्या...

- तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना प्रतितासिका दीड हजार रुपये मानधन ११ महिने द्यावे
- तासिका तत्त्वावरील अनुभव हा कायम नियुक्तीनंतर ग्राह्य धरावा
- सहाय्यक प्राध्यापक भरतीचे 'ना हरकत प्रमाणपत्र' उच्च शिक्षण सहसंचालक स्तरावर द्यावे
- अकृषी महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीवरील बंदी उठवावी
- 'नॅक' मूल्यांकनात अ/ब दर्जा मिळालेल्या अनुदानित महाविद्यालयांतील कायम विनाअनुदानित तुकड्यांना १०० टक्के अनुदान द्यावे

Sakal 26.12.2024

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी मुक्त व्यासपीठ

## शिक्षक, विद्यार्थी-पालकांचे तज्ज्ञांमार्फत प्रबोधन; दर शनिवारी ऑनलाइन मार्गदर्शन

**पुणे, ता. २५ :** राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली असली, तरीही धोरणानुसार कोणते नवे बदल होणार आहेत, धोरणाची अंमलबजावणी कशा पद्धतीने होईल, याबाबत शिक्षक, विद्यार्थी, पालक अनभिज्ञ आहेत. म्हणूनच शिक्षक, विद्यार्थी-पालक यांचे तज्ज्ञांमार्फत प्रबोधन करण्यासाठी आता उच्च शिक्षण विभागाने मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. त्यानुसार राज्यात आता दर शनिवारी सकाळी ११ ते दुपारी १२.३० दरम्यान ऑनलाइन पद्धतीने प्रबोधनपर मुक्त व्यासपीठ सुरू करण्यात येणार आहे. याद्वारे राज्यस्तरीय सुकाणू समितीतील तज्ज्ञ सदस्य ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध असणार आहेत.

### हे तज्ज्ञ सदस्य करणार मार्गदर्शन

- राज्यस्तरीय सुकाणू समितीतील अनिल राव (माजी प्राचार्य, एम. जे. महाविद्यालय, जळगाव), डॉ. डी. टी. शिर्के (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ), डॉ. आर. डी. कुलकर्णी (कुलगुरू, मुंबई विद्यापीठ), डॉ. व्ही. एल. माहेश्वरी (कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ), डॉ. मुरलीधर चांदेकर (माजी कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ), डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन (प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ), डॉ. माधव वेलिंग (प्र-कुलगुरू, एनएमआयएमएस), डॉ. विनोद मोहितकर (संचालक, तंत्र शिक्षण), डॉ. शैलेंद्र देवळाणकर (संचालक, उच्च शिक्षण) हे तज्ज्ञ सदस्य मुक्त व्यासपीठाद्वारे मार्गदर्शन करणार आहेत.

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (२०२०) अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्थापन केलेल्या उपसमितीच्या अहवालातील शिफारशींनुसार कार्यवाही करण्यासाठी सुकाणू समिती पुनर्गठित केली आहे. धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेत, येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविणे आणि मार्गदर्शन करण्यासाठी ही समिती कार्यरत आहे. राज्यात शैक्षणिक धोरणाची सूत्रबद्ध पद्धतीने उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अंमलबजावणी होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व अकृषी विद्यापीठांतील विभाग आणि स्वायत्त महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम पद्धती आणि श्रेयांक पद्धती लागू करण्यात आली. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उर्वरित संलग्नित महाविद्यालयांत याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या संदर्भात सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे प्रबोधन आणि मार्गदर्शन करण्यात येत आहे. तरीदेखील काही विषयांबाबत तज्ज्ञांमार्फत आणखी मार्गदर्शन व प्रबोधन व्हावे, अशी मागणी होत आहे. यानुसार हे मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून दिले असल्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले.

### असे असेल प्रबोधनपर मुक्त व्यासपीठ

- दर शनिवारी (वेळ : सकाळी ११ ते दुपारी १२.३०)
- राज्यस्तरीय सुकाणू समितीतील तज्ज्ञ सदस्यांचे ऑनलाइन मार्गदर्शन
- पहिले सत्र येत्या चार जानेवारीला होणार

### प्रश्नांची उकल अन् निराकरण

ऑनलाइन सत्रामध्ये प्राचार्य, संस्थाचालक, अध्यापक, विद्यार्थी, पालक आणि इतर संबंधितांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी संदर्भातील विचारलेल्या प्रश्नांची उकल आणि निराकरण त्वरित तज्ज्ञांमार्फत करण्यात येईल. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कुलसचिव (सर्व अकृषी विद्यापीठे) यांनी या उपक्रमाबाबत आपल्या स्तरावरून महाविद्यालयांना कळवावे, असा आदेश डॉ. देवळाणकर यांनी दिला आहे. या उपक्रमाची सुरुवात जानेवारी २०२५ पासून होत असून पहिले सत्र येत्या चार जानेवारीला आयोजित केले असल्याचे शिक्षण विभागाने कळविले आहे.

Sakal 26.12.2024

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education

लोकमत

# प्राध्यापक तुपाशी, सीएचबीधारक उपाशी

## पगारात मोठी दरी : 'पूर्णवेळ'ना महिना ६७ कोटी, तर सीएचबीधारकांना सातच कोटी

**सीएचबीधारकांचे दुखणे भाग-२**

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एकच शिक्षण, सारख्याच पदव्या घेऊनही १९७३ सीएचबीधारक सहायक प्राध्यापकांना महिन्याचे वेतन अवघे सात कोटी, तर २२५० पूर्णवेळ प्राध्यापकांना ६७ कोटी रुपयांहून अधिकचे वेतन दिले जात आहे. शिवाजी विद्यापीठांतर्गत १३३ महाविद्यालयांमधील सीएचबीधारक व पूर्णवेळ प्राध्यापकांच्या वेतनातील ही तफावतच शिक्षण क्षेत्रात कंत्राटी पद्धतीने किती मोठी दरी उभी केली आहे याचे वास्तव सांगणारी आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अनुदानित १३३ महाविद्यालयांमध्ये २,२५० पूर्णवेळ प्राध्यापक आहेत, तर याच महाविद्यालयांत तिन्ही जिल्ह्यात मिळून १९७३ सीएचबीधारक कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची भरती निघत नसल्याने त्यांना अक्षरश: तुटपुंज्या वेतनावर काम करण्याची वेळ आली आहे. सीएचबी प्राध्यापकांना पूर्वी तासाला अवघे ७० ते ८० रुपये इतके मानधन दिले जात होते. त्यानंतर ते वाढून २५० व पुढे ६५० रुपये केले. २०२३ मध्ये हे मानधन प्रतितास ९०० रुपये करण्याची घोषणा करण्यात आली. मात्र, सध्या पदवीच्या पहिल्या वर्षाला शिकविणाऱ्या प्राध्यापकांना ९०० रुपयांप्रमाणे मानधन दिले जाते.

द्वितीय आणि तृतीय वर्षातील वर्गाला शिकविणाऱ्या सीएचबीधारकांना अद्यापही ७२० रुपयेप्रमाणेच मानधन मिळते. या प्राध्यापकांचे महिन्याला तीस तास होतात. मात्र, त्यातही शासकीय सुट्ट्या, उन्हाळी, दिवाळी सुट्ट्या गृहित धरल्या, तर या प्राध्यापकांना अवघे सात ते आठच महिने शिकविण्यास मिळतात. त्यामुळे सरासरी मानधन पंधरा हजार रुपयेही पदरात पडत नाही. त्यामुळे मिळणारे मानधन अत्यंत तुटपुंजे असल्याने सीएचबीधारक प्राध्यापकांना इतरत्र काम करण्याची वेळ आली आहे



**दृष्टिक्षेपात प्राध्यापक**

१३३
शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांची संख्या

पूर्णवेळ प्राध्यापक ↓ २२५०

१९७३ ↑ सीएचबीधारक सहायक प्राध्यापक

### कामे जास्त तरी मानधन कमी

१. विद्यापीठस्तरीय परीक्षेच्या पर्यवेक्षणासाठी सीएचबीवर काम करणारे सहाय्यक प्राध्यापकच काम करतात.

२. महाविद्यालयांच्या नॅकसह अधिविभागाचे विविध उपक्रम, विविध समित्यांचे काम, प्रश्नपत्रिका बनवणे, ती तपासणे ही कामेही या प्राध्यापकांना लावली जातात.

३. विशेष म्हणजे या अतिरिक्त कामाचे पैसेही त्यांना दिले जात नाहीत. मानधनात वाढ होत नसल्याने या प्राध्यापकांमध्ये कमालीचे नैराश्य आले आहे.

### निम्मे मानधन संस्थाचालकांना

- मुळात सीएचबीधारकांना त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येत नाही, इतकेही मानधन मिळत नाही. मात्र, यातही टाळूवरचे लोणी खाणाऱ्या प्रवृत्ती वाढल्या आहेत.
- काही महाविद्यालयांमधील सीएचबीधारकांकडून व्हॉउचरवर सह्या घेऊन निम्मे पैसे संस्थाचालक घेत आहेत.
- एका वस्त्रनगरीतील महाविद्यालयामध्ये तर हा प्रकार अलीकडे भलताच वाढला आहे.
- त्यामुळे एकवेळ नोकरी नाही मिळाली तरी चालेल पण येथे काम करायला नको, अशी मानसिकता सीएचबीधारकांची झाली आहे.

Kolhapur Main
Page No. 4 Dec 26, 2024
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2024

### Section: Education



पुणे

# 'एनईपी'च्या शंकांचे निरसन

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून ऑनलाइन व्यासपीठाची निर्मिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीबाबत प्राध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी यांच्या मनात काही शंका आणि प्रश्न असतात. या शंकांचे निरसन करण्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. जानेवारी महिन्यापासून प्रत्येत शनिवारी इच्छुक प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या मनातील प्रश्न, शंका ऑनलाइन पद्धतीने विचारण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यात स्वायत्त महाविद्यालय आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. त्यानंतर विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये 'एनईपी'च्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. राज्य सरकारच्या सुचनेनुसार राज्यातील सर्व विद्यापीठांनी एनईपीसंदर्भात प्राध्यापकांच्या कार्यशाळा घेतल्या. त्याचप्रमाणे 'एनईपी'ची अंमलबजावणी कशी करावी, या संदर्भात आवश्यक मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली एनईपी अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती स्थापना करण्यात आली. डॉ. करमळकर यांनी विद्यापीठनिहाय बैठका घेऊन मार्गदर्शन केले.

अनेक विद्यापीठांमध्ये मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. मात्र, अंमलबाजवणीत प्राचार्य, प्राध्यापकांबाबत विविध प्रश्न आणि शंका उपस्थित होत आहेत. प्राध्यापकांमध्ये 'एनईपी'संदर्भात काही शंका आणि प्रश्न असल्यामुळे राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण संचालक कार्यालयाने ऑनलाइन व्यासपीठाच्या माध्यमातून 'एनईपी'बाबतच्या शंकांचे निरसन करण्याचा निर्णय घेतला आहे. या निमित्ताने प्राध्यापकांना तंत्रशिक्षण; तसेच उच्चशिक्षण संचालकांनाही प्रश्न विचारता येणार आहेत. उच्च शिक्षण संचालक कार्यालयाचे प्रमुख अधिकारी, तंत्र शिक्षण संचालक कार्यालयाचे अधिकारी आणि सुकाणू समितीचे अध्यक्ष, सदस्य हे एनईपी संदर्भातील विविध प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी सर्वांसाठी ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध होणार आहेत.

### इथे होईल शंका निरसन

या उपक्रमाची सुरुवात शनिवारी (४ जानेवारी) होणार आहे. प्रत्येक शनिवारी सकाळी ११ वाजता https://zoom.us/i/99562255769 या लिंकवर इच्छुक प्राध्यापक, विद्यार्थ्यांना एनईपी संदर्भातील त्यांचे प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

(चित्र : एआय)

### विद्यार्थी-पालकांसाठी उपयुक्त

'एनईपी'बाबत विद्यार्थी आणि पालकांच्या शंका असून, त्यांच्या मनात अनेक प्रश्न आहेत. एनईपीची माहिती पालकांपर्यंत पोहोचली असली, तरी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम, क्रेडिट सिस्टीम, ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट, चार किंवा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम, विषयांची निवड, इंटर्नशिप अशा अनेक घटकांबाबत विद्यार्थी-पालकांच्या मनात शंका आहेत. या शंकांचे निरसन 'ओपन डिसकशन फोरम'द्वारे व्हावेत, यासाठीही हे व्यासपीठ काम करणार आहे.

Maharashtra Times 26.12.2024

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### राज्यात नवीन पाच क्लस्टर विद्यापीठे

#### पुण्यातूनही प्रस्ताव दाखल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात खासगी विद्यापीठांबरोबरच क्लस्टर विद्यापीठे स्थापन होत असून, पुण्यातून पहिला, तर राज्यातील पाच शैक्षणिक संस्थांनी क्लस्टर विद्यापीठासाठी प्रस्ताव राज्य शासनाकडे दाखल केले आहेत. त्यामुळे येत्या काळात राज्यात पाच नवीन क्लस्टर विद्यापीठे निर्माण होणार असल्याची माहिती उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

राज्यात खासगी विद्यापीठांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांनी खासगी विद्यापीठ म्हणून शासनाची मान्यता घेतली आहे. त्यात एमआयटी, जी. एच. रायसोनी, जेएसपीएम, अलार्ड आदी विद्यापीठांचा समावेश आहे. तसेच, राज्यात इतरही जिल्ह्यांत खासगी विद्यापीठे सुरू झाली आहेत. होमी भाभा राज्य विद्यापीठ, हैदराबाद सिंध नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा ही तीन क्लस्टर विद्यापीठे स्थापन झाली आहेत. आता मुंबईतील नगिनदास खंडवाला, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर, बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी वर्धा आणि पुण्यातून क्लस्टर विद्यापीठाचा पहिला प्रस्ताव महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीकडून सादर करण्यात आला आहे.

> "क्लस्टर विद्यापीठांसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या शैक्षणिक संस्थांची स्थळपाहणी करून आढावा बैठका घेण्यात आल्या. त्यानंतर त्यांचा रिपोर्ट राज्य सरकारला सादर करण्यात आला. यातून वारणा विद्यापीठ कोल्हापूरच्या मान्यतेची अधिसूचना काढण्यात आली आहे, तर अन्य चार शैक्षणिक संस्थांचा प्रस्ताव मान्यतेसाठी विचाराधीन आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यात नवीन पाच क्लस्टर विद्यापीठांची भर पडणार आहे.
>
> **- प्रकाश बच्छाव,** सहसंचालक, उच्च शिक्षण

Pune Edition
Dec 26, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### नवीन शैक्षणिक धोरणाच्या कार्यवाहीला प्राधान्य देणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थी हिताला प्राधान्य देत राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे, वाचन चळवळ वाढविणे आणि प्राध्यापकांचे प्रशिक्षण यावर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. गुरुवारी त्यांनी मंत्रिपदाचा पदभार स्वीकारला.

यावेळी त्यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला उच्च शिक्षणातील सुधारणेचा त्रिसूत्री कार्यक्रम दिला. पाटील म्हणाले, वाचन संस्कृतीचा विकास व्हावा यासाठी विद्यापीठे, महाविद्यालय व सार्वजनिक ग्रंथालयांत वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत राज्यात राबविण्यात येणार आहे. या उपक्रमअंतर्गत महाविद्यालयीन, विभागीय स्तरावर पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यातील उत्कृष्ट परीक्षणाची निवड करून प्रोत्साहनपर प्रमाणपत्र आणि बक्षीसही जाहीर करण्यात येणार आहे.

**• मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्वीकारला पदभार**

**मराठा विद्यार्थ्यांना दिलासा**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल (ईडब्ल्यूएस) या गटातून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला होता. राज्य शासनाने एसईबीसी आरक्षण लागू केल्यानंतर मराठा समाजातील मुलांना ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देणे बंद केले. त्यांना सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग अर्थात एसईबीसी प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली. त्यामुळे आता प्रवेश देणाऱ्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) विद्यार्थ्यांकडून ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राची सक्ती केली होती. त्यामुळे विविध अभ्यासक्रमाच्या सुमारे १४०० विद्यार्थ्यांचे प्रवेश अडचणीत आले.

या पार्श्वभूमीवर मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आवश्यक जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आता दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी देण्याची घोषणा यावेळी मंत्री पाटील यांनी केली. त्यामुळे या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

Pune Edition
Dec 27, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

**पुढारी**

www.pudhari.com

# एम.फील.धारकांच्या प्रस्तावात त्रुटी

## आवश्यक कागदपत्रांची तातडीने पूर्तता करण्याचे विद्यापीठाचे निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने ११ जुलै २००९ पूर्वी एम.फिल. पदवी प्राप्त केलेल्या प्राध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत समिती स्थापन केली आहे. या समितीला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सादर केलेल्या १९८ प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यावर आता येत्या दोन दिवसांमध्ये त्रुटी पूर्तता अहवाल सादर करावा लागणार आहे. त्यासाठी संबंधित उमेदवारांकडून विद्यापीठाने काही कागदपत्रांची मागणी केली आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ५ सप्टेंबर २०२४ रोजी एम.फिल.धारक प्राध्यापकांचे प्रस्ताव यूजीसीकडे सादर केले. त्यावर दोन दिवसांपूर्वी शिक्षण संचालक कार्यालयाकडून विद्यापीठाला पत्र पाठविण्यात आले. त्यात विद्यापीठाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याचे आढळून आल्या आहेत. त्यामुळे संबंधित त्रुटींची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या मान्यता कक्षातर्फे नाताळच्या सुटीच्या दिवशी कार्यालय सुरू करून अतितातडीचे पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

या प्रस्तावांची तज्ज्ञ समितीकडून तपासणी केली असता त्यामध्ये शिक्षक मान्यता पत्र, सेवेत कायम केल्याचे पत्र, मूळ निवड समिती अहवालाची प्रत, एम. फिल. उत्तीर्ण प्रमाणपत्र या त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यामुळे या त्रुटींची पूर्तता करून येत्या २७ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ पर्यंत दोन प्रतीमध्ये पुणे शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष), अहिल्यानगर उपकेंद्र व नाशिक उपकेंद्र येथे हस्तपोहोच किंवा ई-मेलद्वारे सादर करावेत. तसेच काही अडचण आल्यास ९५२७९४६१४२, ९६३७७७१२०६ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा. जेणेकरून प्रस्तावावर पुढील योग्य ती कार्यवाही वेळेत करता येईल, असे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

Pune Edition
Dec 27, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

**लोकसत्ता**
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठामार्फतच अंतर्गत भरती

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची भरती ही एमपीएससीमार्फत करण्याबाबत राज्य सरकार विचार करत असल्याची चर्चा आहे. मात्र एमपीएससीमार्फत भरती केल्यास पुढील अनेक वर्षे पूर्ण पदभरती होण्याची शक्यता नाही. त्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालयांतील शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्राध्यापकांची भरती ही एमपीएससीऐवजी विद्यापीठ स्तरावरच करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी सांगितले.

पाटील यांनी गुरुवारी उच्च व तंत्रशिक्षणमंत्रीपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी विभागाला उच्च शिक्षणातील सुधारणेचा त्रिसूत्री कार्यक्रम दिला. राज्यातील १५ विद्यापीठांमध्ये ६५९ जागा रिक्त आहेत. त्यात मुंबई विद्यापीठामध्ये जवळपास १३६ प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरल्यास 'नॅशनल इन्स्टिट्युशन रँकिंग फ्रेमवर्क'च्या क्रमवारीत व गुणवत्तेमध्ये वाढ होण्यास साहाय्यभूत ठरणार आहे. त्यामुळे ही भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसा प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

बिहार व झारखंड या राज्यांत अशा प्रकारे प्राध्यापकांची भरती करण्यात आली आहे. मात्र एमपीएससीकडे भरतीसंदर्भातील अनेक नस्ती प्रलंबित आहेत. ही भरतीसुद्धा एमपीएससीमार्फत केल्यास प्रक्रिया विलंबाने होण्याची शक्यता आहे.

### १ जानेवारीपासून 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'

वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरण पोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. यासाठी विद्यापीठे, महाविद्यालय व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत राज्यात राबविण्यात येणार आहे. 'वाचन संकल्प महाराष्ट्र' या उपक्रमअंतर्गत महाविद्यालयीन, विभागीय आणि स्तरावर पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे परीक्षकांकडून उत्कृष्ट परीक्षणाची निवड करून प्रोत्साहन पर प्रमाणपत्र आणि बक्षीसही जाहीर करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांबरोबरच प्राध्यापकांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

### जात प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) या गटातून मराठा समाजातील मुलांना विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. दरम्यान, राज्य शासनाने या मुलांना 'ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्र देणे बंद केले. त्याऐवजी सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली. त्यामुळे सीईटी सेलने विद्यार्थ्यांकडे 'ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्राची सक्ती केल्याने विद्यार्थ्यांचे प्रवेश अडचणीत आले. या पार्श्वभूमीवर मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आवश्यक जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी देण्यात येत असल्याची घोषणा त्यांनी केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

27/12/2024 | Mumbai(Pune) | Page : 2
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

प्रबंध स्वरूपाचे एकमेव विचार व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### 'प्राध्यापक भरतीत अंध उमेदवारांचा विचार करावा'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नेट-सेट, पीएच.डी.प्राप्त अंध उमेदवारांना त्यांच्या हक्काच्या संधी नाकारल्या जात आहेत. हे हक्क शासनाने त्वरित द्यावेत, अशी मागणी संदीप वर्पे आणि प्रतीक राऊत यांनी पत्रकार परिषदेत केली.

प्राध्यापक पदासाठी सेट-नेट उत्तीर्ण उमेदवारांची निवड केल्यानंतर रिक्त राहणाऱ्या पदांवर २००७ च्या शासनाच्या परिपत्रकानुसार दोन वर्षांसाठी संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी पूर्ण केलेल्या अंध उमेदवाराची कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करावी. आजवर अपंग प्रवर्गातील अंध-अल्पदृष्टी या घटकाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सर्व पदे अनुशेषासह तत्काळ भरावी, न्यायालयीन निर्देश असताना अपंग अ प्रवर्गाच्या जागा रिक्त ठेवून इतर जागा का भरल्या? तसेच अंध-अल्पदृष्टी प्रवर्गाच्या जागा किती दिवसात भरणार आहेत, याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे, आदी मागण्या करण्यात आल्या.

Pune Edition
Dec 27, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रभात
City_28 Dec 2024_013
28 Dec 2024
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे नेमके काय?

**शिक्षण क्षेत्रातील घटकांच्या शंकांचे ऑनलाइन निरसन**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २७** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीबाबत अद्यापही शिक्षण क्षेत्रातील घटकांना प्रश्न अथवा शंका आहेत. त्या पार्श्वभूमीवर या शंकाचे निरसन करण्याचा निर्णय उच्च शिक्षण विभागाने घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणजे जानेवारीपासून प्रत्येक शनिवारी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या मनातील प्रश्न, शंका ऑनलाइन पद्धतीने विचारण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे.

राज्यात स्वायत्त महाविद्यालय आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. राज्य सरकारच्या सुचनेनुसार राज्यातील सर्व विद्यापीठांनी एनईपीसंदर्भात प्राध्यापकांच्या कार्यशाळा घेतल्या. त्याचप्रमाणे 'एनईपी'ची अंमलबजावणी कशी करावी, यासंदर्भात आवश्यक मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली 'एनईपी' अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती स्थापना करण्यात आली. डॉ. करमळकर यांनी विद्यापीठनिहाय बैठका घेऊन मार्गदर्शन केले.

त्यानंतरही 'एनईपी' अंमलबाजवणीत प्राचार्य, प्राध्यापकांबाबत विविध प्रश्न आणि शंका उपस्थित होत आहेत. त्यामुळे राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण संचालक कार्यालयाने ऑनलाइन व्यासपीठाच्या माध्यमातून 'एनईपी'बाबतच्या शंकांचे निरसन करण्याचा निर्णय घेतला आहे. या निमित्ताने प्राध्यापकांना तंत्रशिक्षण; तसेच उच्चशिक्षण संचालकांनाही प्रश्न विचारता येणार आहेत. उच्च शिक्षण संचालक कार्यालयाचे प्रमुख अधिकारी, तंत्र शिक्षण संचालक कार्यालयाचे अधिकारी आणि सुकाणू समितीचे अध्यक्ष, सदस्य हे 'एनईपी' संदर्भातील विविध प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी सर्वांसाठी ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध होणार आहेत.

**दर शनिवारी मार्गदर्शन**

या उपक्रमाची सुरूवात शनिवार (४ जानेवारी)या दिवशी होणार आहे. प्रत्येक शनिवारी सकाळी ११ वाजता ऑनलाइन पद्धतीने **https://zoom.us/i/99562255769** या लिंकवर इच्छुक प्राध्यापक, विद्यार्थ्यांना एनईपी संदर्भातील त्यांचे प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

# प्राध्यापक भरती विद्यापीठ स्तरावर

## चंद्रकांत पाटील यांचे संकेत

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

राज्य व केंद्र सरकार उच्च शिक्षणाला महत्त्व देत असताना दर्जेदार उच्च शिक्षणासाठी अत्यावश्यक असलेली प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. ही पदे राज्य लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) भरण्याचे राज्य सरकारच्या विचाराधीन होते. मात्र, 'एमपीएससी'तर्फे भरती केल्यास या प्रक्रियेला विलंब होण्याची शक्यता असल्याने आता ही पदे विद्यापीठ स्तरावरच भरण्यात येतील, असे संकेत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.

नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात उच्च आणि तंत्रशिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. मात्र, राज्यातील १५ विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या ६५९ जागा रिक्तच आहेत. एकट्या मुंबई विद्यापीठात प्राध्यापकांच्या १३६ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांवर सध्या तासिका तत्त्वावर काम करणारे शिक्षक शिकवत आहेत. या शिक्षकांच्या अध्यापनाचा दर्जा चांगला असला, तरी ते पूर्णवेळ नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होते. तसेच प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याने नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कच्या (एनआयआरएफ) क्रमवारीतही राज्यातील विद्यापीठांची घसरण होते.

राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून प्राध्यापकांची भरती करण्यास अनेक राज्ये प्राधान्य देतात. बिहार आणि झारखंड या राज्यांमध्ये नुकतीच अशा पद्धतीने प्राध्यापकांची भरती करण्यात आली. मात्र, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडे भरतीसंदर्भातील अनेक परीक्षा प्रलंबित आहेत. त्या भरती प्रक्रियांना अद्याप मुहूर्त न सापडल्याने प्राध्यापक भरती प्रक्रियाही 'एमपीएससी'मार्फत राबवली, तर ती लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर ही भरती प्रक्रिया 'एमपीएससी'ऐवजी थेट विद्यापीठांमार्फतच करण्याचा विचार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सूचित केले. याबाबतचा प्रस्ताव राज्यपालांकडे पाठवण्यात आला असून, त्यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यपालांची मंजुरी मिळाल्यानंतर मार्च २०२५पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करून लवकरच राज्यातील सर्व विद्यापीठांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यात येतील, असा विश्वास चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला.

Maharashtra Times 29.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

## 'सारथी'ची योजना; अर्जासाठी ३० जानेवारीपर्यंत मुदत

पुणे, ता. २९ : छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांकडून 'महाराजा सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजने'अंतर्गत २०२४-२५ या वर्षाकरिता रिक्त जागांसाठी शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. यामध्ये पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी.) विशेष अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना यासाठी अर्ज करता येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० जानेवारी आहे.

परदेशामध्ये शिक्षणासाठी एका वर्षामध्ये दोनदा प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. यासाठी 'सारथी'तर्फे ७५ जागांसाठी जाहिरात देण्यात आली होती. यामध्ये ३१ जागांसाठी अर्ज आलेच नव्हते. त्यामुळे रिक्त राहिलेल्या जागांसाठी संधी देण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांतर्फे करण्यात आली होती. त्यांच्या या मागणीला प्रतिसाद देत ही जाहिरात काढली असल्याचे 'सारथी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. यासंदर्भात 'सारथी'तर्फे संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### असे आहेत निकष

- परदेशी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेल्या पदवी परीक्षेत कमीत कमी ५५ टक्के गुण मिळालेले असावेत
- उमेदवार व उमेदवाराचे आई-वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत
- उमेदवाराच्या पालकांचे कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्यांचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२३-२४) एकत्रित वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा जास्त नसावे
- इच्छुक उमेदवारांनी https://sarthi-maharashtragov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा
- ऑनलाइन भरलेल्या अर्जाची मूळ प्रत, प्रमाणपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रती पडताळणीसाठी, सारथी मुख्यालयास सादर करावीत

### या विद्यार्थ्यांना करता येणार अर्ज

- ज्या विद्यार्थ्यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाकरिता 'क्वाक्वेरेली सायमंड्स वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' अंतर्गत २००च्या आत रँकिंग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

Sakal 30.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 30 Dec 2024_005
30 Dec 2024

# प्राध्यापकांची भरती विद्यापीठ स्तरावरच

## चंद्रकांत पाटील; एमपीएससीमार्फत भरती केल्यास विलंब

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची भरती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीमार्फत करण्याचा राज्य सरकार विचार करत होते. मात्र, तसे केल्यास पुढील अनेक वर्षे पूर्ण पदभरती होण्याची शक्यता नाही. यामुळे विद्यापीठ व महाविद्यालयांतील शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्राध्यापकांची भरती विद्यापीठ स्तरावरच करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सूतोवाच केले आहे.



राज्यातील १५ विद्यापीठांमध्ये ६५९ जागा रिक्त आहेत. विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरल्यास नॅशनल इन्स्टिट्यूशन रॅंकिंग फ्रेमवर्कच्या क्रमवारीत व गुणवत्तेमध्ये वाढ होण्यास सहाय्यभूत ठरणार आहे. त्यामुळे विद्यापीठांमधील प्राध्यापकांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भातील प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविण्यात आला आहे. त्याला राज्यपालांची मंजुरी मिळाल्यानंतर मार्च २०२५ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, प्राध्यापकांची भरती ही एमपीएससीच्या माध्यमातून करण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. बिहार व झारखंड या राज्यांमध्ये अशा प्रकारे प्राध्यापकांची भरती करण्यात आली आहे. मात्र, एमपीएससीकडे भरतीसंदर्भातील अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यामुळे प्राध्यापकांची भरती सुद्धा एमपीएससीमार्फत केल्यास त्याचा परिणाम होऊन भरती प्रक्रिया विलंबाने होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम नॅशनल इन्स्टिट्यूशन रॅंकिंग फ्रेमवर्कच्या क्रमवारीवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही भरती प्रक्रिया एमपीएससीऐवजी थेट विद्यापीठांतर्गतच करण्यात यावी, यासाठी राज्यपालांची भेट घेणार असल्याचे चंद्रकांत पाटील यांनी नमूद केले.

### प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आवश्यक जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी दिला जाणार आहे. प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) विद्यार्थ्यांकडे १ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राची सक्ती केल्याने विद्यार्थ्यांचे प्रवेश अडचणीत आले. या पार्श्वभूमीवर ही मुदतवाढ देण्यात येणार आहे.

# *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Education*

मटा विशेष

# कागदपत्रांमध्ये अडकली नियुक्ती

## राज्यातील २,९८४ विशेष शिक्षकांना प्रतीक्षाच

रोहन टिल्लू, मुंबई
rohan.tillu@timesofindia.com

(चित्र : एआय)



"विशेष शिक्षक म्हणून सध्या कार्यरत असलेल्यांपैकी एकाही शिक्षकाची नियुक्ती झालेली नाही, ही बाब सत्य आहे. पण या सर्व शिक्षकांच्या कागदपत्रांची, प्रमाणपत्रांची तपासणी सुरू आहे. त्यासाठी समिती नेमण्यात आली असून, त्यावर सर्व जिल्ह्यांमधील शिक्षणाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. ही प्रमाणपत्रे जिल्हा परिषदांकडे असल्याने सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पडताळणीचे निर्देश दिले आहेत. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर या प्रक्रियेला वेग आला आहे. .

– **शरद गोसावी,** अध्यक्ष, राज्य शिक्षण मंडळ

**मुंबई :** राज्यभरातील २,९८४ दिव्यांग शिक्षकांना अद्यापही कायमस्वरूपी नियुक्तीची प्रतीक्षाच आहे. राज्य सरकारने ८ ऑक्टोबर रोजीच्या निर्णयात या शिक्षकांसाठी 'विशेष शिक्षक' या नव्या पदाची निर्मिती केली. मात्र, हा निर्णय घेऊन अडीच महिने उलटून गेल्यानंतरही एकही पद भरले नसल्याचे वास्तव समोर आले आहे. याबाबत पुण्याचे शिक्षण संचालनालय, मुंबईची प्राथमिक शिक्षण परिषद आणि शालेय शिक्षण विभाग यांच्यात पत्रापत्री सुरू असल्याची टीका करून राष्ट्रीय दृष्टिहीन संघाने ६ जानेवारी रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

शिक्षणाची गंगोत्री समाजातील दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी, या विचारातून राज्य सरकारने समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रम, अपंग समावेशित शिक्षण योजना, अपंग एकात्मता शिक्षण योजना अशा योजनांमार्फत काम सुरू केले होते. मात्र, या योजनांमध्ये समाविष्ट झालेल्या शिक्षकांना अत्यल्प मानधनावर काम करावे लागत होते. या कंत्राटी शिक्षकांना कायमस्वरूपी सेवेत घेण्यासाठी विशेष शिक्षक हे पद तयार करण्याचा प्रस्ताव ऑगस्ट महिन्यात मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आला. त्यावर ३० सप्टेंबर रोजी मंत्रिमंडळाने सकारात्मक निर्णय घेतला आणि ८ ऑक्टोबर रोजी याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाला.

हा निर्णय घेऊन अडीच महिने उलटून गेल्यानंतरही अद्याप एकाही दिव्यांग शिक्षकाला 'विशेष शिक्षक' अशी कायमस्वरूपी नियुक्ती मिळालेली नाही. पुण्यातील शिक्षण संचालक व आयुक्तांकडून पत्रे मुंबईतील प्राथमिक शिक्षण परिषदेकडे, तेथून शालेय शिक्षण विभागाकडे गेल्याचे सांगितले जाते. 'या कागदी घोड्यांखाली आमच्यासारख्या शिक्षकांचा बळी जात आहे,' अशी भावना राष्ट्रीय दृष्टिहीन संघाच्या अमरावती विभागाच्या शाखेचे महासचिव गजानन राठोड यांनी व्यक्त केली.

'या कायमस्वरूपी नियुक्तीसाठी आम्ही अडीच-तीन हजार शिक्षक गेली अनेक वर्षे प्रतीक्षा करत आहोत. या अडीच महिन्यांच्या काळात आमच्यापैकी तीन ते चार जणांचा मृत्यू झाला. तरीही आम्हाला नियुक्तीसाठी वाटच पाहावी लागत आहे,' असेही गजानन राठोड यांनी या वेळी सांगितले.

Maharashtra Times 30.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Education*

# वाचन चळवळ, प्रशिक्षण अन् पालकांना जागृत करणे

## शिक्षण विभागाने हाती घेतला त्रिसूत्री कार्यक्रम

**पुणे, ता. ३०** : केवळ विद्यार्थी, शिक्षकच नव्हे; तर पालकांपर्यंत पोहोचून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी पावले उचलण्यावर शिक्षण विभागाचा भर असणार आहे. यात शिक्षण सुधारणेच्या दृष्टिकोनातून वाचन चळवळ वाढविणे, शिक्षकांना प्रशिक्षण देणे आणि पालकांना जागृत करणे अशी त्रिसूत्री हाती घेतल्याची माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दुसऱ्यांदा या विभागाच्या मंत्रिपदाची जबाबदारी हाती घेतली आहे. जबाबदारी हाती घेतल्यानंतर पाटील यांनी शिक्षण सुधारणेचा त्रिसूत्री कार्यक्रम उच्च व तंत्र शिक्षण विभागाला दिला आहे. त्यांच्या आदेशानुसार राज्याच्या उच्च शिक्षण संचालक कार्यालयातर्फे एक जानेवारीपासून वाचन चळवळ वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे राज्यातील ४५ लाख विद्यार्थ्यांना एक पुस्तक वाचण्यास दिले जाणार आहे. केवळ ठराविक शहरांमध्येच उपक्रम राबविला जाणार नाही; तर राज्यभरात वाचन चळवळ वाढावी, या दृष्टीने प्रयत्न केले जातील. उपक्रम केवळ एका वर्षापुरता राहणार नाही, तर सातत्याने केला जाईल. उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला उपक्रमात सहभागी करून घेण्यास शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे, असे डॉ. देवळाणकर यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनासुद्धा आवश्यक प्रशिक्षण देण्याचा आदेश पाटील यांनी शिक्षण विभागाला दिला आहे. त्यानुसार राज्यातील ३० हजार शिक्षकांना सात दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

Sakal 31.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

## *Section: Miscellaneous*

# तत्त्वनिष्ठ... दृढनिश्चयी!

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी



आज २५ डिसेंबर. आज आपले लाडके माजी पंतप्रधान, दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची शंभरावी जयंती आहे. उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे धनी, मुत्सद्दी राजनीतिज्ञ म्हणून अटलजी आजही अगणित लोकांना प्रेरणा देत असतात. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना, भारताच्या स्थित्यंतराचे शिल्पकार म्हणून, आपला देश अटलजींप्रति सदैव कृतज्ञ राहील.

पंतप्रधान म्हणून अटलजींनी सन १९९८मध्ये शपथ घेतली तेव्हा आपला देश राजकीय अस्थिरतेच्या गर्तेतून बाहेर पडत होता. सुमारे नऊ वर्षांत आपण लोकसभेच्या चार निवडणुका पाहिल्या होत्या. भारतीय जनतेचा संयम सुटत चालला होता आणि सत्तेवर येणारी सरकारे कसा कारभार करतील, याबाबत लोक साशंक होते. मात्र, अटलजींनी स्थिर आणि प्रभावी राज्यकारभार देऊन परिस्थिती अनुकूलपणे पालटवली. आपल्या सभोवतालच्या अनेक क्षेत्रांमध्ये अटलजींच्या नेतृत्वाचा दीर्घकालीन प्रभाव दिसून येतो. त्यांच्या कारकिर्दीत भारताने माहिती-तंत्रज्ञान, दूरसंचार आणि संपर्क व्यवस्थेच्या जगात मोठी झेप घेतली. त्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारने तंत्रज्ञान सामान्य नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अतिशय गांभीर्याने व मनापासून केला. हे करताना, सोबत भारताला एकत्र जोडण्याची, जवळ आणण्याची दूरदृष्टी होती. आजही, अनेक जण भारतातील मुख्य ठिकाणे चहू दिशांनी जोडणाऱ्या 'सुवर्ण चतुष्कोन' या महामार्ग प्रकल्पाची आठवण काढतात. पंतप्रधान ग्राम सडक योजनेसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक दळणवळण वाढवण्याचे वाजपेयी सरकारचे प्रयत्नही उल्लेखनीय होते.

सामाजिक क्षेत्राचा विचार करायचा झाला तर सर्व शिक्षा अभियान या उपक्रमाचा उल्लेख करावा लागेल. त्याच वेळी त्यांच्या सरकारने अनेक आर्थिक सुधारणा करून भारताच्या आर्थिक उत्थानाचा पाया रचला. त्याआधी आपली अर्थव्यवस्था अनेक दशकांपासून घराणेशाहीला प्रोत्साहन देणाऱ्या आर्थिक तत्त्वज्ञानाच्या मार्गावर चालल्यामुळे ठप्प झाली होती. त्यांच्या नेतृत्वाचा दाखला सन १९९८च्या उन्हाळ्यातील घटनेतून पाहायला मिळतो. दि. ११ मे रोजी भारताने 'ऑपरेशन शक्ती' या नावाने ओळखली जाणारी पोखरण अणुचाचणी केली. भारतीय वैज्ञानिकांच्या सामर्थ्याची वेगळी ओळख त्यामुळे जगासमोर आली. या चाचण्यांनी संपूर्ण जग थक्क झाले. काही देशांनी याबद्दल वृथा संतापाचे प्रदर्शन केले. या वेळी एखाद्या सामान्य नेत्याने कच खाल्ली असती; पण अटलजी हे वेगळ्या मातीतून घडलेले नेते होते. दोनच दिवसांनी, १३ मे रोजी आणखी अणुचाचण्या करण्याचे आदेश देत सरकारने आपला निर्धार दाखवून दिला. ११ मेच्या चाचण्यांनी वैज्ञानिक कौशल्याचे दर्शन घडले, तर १३ मेच्या चाचण्यांनी खऱ्या नेतृत्वाचे दर्शन घडले. आंतरराष्ट्रीय



**दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा देशाच्या राजकारणावर अमीट ठसा उमटलेला आहे. देशाच्या विकासात त्यांचे योगदान मोलाचे आहे. अटलजींची आज शंभरावी जयंती. त्या निमित्ताने...**

दबावानंतरही तत्कालीन वाजपेयी सरकार आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याच्या भारताच्या अधिकाराचे आणि त्याच वेळी जागतिक शांततेचा भारत खंदा पुरस्कर्ता असल्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

भारतीय राजकारणातील आघाड्यांची व्याख्या बदलणाऱ्या एनडीएचे अध्यक्षपद अटलजींनी भूषवले. त्यांच्या राजकीय प्रवासातून त्यांची संसदीय प्रतिभा दिसून येते. मूठभर खासदार असलेल्या पक्षाचे ते सदस्य होते; पण त्यांचे शब्द त्या काळात अति-शक्तिमान असलेल्या काँग्रेसच्या सामर्थ्याला हादरवण्यासाठी पुरेसे होते. आपल्या राजकीय कारकिर्दीत अटलजी बराच काळ विरोधी बाकांवर बसलेले होते; पण त्यांनी कधीही कोणाविरोधात मनात कडवटपणा ठेवला नाही. काँग्रेसने त्यांना 'गद्दार' असे संबोधण्यापर्यंतची खालची पातळी गाठल्यानंतरही त्यांनी आपला संयम गमावला नाही.

संधीसाधू डावपेचांद्वारे सत्ताप्राप्तीची हाव त्यांना कधीही नव्हती. सन १९९६मध्ये घोडेबाजार आणि घाणेरड्या राजकारणाच्या मार्गावर चालण्यापेक्षा त्यांनी राजीनामा देणे योग्य मानले. सन १९९९मध्ये केवळ एका मताने त्यांच्या सरकारचा पराभव झाला. मात्र, नंतर जनतेनेच त्यांना प्रचंड बहुमताने पुन्हा एकदा सत्तेवर आणले.

ज्या वेळी आपल्या संविधानाच्या रक्षणाच्या बांधिलकीचा विषय येतो तेव्हाही अटलजी सर्वांपेक्षा वरच्या स्थानी दिसतात. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या हौतात्म्याने ते कमालीचे व्यथित झाले होते. त्यानंतर अनेक वर्षांनी ते आणीबाणीविरोधी चळवळीचे प्रमुख स्तंभ बनले. आणीबाणीनंतरच्या १९७७च्या निवणुकांमध्ये त्यांनी आपला स्वतःचा पक्ष (जनसंघ) जनता पक्षात विलीन करण्यास सहमती दर्शवली. त्यांच्यासाठी आणि इतरांसाठी हा निर्णय नक्कीच वेदनादायी ठरला असेल, अशी माझी खात्री आहे. पण कोणत्याही परिस्थितीत संविधानाचे रक्षण त्यांच्यासाठी महत्त्वाचे होते.

अटलजींच्या व्यक्तिमत्त्वात भारतीय संस्कृती खोलवर रुजलेली होती. भारताचे परराष्ट्रमंत्री असताना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभांमध्ये त्यांनी हिंदी भाषेत भाषण केले. असे करणारे ते पहिले भारतीय नेते ठरले. त्यांच्या या कृतीतून भारताचा वारसा आणि अस्मितेबद्दलचा त्यांचा अपार अभिमान दिसून येतो. अटलजींचे व्यक्तिमत्त्व हे कोणालाही आपल्याकडे अगदी सहजपणे आकर्षून घेणारे होते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, साहित्य आणि अभिव्यक्तीप्रेमाने त्यांचे अवघे जीवन समृद्ध झाले होते. लेखक आणि कविमनाच्या या व्यक्तिमत्त्वाने आपल्या लेखनात शब्दांचा वापर हा प्रेरणा देण्यासाठी, कधी विचार करायला प्रवृत्त करण्यासाठी, कधी सहवेदना व्यक्त करण्यासाठी केला. त्यांच्या असंख्य काव्यरचनांमध्ये त्यांच्या मनातील संघर्षांचे आणि राष्ट्राविषयीच्या आशांचे प्रतिबिंब उमटलेले आपल्याला दिसते. म्हणूनच तर त्यांच्या काव्यरचना आजही सर्व वयोगटांतील लोकांच्या मनात घर करून राहिल्या आहेत.

अटलजींसारख्या व्यक्तिमत्त्वाकडून शिकता आले, त्यांना जाणून घेता आले, त्यांच्याशी संवाद साधता आला हे भारतीय जनता पक्षाच्या माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचे भाग्यच. भाजपसाठी त्यांनी दिलेले योगदान हे खऱ्या अर्थाने आधारभूत असे होते. त्यावेळी अतिशय शक्तिशाली असलेल्या काँग्रेसला सशक्त पर्याय उभा करणे आणि त्या पर्यायाचे नेतृत्व करणे यातूनच त्यांची थोरवी कळून येते. लालकृष्ण अडवाणी आणि डॉ. मुरली मनोहर जोशी यांच्यासारख्या दिग्गज सहकाऱ्यांच्या सोबतीने त्यांनी पक्षाला त्याच्या स्थापनेपासूनच आकार दिला. जेव्हा जेव्हा विचारसरणी आणि सत्ता यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली, त्या त्या वेळी त्यांनी कायमच विचारसरणीचीच निवड केली. काँग्रेसच्या चष्म्यातून जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा असा जागतिक दृष्टिकोन भारतासाठी शक्य आहे आणि असा जागतिक दृष्टिकोन भारताला लाभदायक ठरू शकतो, हे देशाला पटवून देण्यात ते यशस्वी झाले.

त्यांच्या आजच्या शंभराव्या जयंतीनिमित्ताने, त्यांच्या आदर्शांची जाणीव जिवंत ठेवण्यासाठी आणि भारतासाठी त्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण स्वतःला पुन्हा झोकून देऊ या. सुशासन, एकता आणि प्रगती या त्यांच्या तत्त्वांना मूर्त रूप देणारा भारत घडवण्याचा आटोकाट प्रयत्न करू या. आपल्या देशाच्या क्षमतेवर असलेला अटलजींचा अढळ विश्वास आपल्याला उच्च ध्येय आणि कठोर परिश्रम करण्यासाठी सतत प्रेरणा देत आला आहे आणि यापुढेही देत राहील.

Maharashtra Times 25.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Miscellaneous*

# २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस म्हणून जाहीर

## संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत प्रस्ताव मंजूर

**संयुक्त राष्ट्रे :** २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस म्हणून साजरा केला जावा हा लिकटेंस्टिन या देशाने मांडलेला व भारतासह अनेक देशांनी अनुमोदन दिलेला प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने शुक्रवारी एकमताने मंजूर केला. ही माहिती संयुक्त राष्ट्रांतील भारताचे प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश यांनी दिली.

त्यांनी म्हटले आहे की, २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांनी मंजूर केला. वसुधैव कुटुंबकम (संपूर्ण जग एक कुटुंब आहे) अशी भारताची धारणा आहे. माणसाच्या कल्याणासाठी सर्व जगाने एकजुटीने प्रयत्न करायला हवे, असे भारताला वाटते.

जगभरात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यासाठी २०१४ साली भारताने पुढाकार घेतला होता. त्याची आठवण करून देत पर्वतनेनी हरीश यांनी म्हटले आहे की, जागतिक योग दिन ही गेल्या दहा वर्षांत जागतिक चळवळ बनली आहे. जगभरातील कोट्यवधी लोक योगासनांचे धडे घेत आहे. तो त्यांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. (वृत्तसंस्था)

### 'आधुनिक काळातही ध्यानाचे महत्त्व कायम'

- भारताने म्हटले आहे की, ध्यानधारणा ही प्राचीन काळापासून विकसित झाली आहे. आजच्या आधुनिक जगातील बदलांना सामोरे जाताना तसेच मानसिक शांती मिळविण्यासाठी ध्यानधारणा आवश्यक आहे.
- लिकटेंस्टाइनने मांडलेल्या ठरावाला भारत, बांगलादेश, बल्गेरिया, बुरुंडी, डोमिनिकन रिपब्लिक, आइसलँड, लक्झेंबर्ग, मॉरिशस, मोनाको, मंगोलिया, मोरोक्को, पोर्तुगाल आणि स्लोव्हेनिया या देशांनी अनुमोदन दिले होते.

Lokatta 8.12.2024

## *News Paper Clippings During December 2024*

### *Section: Miscellaneous*

लोकमत

# नवे वर्ष देणार लाखो नोकऱ्या

## कंपन्यांनी झटकली मरगळ, हवे मजबूत मनुष्यबळ; तरुणांना अनेक संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयटी क्षेत्रात गेल्या दोन वर्षांमध्ये मरगळ आली होती. ती झटकून टाकत हे क्षेत्र नव्याने भरारी घेण्याच्या तयारीत आहेत. आयटी कंपन्यांमध्ये नव्या वर्षात मोठ्या प्रमाणावर नोकरभरती होणार असल्याची चिन्हे आहेत. नोकरभरतीचा फोकस 'एआय', 'डेटा' विश्लेषण आदी नव्या तंत्रज्ञानावर राहणार आहे.

'सीआयईएल' या संस्थेने विविध क्षेत्रांतील नोकरभरतीचा आढावा घेतला. त्यानुसार, २०२४मध्ये झालेलया नोकरभरतीच्या तुलनेत नव्या वर्षात १० टक्क्यांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची भरती होऊ शकते. बहुतांश कंपन्यांनी तशी तयारी केली आहे. काही मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची भारतातील मनुष्यबळ वाढविण्याची योजना आहे. तर काही कंपन्यांनी तरुणाईला आपल्याकडे ओढण्यासाठी यावेळी कॅम्पस मुलाखतींवर जोर दिला आहे. त्यामुळे अनेकांच्या हाती पदवी पडण्यापूर्वी नोकरीचे पत्र राहणार आहे.



| ४३% | १२% | ११% | ०८% |
|---|---|---|---|
| मोबाइल फोन्स | घरगुती व औद्योगिक उत्पादने | इलेक्ट्रॉनिक्स सुटे भाग | ऑटो इलेक्ट्रॉनिक्स |

### १.२ कोटी नोकऱ्या देणार इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र

- एआय आणि सेमिकंडक्टर क्षेत्रातील विकासामुळे देशातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र येत्या ३ वर्षांमध्ये १.२ कोटी नोकऱ्या निर्मिती करणार असल्याचा अंदाज आहे.
- ३० लाख थेट नोकऱ्यांची निर्मिती होईल. तसेच ९० लाख अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीचा अंदाज.

### यांना मिळेल संधी

- २० लाख आयटीआय व्यावसायिक
- १० लाख अभियंते



### या क्षेत्रात सर्वाधिक नोकरभरती

सेमिकंडक्टर, स्टार्टअप्स, सायबर सुरक्षा, नविनीकरणीय उर्जा, एआय, ई-कॉमर्स आदी.

### वाढीव मनुष्यबळाची गरज का?

- विस्तार योजना
- नव्या उत्पादनांचे लॉंचिंग
- भविष्यातील श्रमशक्ती घडविणे
- डिजिटल तज्ज्ञांची टीम उभारणे

**५००** अब्ज डॉलरपर्यंत हे उत्पादन पुढील ५ वर्षांमध्ये नेण्याचे लक्ष्य आहे.

**१००** अब्ज डॉलर एवढे देशातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील उत्पादन आहे.

Pune Main
Page No. 7 Dec 30, 2024
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2024

## Section: Miscellaneous

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 30 Dec 2024_013
30 Dec 2024

# २०२५ हे 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष'

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) २०२५ हे कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) क्षेत्रात भारताला अग्रस्थान मिळवून देणे हा आहे. त्या अनुषंगाने देशभरातील उच्च शिक्षण संस्थांना कृत्रिम बुद्धिमत्तेसंदर्भात विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या, तसेच त्याबाबतचा अंमलबजावणी आराखडा ३१ डिसेंबरपर्यंत सादर करण्याच्या सूचना आहेत.

याबाबतचे परिपत्रक एआयसीटीईचे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीताराम यांनी संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. २०२५ हे वर्ष कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून समाज आणि शिक्षणाची पुनर्बांधणी करण्याची संधी देणारे आहे. देशातील तंत्रशिक्षणामध्ये परिवर्तन घडवण्यासाठी एआयसीटीईने इंडोव्हेशन केंद्र, शिक्षण-उद्योग सहकार्य, ९०० पेक्षा अधिक तंत्रज्ञान कार्यक्रम, ६५ पेक्षा अधिक बौद्धिक संपदा आणि तंत्रज्ञान हस्तांतर कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच, उद्योग जगतातील तज्ज्ञांना शिक्षण क्षेत्रात आणण्यासाठी प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस, नोकरदारांसाठी अभ्यासक्रम अशा योजना सुरू करण्यात आल्या आहेत.

एआयसीटीईने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात भारताला अग्रस्थानी नेण्याच्या दृष्टीने एआय फॉर ऑल : फ्युचर बिगिन्स हिअर हा आराखडा तयार केला आहे.




**एआयसीटीईकडून जाहीर**

**एआय क्षेत्रात देशाला अग्रस्थानीचा उद्देश**

कृत्रिम बुद्धिमत्तेतील परिवर्तनीय क्षमतांवर एआयसीटीईचा भर आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ तंत्रज्ञानातील कामगिरी नाही, तर त्यात उद्योग, अर्थ क्षेत्र आणि समाजाची पुनर्बांधणी करण्याची क्षमता आहे. या क्रांतीचा भाग होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिक्षण प्रणालीमधील समावेश केला पाहिजेण

**– प्रा. टी. जी. सीताराम,**
अध्यक्ष, एआयसीटीई

# *Upcoming Events*

## January 2025

| MON | TUE | WE | THU | FRI | SAT | SUN |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 ***Savitribai Phule Jayanti***  | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 ***Jijau Masaheb Jayanti & Swami Vivekanand Jayanti***   |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 ***Netaji Subhash Chandra Bose Jayanti & Balasaheb Thackeray Jayanti***   | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com*